

रामायण

युद्धकाण्ड २

मराठी श्लोक श्री. श्याम कुलकर्णी

२३

मूळ संस्कृत आदिकवी

श्री वाल्मिकी

विरचित



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

-श्रीवाल्मिकी रामायण-

खंड २३- युद्धकाण्ड

मूळ संस्कृत व मराठी श्लोकमय अनुवाद-श्री.श्याम कुलकर्णी

-श्रीवाल्मिकी रामायण – खंड २३

मराठी समश्लोकी अनुवाद : श्री. श्याम कुलकर्णी

पत्ता : द्वाराश्री. जयवंत कुलकर्णी, ''गन्धार'' फ़्लॅटक्र. ५/४
आयडियल कॉलनी, कोथरूड पुणे४११०२९
संपर्क – व्हॉट्सऍपक्र. ९७६५४५६५८१
Email : sgk६६४२@gmail. com

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act १९५७ provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

२५ डिसेंबर २०२५

©esahity Pratishthan®2025

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

श्री श्याम कुलकर्णी (काव्यानुवादक)

यंत्र अभियांत्रिकी मास्टर्स पदवी M. E. १९७५

अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त.

लेखनाची लहानपणापासून आवड. किर्लोस्कर, मनोहर, वसंत, प्रपंच, लोकसत्ता अशा अनेक नियतकालिकांमधून स्फुटलेखन प्रकाशित

प्रास्ताविक

ग्रन्थ पूर्ण होण्यापूर्वीच प्रस्तावना लिहिणे हा मर्यादातिभङ्ग आहे आणि 24,000 श्लोकांच्या "वाल्मीकीय रामायण" या ग्रन्थातील 350-400 श्लोकांचे रूपान्तरण हे तर मूळ ग्रन्थाचा साठावा भाग पूर्ण करण्यासारखे आहे. त्यामुळे हे दोन शब्द केवळ ईसाहित्य चे श्री. सुनीळ सामन्त यांचे ऋण मान्य करण्यासाठी लिहीत आहे. केवळ त्यांच्या आग्रहामुळेच मी हे मोठे काम अंगावर घेतले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

या ग्रन्थास डॉ. रविन थत्ते यांच्यासारख्या महान व्यक्तीचा आशीर्वाद लाभणे हे माझे महद्भाग्य!

हे काम माझ्या हातून पूर्ण होण्याचे भाग्य मला लाभो येवढीच ईश्वरचरणी प्रार्थना !

श्याम कुलकर्णी

Dr. Ravin Thatte

श्याम कुलकर्णी ह्यांची आणि माझी ओळख खरे तर माझ्या व्यवसायामुळे (प्लास्टिक सर्जन \ सुघटन शल्य) झाली होती ह्याची त्यांनी मला हल्लीच ह्या त्यांच्या प्रकल्पाबद्दल चर्चा करतांना करून दिली . पुढे मी ज्ञानेश्वरीवर लिहिण्यास सुरुवात केल्या नंतर देखील आमची भेट झाली होती हे मात्र आठवते. हा रामायणावरचा त्यांचा प्रयत्न \प्रकल्प बघून आणि वाचून मी थक्क झालो आहे . केवढे प्रचंड काम आहे हे! ह्या पूर्वी त्यांनी भगवत गीतेवर, रामरक्षेवर आणि मेघदूतावर अशीच समश्लोकी लिहिण्याची कामगिरी केली आहे हे कळल्यावर तर मी अवाक झालो . असला माणूस माझ्या परिचयाचा

आहे हे कळून धन्य वाटले. त्यांनी हे सगळे काम "मी स्वानंदासाठी करत आहे" असे लिहिले आहे . सगळ्या मोठ्या कृती ह्या स्वानंदातूनच निर्माण होतात हे फार जुने सत्य इथे परत उजळले आहे. ही हल्लीची समश्लोकी , रामायणाची, आताच वाचली. ती फार छान उतरली आहे आणि वाचतांना खिळवून ठेवते. प्रकल्प अजून पूर्ण व्ह्यायचा आहे तो नक्कीच पूर्ण होईल अशी खात्री आहे आणि त्यासाठी माझ्या सारख्या अनेकांच्या शुभेच्छा पोहोचवण्याचे काम मी आनंदाने करतो आहे.

Dr. रविन थत्ते

(प्लॅस्टिक सर्जन व संस्कृत पंडित. अध्यात्मावर ११ पुस्तके प्रकाशित)


आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी

मराठी


आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
२
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी


आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
३
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी

आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
४
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी


आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
६
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी
अयोध्याकांड

आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
५
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी

आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
८
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी


आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
७
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी


आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
९
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी
अयोध्याकांड


आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
१०
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी
अयोध्याकांड


आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
११
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी
अरण्यकांड


आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
१२
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी
अरण्यकांड


आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
१३
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी
अरण्यकांड


आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
१४
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी
अरण्यकांड


रामायण
किष्किन्धाकाण्ड
मूळ संस्कृत
आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मराठी श्लोक श्री. श्याम कुलकर्णी
१५


रामायण
किष्किन्धाकाण्ड
मूळ संस्कृत
आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मराठी श्लोक श्री. श्याम कुलकर्णी
१६

श्रीवाल्मिकी रामायण- यापूर्वीचे खंड वाचण्यासाठी https://www.esahity.com/230923432381235123662340238123 50.html






मूळ संस्कृत आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
रामायण
सुंदरकाण्ड ४
मराठी श्लोक श्री. श्याम कुलकर्णी
२१


मूळ संस्कृत आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
रामायण
युद्धकाण्ड १
मराठी श्लोक श्री. श्याम कुलकर्णी
२२

-अथ श्रीवाल्मिकी रामायण- २३

युद्धकाण्ड सर्ग १७

इत्युक्त्वा परुषं वाक्यं रावणं रावणानुज:।
आजगाम मुहूर्तेन यत्र राम: सलक्ष्मण:॥१॥

कठोर वच बोलुनी रावणा बिभीषण येतसे ।
मुहूर्तभरे स्थानी त्या राम लक्ष्मणासह जिथे॥१॥

तं मेरुशिखराकारं दीप्तामिव शतहदाम्।
गगनस्थं महीस्थास्ते ददृशुर्वानराधिपा:॥२॥

मेरुशिखरासम त्या विजेसम नभामध्ये।
चमकता पृथ्वीवरी वानरयूथपति पाहती॥२॥
ते चाप्यनुचरास्तस्य चत्वारो भीमविक्रमा:।
तेऽपि वर्मायुधोपेता भूषणोत्तमभूषिता:॥३॥
महापराक्रमी होते चार अनुचर त्यासवे।
कवच अस्त्रधारी ते विभूषित आभूषणे॥३॥
स च मेघाचलप्रख्यो वज्रायुधसमप्रभ:।
वरायुधधरो वीरो दिव्याभरणभूषित:॥४॥

पर्वतमेघासम तो तेजस्वी इन्द्रासम।
उत्तम शस्त्रधारी दिव्याभूषणे अलंकृत॥४॥
तमात्मपञ्चमं दृष्ट्वा सुग्रीवो वानराधिप:।
वानरै: सह दुर्धर्षश्चिन्तयामास बुद्धिमान्॥५॥
पाहुनी पांचजणां त्या सुग्रीव वानराधिप।
वानरांसह दुर्धर्ष विचार करु लागला॥५॥
चिन्तयित्वा मुहूर्तं तु वानरांस्तानुवाच ह।
हनुमत्प्रमुखान् सार्वानिदं वचनमुत्तमम्॥६॥

थोडा विचार् करुनी हनुमान प्रमुख ज्यां।
वानरां त्यासह सर्व बोले वचन् उत्तम॥६॥
एष सर्वायुधोपेतश्चतुर्भि: सह राक्षसै:।
राक्षसोभ्येति पश्यध्वनस्मान् हन्तु न संशय:॥७॥
सर्व शस्त्रांसह येई राक्षस अन्य चारही।
घेउनी सवे आपणा नि:संशय हा मारण्या॥७॥
सुग्रीवस्य वच:श्रुत्वा सर्वे ते वानरोत्तमा:।
सालानुद्यम्य शैलांश्च इदं वचनमब्रुवन्॥८॥

ऐकुनी सुग्रीव बोल ते सालवृक्ष गिरीशिला।
हातात घेउनी सर्व वानर ते बोलु लागले ॥८॥
शीघ्रं व्यादिश नो राजन् वधायैषां दुरात्मनाम्।
निपतन्ति हता यावद् धरण्यामल्पचेत्ना:॥९॥
राजन् शीघ्र आज्ञापी वधाया दुरात्म्यांस या।
मन्दमति पडतील राक्षस मृत धरेवरी॥९॥
तेषां सम्भाषणामानामन्योन्यं बिभीषण:।
उत्तरं तीरमासाद्य खस्थ एव व्यतिष्ठत॥१०॥

बोलत असता ऐसे ते सागर उत्तर तिरी।
येऊन उभा राही आकाशात बिभीषण ॥१०॥
स उवाच महाप्राज्ञ स्वरेण महता महान् ।
सुग्रीवं तांश्च सम्प्रेक्ष्य खस्थ एव बिभीषण:॥११॥
महापुरुष आकाशी पाही बिभीषण तयां ।
उच्च स्वरात बोले सर्वांना सुग्रीवांसह् ॥११॥
रावणो नाम् दुर्वृत्तो राक्षसो राक्षसेश्वर्:।
तस्याहमनजो भ्राता बिभीषण इति श्रुत:॥१२॥

रावण नाम् दुराचारी राजा राक्षसांचा असे।
अनुज असे मी त्याचा नामे बिभीषण असा॥१२॥
तेन् सीता जनस्थानाद् हृता हत्वा जटायुषम्।
रुद्धा च विवशा दीना राक्षसीभि: सुरक्षिता॥१३॥
जटायु वधुनी सीता पळवी जनस्थानातुनी।
दीन असहाय्य असे राक्षसींच्या बंदीत ती ॥१३॥
तमहं हेतुभिर्वाक्यैर्विविधेश्च न्यदर्शयम्।
साधु निर्यात्यतां सीतां रामायेति पुन:पुन:॥१४॥

युक्तिपूर्वक वाक्यांनी समजाविले मी तया।
सीतेस पाठवी परत् श्रीरामचन्द्राकडे पुन्हा॥१४॥

स च न प्रतिजग्राह रावण: कालचोदित:।
उच्यमानं हितं वाक्यं विपरीत इवौषधम्॥१५॥

पुरुष मरणासन्न जैसा औषध न घेतसे।
तैसा प्रेरित काले माझे वच न मानी तो॥१५॥

सोऽहं परुषितस्तेन दासवच्चावमानित:।
त्यक्त्वा पुत्रांश्च दारांश्च राघवं शरणं गत:॥१६॥

ऐकवी मज कठोर बोल अपमानी दासासम।
म्हणुनी सोडुनि स्त्रीपुत्रा श्रीरामास शरण मी॥१६॥
निवेदयत मां क्षिप्रं राघवाय महात्मने।
सर्वलोकशरण्याय बिभीषणमुपस्थितम्॥१७॥
महात्मा राघवास सांगा सत्त्वर जाउनी।
बिभीषण् शरणार्थी उपस्थित झाला असे॥१७॥
एतत्तु वचनं श्रुत्वा सुग्रीवो लघुविक्रम:।
लक्ष्मणस्याग्रतो रामं संरब्धमिदमब्रवीत्॥१८॥

वचन हे ऐकुनि त्याचे सुग्रीव त्वरित जाउनी।
लक्ष्मणासह रामास आवेशे सांगे जाउनी॥१८॥
प्रविष्टः शत्रुसैन्यं हि प्राप्तः शत्रुरतर्कितः।
निहन्यादनन्तरं लब्ध्वा उलूको वायसानिव॥१९॥
प्रभो शत्रुसैन्यातिल अकस्मात आम्हाकडे।
येई आम्हाला मिळण्या आमुच्या सैन्यामध्ये।
तरी सन्धि साधुनिया मारुनी टाकु आपण।

जसा कावळ्यास करी कोल्हा पकडता तया॥१९॥

मन्त्रे व्यूहे नये चारे युक्तो भवितुमर्हसि।

वानरानां च भद्रं ते परेषां च परंतप॥२०॥

वानरांना असे योग्य आणि शत्रूंना घातक।

युक्तिने वागणे तुम्हा आवश्यक आता असे॥२०॥

अन्तर्धानगता ह्येते राक्षसा: कामरूपिण:।

शूराश्च निकृतिज्ञाश्च तेषां जातु न विश्वसेत्॥२१॥

राक्षस कोणतेही रूप शकती धारण करू ।

अन्तर्धानहि होती मायावी शूरवीर ते।
विश्वास त्यांचा म्हणूनी करणे योग्य नव्हे॥२१॥
प्रणिधी राक्षसेन्द्रस्य रावणस्य भवेदयम्।
अनुप्रविश्य सोऽमासु भेदं कुर्यान्न संशय:॥२२॥
हेर हा राक्षसेन्द्राचा असेल तर आम्हामध्ये।
घुसुनी फूट् पाडेल नसे यात मुळी संशय॥२२॥
अथ वा स्वयमेवैष छिद्रमासाद्य बुद्धिमान्।
अनुप्रविश्य विश्वस्ते कदाचित् प्रहरैदपि॥२३॥

अथवा छिद्र पाहून सेनेत् घुसुनी आपल्या।
आम्हावरी करतील प्रहार शक्य हेही असे॥२३॥

मित्राटविबलं चैव मौलभृत्यबलं तथा।
सर्वमेतद् बलं ग्राह्यं वर्जयित्वा द्विषद्रलम्॥२४॥

मित्र वनचारी भृत्य सेनासंग्रह शक्य तो ।
परी शत्रुपक्षा मिळाले जे त्यांचा करू नये॥२४॥

प्रकृत्या राक्षसो ह्येष भ्रातामित्रस्य वै प्रभो।
आगतश्च रिपुः साक्षात् कथमस्मिंश्च विश्वसेत्॥२५॥

असे राक्षस शत्रूचा बन्धु परी शत्रूच तो।
विश्वास त्याच्यावरती करणे योग्य नव्हे॥२५॥

रावणस्योनुजो भ्राता बिभीषण इति श्रुत:।
चतुर्भि: सह रक्षोभिर्भवन्तं शरणं गत:॥२६॥

रावणानुज प्रसिद्ध बिभीषण नामे जो असे।
चार राक्षसांसवे तो शरण आलेला आम्हा॥२६॥

रावणेन प्रणीतं हि तमवेहि बिभीषणम्।
तस्याहं निग्रहं मन्ये क्षमं क्षमवतां वर॥२७॥

बिभीषण धाडलेला रावणानेच निश्चित।
बन्दी तयास करणे उचित हे वाटे मज॥२७॥
राक्षसो जिह्मया बुद्ध्या संदिष्टोऽयमिहागत:।
प्रहर्तुं मायया छन्नो विश्वस्ते त्वयि चानघ॥२८॥
रावणानेच मुद्दाम धाडलेला कुटिल हा।
विश्वास ठेवता आम्हा विद्ध करण्या येतसे॥२८॥
वध्यतामेष तीव्रण दण्डेन सचिवै: सह।
रावणस्य नृशंसस्य भ्राता ह्येष बिभीषण:॥२९॥

महाक्रूर रावण बन्धु कठोर दण्डार्ह असे।
वध करणेच योग्य याचा त्याच्या मन्त्र्यांसह ॥२९॥

एवमुक्त्वा तु तं रामं संरब्धो वाहिनीपतिः।
वाक्यज्ञो वाक्यकुशलं ततो मौनमुपागमत् ॥३०॥

बोलुनि रागाने ऐसे श्रीरामास सेनापति ।
सुग्रीव वाक्यकुशल मौन धारण करी॥३०॥

सुग्रीवस्य तु तद् वाक्यं श्रुत्वा रामो महाबलः।
समीपस्थानुवाचेदं हनुमत्प्रमुखान् कपीन्॥३१॥

सुग्रीवाचे ऐकुनि वाक्य श्रीराम महाबली ।
बोले जवळ बसलेल्या हनुमानासह वानरां॥३१॥

यदुक्तं कपिराजेन रावणावरजं प्रति
वाक्यं हेतुमदत्यर्थं भवद्भिरपि च श्रुतम्॥३२॥

रावणबन्धूविषयी कपिराज सुग्रीव जे ।
बोलले हेतुपूर्वक ऐकले सर्व ते आपण॥३२॥

सुहृदामर्थकृच्छ्रेषु युक्तं बुद्धिमता सदा।
समर्थेनोपसंदेष्टं शाश्वतीं भूतिमिच्छता॥३३॥

मित्रोन्नतीस्तव व्यक्त करी समर्थ पुरुष।
संशय तेव्हां नेहमी सम्मती देणे योग्य॥३३॥
इत्येव परिपृष्टास्ते स्वं स्वं मतमतन्द्रिता:।
सोपचारं तदा राममूचु: प्रियचिकीर्षव:॥३४॥
असे विचारता सर्व आळस सोडुनि वानर।
उत्साहे मत आपुले प्रकट करू लागले॥३४॥
अज्ञातं नास्ति ते किंचित् त्रिषु लोकेषु राघव।
आत्मानं पूजयन् राम पृच्छस्यस्मान् सुहृत्तया॥३५॥

तिन्ही लोकात अज्ञात नसे आपणा काहीही।
विचारता आम्हा श्रीराम मित्रभावा स्मरूनिया॥३५॥

त्वं हि सत्यव्रत: शूरो धार्मिको द्ढविक्रम:।
परीक्ष्यकारी स्मृतिमान निसृष्टात्मा सुहृत्सु च॥३६॥

तुम्ही सत्यव्रत धर्मात्मा शूरवीर दृढविक्रमी।
स्मृतिसंपन्न विश्वास मित्रांवर ठेवत असे॥३६॥

तस्मादेकैकशस्तावद् ब्रुवन्तु सचिवास्तव।
हेतुतो मतिसम्पन्ना: समर्थाश्च पुन: पुन:॥३७॥

म्हणुनी सचिव सर्व बुद्धिमान शूरवीर जे।
करा प्रकट स्वत:चे विचार वेगवेगळे ॥३७॥
इत्युक्ते राघवायाथ गतिमानङ्गदोऽग्रत:।
बिभीषणपरीक्षार्थमुवाच वचन् हरि:॥३८॥
म्हणता राघव ऐसे प्रथम अङ्गद बुद्धिमान्।
बिभीषण् परीक्षेस्तव श्रीरामास बोले असे॥३८॥
शत्रो सकाशात् सम्प्राप्त: सर्वथा तयं एवहि
विश्वसनीय: सहसा न कर्तव्यो बिभीषण:॥३९॥

शङ्का बिभीषणावरि शत्रूकडुनी येइ तो।
त्यामुळे विश्वासपात्र मानणे योग्य त्या नसे॥३९॥
छादयित्वाऽऽत्मभावं हि चरन्ति शठबुध्दय:।
प्रहरन्ति च रन्ध्रेषु सोऽनर्थ: सुमहान् भवेत्॥४०॥
लपवुनी मनोभावा शठबुद्धी विचरती।
प्रहार करती येता संधि जे अनर्थकारक॥४०॥
अर्थानौं विनिश्चित्य व्यवसायं भजेत ह।
गुणत: संग्रहं कुर्याद् दोषतस्तु विसर्जयेत्॥४१॥

हित वा अहितकारी व्यक्ति करणे निश्चित।
असती गुण तिच्यात तर स्वीकारणे तिज।
असतील जर दोष तर त्याज्य मानावे तिला॥४१॥

यदि दोषो महांस्तस्मिंस्त्यज्ज्यतामविशङ्कितम्।
गुणान् वापि बहून् ज्ञात्वा संग्रह: क्रियतां नृप्॥४२॥

असता मोठे दोष त्यागावे नि:संशय तया।
असता गुण अनेक करावे आपले तया॥४२॥

शरभस्त्वथ निश्चित्य सार्थं वचनमब्रवीत्।

क्षिप्रमस्मिन नरव्याघ्र चार: प्रतिविधीयताम्॥४३॥

विचार करुनी शरभ नन्तर बोले सार्थक।

करावा नियुक्त हेर शीघ्र बिभीषणावरी॥४३॥

प्रणिधाय हि चारेण यथावत् सूक्ष्मबुद्धिना।

परीक्ष्य च तत: कार्यो यथान्यायं परिग्रह:॥४४॥

गुप्तचरे सूक्ष्मबुद्धि परीक्षूनि यथाविधी।

नंतर योग्य तऱ्हेने करावे जवळ तया॥४४॥

जाम्बवांस्त्वथ सम्प्रेक्ष्य शास्त्रबुद्ध्या विचक्षण्:।

वाक्यं विज्ञापयामास गुणवद् दोषवर्जितम्॥४५॥

जाम्बवान त्यानंतर विचार शास्त्रबुद्धिने।

करुनी दोषरहित ऐसे वचन बोलले॥४५॥

बद्धवैराच्च पापाच्च राक्षसेन्द्राद् बिभीषण:।

अदेशकाले सम्प्राप्त: सर्वथा शक्यतामयम्॥४६॥

बिभीषण येई येथे रावणाकडुनी वैरी जो।

न तया येण्या हा काळ स्थानही योग्य हे असे।

त्यामुळे त्याच्याविषयी सशङ्क राहणे योग्य ॥४६॥

ततो मैन्दस्तु सम्प्रेक्ष्य नयापनयकोविद:।
वाक्यं वचनसंपन्नो बभाषे हेतुमत्तरम्॥४७॥
विचार करुनी मैन्द नीतीकुशल त्यानन्तर।
विचार करुनी योग्य असे उत्तम बोलला॥४७॥
अनुजो नाम तस्यैष रावणस्य बिभीषण:।
पृच्छयतां मधुरेणायं शनैर्नरपतीश्वर्॥४८॥
बिभीषण रावणाचा अनुज तेव्हां त्यासवे।
हेतु त्याचा विचारावा करुनी मधुर भाषण॥४८॥

भावमस्य तु विज्ञाय तत्त्वतस्तं करिष्यसि।
यदि दुष्टो न दुष्टो वा बुद्धिपूर्वं नरर्षभ॥४९॥
नरश्रेष्ठ भाव त्याचा जाणुनी बुद्धिपूर्वक।
करावे निश्चित दुष्ट असे तो वा अन्यथा।
त्यानन्तर योग्य काय ठरवुनी करावे तसे॥४९॥
अथ संस्कारसंपन्नो हनूमान् सचिवोत्तमः।
उवाच वचनं श्लक्ष्णमर्थवन्मधुरं लघु॥५०॥
सचिवश्रेष्ठ ह्नूमान ज्ञानसम्पन्न संस्कारे।

सार्थक मधुर वच बोले संक्षिप्त सुन्दर॥५०॥

न भवन्तं मतिश्रेष्ठं समर्थं वदतां वरम्।

अतिशाययितुं शक्तो बृहस्पतिरपि ब्रुवन्॥५१॥

बुद्धिमानात उत्तम समर्थ श्रेष्ठ वक्त्यांमध्ये।

बृहस्पतिही उत्तम आपणाहून न बोलती ॥५१॥

न वदान्नपि संघर्षान्नाधिक्यान्न च कामत:।

वक्ष्यामि वचनं राजन् यथार्थं राम गौरवात्॥५२॥

बोलतो मी न करण्या वाद संघर्ष कामना।

महत्व काय् कार्याचे श्रीरामा हे जाणुनी ॥५२॥

अर्थानर्थनिमित्तं हि यदुक्तं सचिवैस्तव।

तत्र दोषं प्रपश्यामि क्रिया नह्युपपद्यते॥५३॥

अर्थ अनर्थ निर्णय घेण्या गुणदोषपरीक्षण

यासमयी परीक्षा असे घेणे असंभव॥५३॥

ऋते नियोगात सामर्थ्यमवबोद्धुं न शक्यते।

सहसा विनियोगोऽपि दोषवान् प्रतिभाति मे॥५४॥

कर्म न पाहता देणे आश्रय अशक्य त्या।

कामास लावणेसुद्धा दोषप्रद वाटे मज॥५४॥

चारप्रणिहितं युक्तं यदुक्तं सचिवैस्तव।
अर्थस्यासम्भवात् तत्र् कारनं नोपपद्यते॥५५॥

गुप्तचर नियुक्ती जी सचिवांनी सुचविली।
प्रयोजन काय त्याचे न कळे कारण मम॥५५॥

अदेशकाले सम्प्राप्त इत्ययं यद् बिभीषण:।
विवक्षा तत्र मेऽस्तीयंनिबोध यथामति॥५६॥

अयोग्य काली देशी येत बिभीषण वदे।

त्याविषयी बोलतो मी बुद्धीस अनुसरुनी मम॥५६॥

एष् देशश्च् कालश्च भवतीह यथा तथा ।
पुरुषात् पुरुषं प्राप्य तथा दोषगुणावपि॥५७॥
दौरात्म्यं रावणे दृष्ट्वा विक्रमं च तथा त्वयि ।
युक्तमागमनं ह्यत्र सदृषं तस्य बुद्धित:॥५८॥

हाच उत्तमकाल् देश येण्या तया।
नीच् पुरुषापासुनी एक बिभीषणयेतसे॥५७॥
श्रेष्ठ पुरुषा पाहुनी दुष्टता रावणाची।

आगमन अनुरूप त्याच्या उत्तम बुद्ध्दीस॥५८॥

अज्ञातरूपैः पुरुषैःस राजन् पृच्छतामिति।

यदुक्तमत्र मे प्रेक्षा काचिदस्ति समीक्षिता॥५९॥

अपरिचित पुरुषा राजन् विचारावे तसे।

विचारता कळले जे तुम्हापुढे मी ठेवतो॥५९॥

पृच्छयमानो विशङ्केत सहसा बुद्धिमान् वचः।

तत्र मित्रं प्रदुष्येत मिथ्या पृष्टं सुखागतम्॥६०॥

बिचारता हो शङ्कित् सहसा बुद्धिमान् जो।

सुखास्तव आलेल्या मित्राचे मन कलुषित॥६०॥

अशक्यं सहसा राजन् भावो बोद्धं परस्य वै।

अन्तरेण स्वरैर्भिन्नै पुण्यं पश्यतां भृशम्॥६१॥

परक्याचे जाणणे मन असम्भव गोषत् हि असे।

बोलता तो स्वरभाव योग्य वा अयोग्य असे॥६१॥

न तस्य ब्रुवतो जातु लक्ष्यते दुष्टभावना।

प्रसन्नं वदनं चापि तस्मान्म्र् नास्ति संशय:॥६२॥

बोलता तो न त्याची प्रकटे दुष्टभावना।

मुख प्रसन्न म्हणुनी नसे सन्देह त्यावरी॥६२॥

अशङ्कितमति: स्वस्थो न शठ: परिसर्पति।

न चास्य दुष्टवागस्ति तस्मान्मे नास्ति संशय:॥६३॥

दुष्ट पुरुष नि:शंक होऊनि समोर येति ना।

वाणीही निर्दोष याची संदेह न यावरी॥६३॥

आकारश्छाद्यमानोऽपि न शक्यो विनिगुहितुम।

बलाद्धि विवृणोत्येव भावमन्तर्गतं नृणाम्॥६३॥

बाह्याकार लपविला तरि भाव न जातसे।

बाह्यरूप प्रकट करते अन्तर्भाव असे कसा॥६३॥

देशकालोपपन्नं च कार्यं कार्यविदां वर्।

सफलं कुरुते क्षिप्रं प्रयिगेणाभिसंहितम्॥६५॥

बिभीषण आगमन देशकालानुरूपही।

असे कृत्य शीघ्र होते सफल होण्या कारण॥६५॥

उद्योगं तव सम्प्रेक्ष्य मिथ्यावृत्तं च रावणम्।

वालिनं च हतं श्रुत्वा चाभिषेचितम्॥६६॥

राज्य प्रार्थयमानस्तु बुद्धिपूर्वमिहागतः।

एतावत् तु पुरस्कृत्य युज्यते तस्य संग्रहः॥६७॥

तुमचे कर्म येथिल अयोग्य रावणवर्तन

वालीस मारुनि सुग्रीवा अभिषेक केला तुम्ही॥६६॥

यामुळे असावा येत स्वसंरक्षणास्तव इथे।

म्हणुनी संग्रह त्याचा करणे योग्य असे॥६७॥

यथाशक्ति मयोक्तं तु राक्षसस्यार्जवं प्रति।

प्रमाणं त्वं हि शेषस्य श्रुत्वा बुद्धिमतां वर॥६८॥

यथाशक्ति बोललो मी राक्षसाचे मनोगत्।
ऐकुनी उचित तुम्हा जसे वाटे तसे करा॥६८॥

इत्याचे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये अदिकाव्ये युद्धकाण्डे सप्तदश: सर्ग:॥१७॥

युद्धकाण्ड सर्ग १८

अथ राम: प्रसन्नात्मा श्रुत्वा वायुसुतस्य ह।
प्रत्यभाषत दुर्धर्ष: श्रुतवानात्मनि स्थितम॥१॥
ऐकोनि वायुसुत बोल आपल्या मनातले ।
दुर्जय वीर श्रीराम प्रसन्न होउनि बोलले॥१॥
ममापि च विवक्षास्ति काचित प्रति बिभीषणम।
श्रोतुमिच्छामि तत सर्वं भवद्भि: श्रेयसि स्थितै:॥२॥

मजही बोलणे आहे बिभीषणासम्बन्धि जे।
मम हितैषी आपण ऐकावे इच्छितो असे॥२॥
मित्रभावेन सम्प्राप्तं न त्यजेयं कथंचन ।
दोषो यद्यपि तस्य स्यात् सतामेतदगर्हितम॥३॥
मित्रभावे येतसे जो त्याग त्याचा करू नये।
असतील दोष काही त्याचे तरी देणे तया।
आश्रय सत्पुरुषांनी देता न निन्दनीय ते ॥३॥
सुग्रीवस्त्वथ तद्वाक्यमाभाष्य च विमृश्य च।

ततः शुभतर् वाक्यमुवाच हरिपुङ्गवः॥४॥

श्रीरामवच ऐकोनी सुग्रीव उच्चारी पुन्हा ।

आणि विचार करुनी उत्तम वाक्य बोलला॥४॥

स दुष्टो वाप्यदुष्टो वा किमेष रजनीचरः।

ईदृशं व्यसनं प्राप्तंभ्रतरं यः परित्यजेत्॥५॥

को नाम स भवेत् तस्य यमेष न परित्यजेत्।

असेल वा नसेल दुष्ट परी आहे निशाचर।

संकटी सोडी बन्धूस तर दुसरा कोण त्या॥५॥

सम्बन्धी ऐसा ज्यास तो असाच सोडू न शके।
वानराधिपतेर्वाक्यं श्रुत्वा सर्वानुदीक्ष्य तु॥६॥
ईषदुत्स्मयमानस्तु लक्ष्मणं पुण्यलक्षणम्।
इति होवाच काकुत्स्थो वाक्यं सत्यपराक्रमः॥७॥
वाक्य ऐकुनी हे त्याचे पाहुनिया सर्वांकडे ॥६॥
स्मितहास्य करत लक्ष्मणा पुण्यलक्षणा ।
श्रीराम सत्यपराक्रमी अश्या प्रकारे बोलले॥७॥
अनधीत्य च शास्त्राणि वृद्धाननुपसेव्य च।

न शक्यमीदृशं वक्तुं यदुवाच हरीश्वर॥८॥

न करता शास्त्राध्ययन वा सेविता गुरुजन।

न बोलु शके वाक्य बोले जे वानराधिप॥८॥

अस्ति सूक्ष्मतरं किंचिद् यथात्र प्रतिभाति मा।

प्रत्यक्षं लौकिकं चापि वर्तते सर्वराजसु॥९॥

विषयात मजला या जाणवतो सूक्ष्म अर्थ।

पाहिला असे राजांनी आणि प्रसिद्ध जनांतही॥९॥

अमित्रास्तत्कुलीनाश्च प्रातिदेश्याश्च कीर्तिता:।

व्यसनेषु प्रहर्तारस्तस्मादयमिहागत:॥१०॥

अमित्र आणि बान्धव यांपासूनि असे भय।

राजा वा राजपुत्रास विरोधी जो बोलतो।

बिभीषण भयाने त्याच आला असावा इथे॥१०॥

अपापास्त्कुलीनाश्च मानयन्ति स्वकान् हितान्।

एष प्रायो नरेन्द्रानां शङ्कमीयस्तु शोभन:॥११॥

पुण्यकुली जन्मलेले स्वकीया हितैषी मानती।

परि राजकुलामध्ये स्वजातीय शङ्कनीय ॥११॥

न वयं तत्कुलीनाश्च राज्यकाङ्क्षी च राक्षस:।

पण्डिता हि भविष्यन्ति तस्माद् ग्राह्यो बिभीषण:॥१३॥

न त्याच्या कुलातील आम्ही राज्यकाङ्क्षी तो असे।

असती राक्षसहि पण्डित बिभीषण स्वीकारार्ह त्यामुळे॥१३॥

टीप: राज्यकुलातील राजपुत्रांना त्यांच्या नातेवाइकांचे भय असते. भाउबन्दकीत त्यांचा विश्वासघात शक्य तसे बिभीषणाला त्याच्या नातेवाइकांपासून श्रीराम् अथवा वानरांपासून नाही. श्रीरामाने हा अनुभव घेतलाच आहे. कैकेयीनेच त्याला वनात् धाडले आहे.

अव्यग्राश्च प्रहृष्टाच ते भविष्यति संगता:।

प्रणादश्च महानेषोऽन्यस्य भयमागतम्।

इति भेदं गमिष्यन्ति तस्माद् ग्राह्यो बिभीषण:॥१४॥

आम्हास भेटुनी हृष्ट बिभीषण होइल।
शरण आम्हास येई इतर राक्षस भये।
भेद हा जाणुनी आम्हा बिभीषणग्राह्य असे॥१४॥
न सर्वे भ्रातरस्तात भवन्ति भरतोपमा:।
मद्विधा वा पितु: पुत्रा: सुहृदो वा भवद्विधा:॥१५॥
तात सुग्रीव नसती सर्व बन्धु भरतासम।
पुत्र मजसम मित्र नसती तुमच्यासम॥१५॥
एवमुक्तेस्तु रामेण सुग्रीव: सहलक्ष्मण:।

उत्थायेदं महाप्राज्ञ प्रणतो वाक्यमब्रवीत्॥१६॥

श्रीरामवच ऐकून उठून लक्ष्मणासवे।

प्रणाम करुनी त्यास बोले वचन आपले॥१६॥

रावणेन प्रणिहितं तमवेहि निशाचरम्।

तस्याहं निग्रहं मन्ये क्षमं क्षमवतां वर॥१७॥

रावणच पाठवी त्या समजावे निशाचरा ।

करणे बन्दी तयास हेच उचित वाटते ॥१७॥

राक्षसो जिह्मया बुद्ध्या संदिष्टोऽयमिहागत:।

प्रहर्तुं त्वयि विश्वस्ते विश्वस्ते मयि वानघ॥१८॥
लक्ष्मणे वा महाबाहो वध्य: सचिवै: सह।
रावणस्य नृशंसस्य भ्राता ह्येष बिभीषण:॥१९॥

दुष्टबुद्धि रावणाने यास पाठविले इथे।
विश्वसुनी त्यावर आम्ही जर निश्चिन्त जाहलो॥१८॥
आपणा सर्वांवर हा प्रहार शकतो करू।
म्हणुनी सचिवांसह या मारणे योग्य वाटते॥१९॥
एवमुक्त्वा रघुश्रेष्ठं सुग्रीवो वाहिनीपति:।

वाक्यज्ञो वाक्यकुशलं ततो मौनमुपागमत्॥२०॥

वाक्यकुशल श्रीरामा सुग्रीव वाहिनीपती।
ऐसे बोलुनि वाक्यज्ञ मौन धारण करी॥२०॥

स सुग्रीवस्य तद् वाक्यं रामः श्रुत्वा विमृश्य च।
ततः शुभतरं वाक्यमुवाच हरिपुङ्गवम्॥२१॥

सुग्रीववच ऐकून विचार् करुनी त्यावर्।
श्रीराम मङ्गलवाक्य बोले वानराधिपा॥२१॥

स दुष्टो वाप्यदुष्टो वा किमेष रजनीचरः।

सूक्ष्ममप्यहितं कर्तुं मम शक्त: कथंचन॥२२॥

तो दुष्ट असो वा सज्जन अहित माझे किंचित।
करू शकणे त्यास शक्य काय कसे असे॥२२॥

पिशाचान् दानवान् यक्षान् पृथिव्यां चैव राक्षसान्।
अङ्गल्यग्रेण तान् हन्यामिच्छन् हरिगणेश्वर॥२३॥

पिशाच दानव यक्ष असती जे पृथ्वीवर।
सर्वां मी करांगुलीने एकाच शकतो वधू॥२३॥

श्रूयते हि कपोतेन शत्रु: शरणमागत:।

अर्चितस्य यथान्यायं स्वैश्च मांसैर्निमन्त्रित:॥२४॥

ऐकतो शरण आलेल्या व्याधास कबूतरे।

स्वत:चे मांस देऊनी आतिथ्य सत्कारिले॥२४॥

स हि तं प्रतिजग्राह भार्याहर्तारमागतम्।

कपोतो वानरश्रेष्ठ किं पुनर्मद्विधो जन:॥२५॥

व्याधे पकडिले त्याच्या भार्येस तरी कबूतरे।

आदर केला त्याचा मग् माझ्यासम नरे।

शरणागतावर करणे अनुग्रह योग्य हे असे॥२५॥

ऋषेः कण्वस्य पुत्रेण कण्डुना परमर्षिणा।
श्रुणु गाथा पुरा गीता धर्मिष्ठा सत्यवादिना॥२६॥
कण्वपुत्र सत्यवादी महर्षि कण्डुने गायिली।
धर्मविषयक गाथा सांगतो मी ऐका तुम्ही॥२६॥
बद्धाञ्जलिपुटं दीनं याचन्तम् शरणागतम्।
न हन्यादानृशंस्यार्थमपि शत्रु परंतप॥२७॥
हात जोडुनिया दीन शत्रु शरण येतसे।
दयायाचना करता प्रहार न करि त्यावरी॥२७॥

आर्तो वा यदि वा दृप्त: परेषां शरणं गत:।
अरि: प्राणान् परित्यज्य रक्षितव्य: कृतात्मना॥२८॥
शत्रु दु:खी अभिमानी शरणागत येतसे।
त्यागुनी स्वप्राणाही रक्षण त्याचे करी॥२८॥
स चेद् भयाद् वा मोहाद् वा कामाद् वापि न रक्षति।
स्वया शक्त्या यथान्यायं तत् पापं लोकगर्हितम्॥२९॥
जर तो भये मोहे वा कामना यामुळे न करी।
पापकर्मामुळे त्याची निन्दा लोकांत होतसे॥२९॥

विनष्टः पस्यतस्तस्य रक्षिणः शरणं गतः।
आनाय सुकृतं तस्य सर्वं गच्छेदरक्षितः॥३०॥
शरण येई तो नष्ट होतसे रक्षकापुढे।
तर तो त्याच्या घेऊन सर्व पुण्यास जातसे॥३०॥
एवं दोषो महानत्र प्रपन्नानाम रक्षणे।
अस्वयं चायशस्यं च बलवीर्यविनाशनम्॥३१॥
महान दोष तो आहे न रक्षणे शरणागता।
त्यामुळे सुयश स्वर्ग यांची प्राप्ती न होतसे।
त्यामुळे बल् वीर्य नाश त्या नराचा होतसे॥३१॥

करिष्यामि यथार्थं तु कण्डोर्वचनमुत्तमम्।
धर्मिष्ठं च यशस्यं च स्वयं स्यात् तु फलोदये॥३२॥

म्हणुनि करीन पालन उत्तम वचना कण्डुच्या।
त्यामुळे धर्म यश स्वर्ग यांची प्राप्ती होतसे॥३२॥

सकृदेव प्रपन्नाय तवास्मीति च यावते।
अभय् सर्वभूतेभ्यो ददाम्येतद् व्रतं मम॥३३॥

शरण जो मज येई म्हणतसे मी आपला।
अभय त्यास मी देतो सदा व्रत माझे असे॥३३॥

आनयैन हरिश्रेष्ठ दत्तमस्याभयं मया।
बिभीषणो वा सुग्रीव यदि वा रावणस्वयम्॥३४॥
म्हणुनी सुग्रीवा असो बिभीषण वा रावण स्वता।
घेउनी येता मजकडे अभयदान मी देइन॥३४॥
रामस्य तु वचः श्रुत्वा सुग्रीवः प्लवगेश्वरः।
प्रत्यभाषत काकुत्स्थं सौहार्देनाभिपूरितः॥३५॥
श्रीराम वच ऐकून वानरराज सुग्रीव।
सौहर्दभावे भरुनी बोले वचन त्या असे॥३५॥

किमत्र चित्रं धर्मज्ञ लोकनाथशिखामणे।
यत् त्वमार्य प्रभाषेथा: सत्त्ववान् सत्पथे स्थित:॥३६॥
बोलला हे न आश्चर्य लोकनाथशिरोमणी।
कारण तुम्ही सन्मार्गी शक्तिशालीही महान्॥३६॥
मम चाप्यन्तरात्माय शुद्धं वेत्ति बिभीषणम्।
अनुमामाच्च भावाच्च सर्वत: सुपरीक्षित:॥३७॥
मजही आंतुन वाटे शुद्ध हेत् बिभीषण।
हनुमानही तसे सांगे अनुमाने तयाप्रति॥३७॥

तस्मात् क्षिप्रं सहास्माभिस्तुल्यो भवतु राघव।
बिभीषणो महाप्राज्ञ: सखित्वं चाभ्युपैतु न:॥३८॥
रघुनन्दन त्यास्तव येथे शीघ्र बिभीषण।
राहो आपल्यासहित मित्र म्हणुनी आपला॥३८॥
ततस्तु सुग्रीववचो निशम्य तद्धरीश्वरेणाभिहितं नरेश्वर:।
बिभीषणेनाशु जगाम संगमं पतत्रिराजेन यथा पुरन्दर:॥३९॥
तदा ऐकुनी सुग्रीववचन श्रीराम शीघ्र होउनी पुढे बिभीषणा ।
मिळे जणु देवराज इन्द्र मिळतसे पक्षीराज गरुडासवे॥३९॥
इत्याचे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डेऽष्टादश: सर्ग:॥१८॥

युद्धकाण्ड सर्ग १९

राघवेणाभये दत्ते संनतो रावणनुज:।
बिभीषणो महाप्राज्ञो भूमिं समवलोकयत्॥१॥
राघवाने अभय देता विनयशील बिभीषण।
खाली उतरण्यासाठी पहातसे पृथ्वीकडे॥१॥
खात् पपातावनिं हृष्टो भक्तैरनुचरै: सह।
स तु रामस्य धर्मात्मा निपपात बिभीषण:॥२॥

पादयोर्निपपाताथ चतुर्भि:सह राक्षसै।
अनुचरांसह हर्षे नभातुनि पृथ्वीवरी।
उतरूनी बिभीषण चौघां राक्षसांसवे॥२॥
श्रीरामचन्द्रचरणी वन्दन करण्या वाकले।
अब्रवीच्च तदा वाक्यं रामं प्रति बिभीषण:॥३॥
धर्मयुक्तं च युक्तं च साम्प्रतं सम्प्रहर्षणम्।
श्रीरामास उद्देशून बिभीषण धर्मयुक्त ॥३॥
सयुक्तिक हर्षवर्द्धक समयोचित बोलला।

अनुजो रावणस्याहं तेन चाम्यवमानित:॥४॥

भवन्तं सर्वभूतानां शरण्यं शरणं गत:।

अनुज मी रावणाचा त्याने अपमानित॥४॥

शरण्य सर्वभूतांच्या आलो शरण आपणां ।

परित्यक्ता मया लङ्का मित्राणि धनानि च॥५॥

भवद्गतं हि मे राज्यं जीवितं च सुखानि च।

सोडुनी आलो असे मी लंका मित्र धनासवे॥५॥

स्वाधीन आपल्या माझे राज्य सुख जीवन।

तस्य तद् वचनं श्रुत्वा रामो वचनमब्रवीत्॥६॥

वचसा सान्वयित्वैनं लोचनाभ्यां पिबन्निव।

ऐकुनी वचना त्याच्या करुनी त्याचे सान्त्वन॥६॥

जणु नेत्रे पीत प्रेमे पाहुनी त्या असे वदे।

आख्याहि मम तत्त्वेन राक्षसानां बलाबलम्॥७॥

एवमुक्तं तदा रक्षो रामेणाक्लिष्टकर्मणा।

रावणस्य बलं सर्वमाख्यातमुपचक्रमे॥८॥

मज स्पष्टपणे सांग राक्षसांचे बलाबल॥७॥

अनायास क्लिष्टकर्म रामाने पुसता असे।
बिभीषण सांगू लागे रावणाचे बलाबल॥८॥

अवध्य: सर्वभूतानां गन्धर्वोरगपक्षिणाम्।
राजपुत्र दशग्रीवो वरदानात् स्वयम्भुव:॥९॥

वरदाने ब्रह्माजीच्या नाग गन्धर्व पक्षिही।
अवध्य असे राजा रावण सर्वांपासुनी॥९॥
(मानवापासुनि मात्र त्याला भय असे)

रावणानन्तरो भ्राता मम ज्येष्ठस्य वीर्यवान्।

कुम्भकर्णो महातेजा: शक्रप्रतिबलो युधि॥१०॥

रावणानन्तर भ्राता महावीर मज ज्येष्ठ जो।

कुम्भकर्ण तेजस्वी इन्द्रासम पराक्रमी॥१०॥

राम सेनापतिस्तस्य प्रहस्तो यदि मेश्रुत:।

कैलासे येन समरे मणिभद्र: पराजित:॥११॥

प्रहस्त सेनापति त्याचा जर आपणा माहित।

कैलासे करी जो युद्धी मणिभद्रा पराजित॥११॥

(मणिभद्र कुबेराचा असे शूर सेनापति।)

बद्धगोधाङ्गुलित्राणस्त्ववध्यकवचो युधि।
धनुरादाय यस्तिष्ठन्नदृश्यो भवतीन्द्रजित॥१२॥

गोचर्म दस्ताने आणि अवध्य कवच धारुनी।
अदृश्य होतसे हाती धनुष्यासह तो रणी॥१२॥

संग्रामे सुमहदव्यूहे तर्पयित्वा हुताशनम्।
अन्तर्धानगत: श्रीमानिद्रजिद्धन्ति राघव॥१३॥

अदृश्य होत युद्धात शत्रूवर व्यूहामध्ये ।
प्रहार करी अशी शक्ती अग्नीच्या तपे तया॥१३॥

महोदर महापाश्वौ राक्षसश्चाप्यकम्पन:।
अनीकपास्तु तस्यैते लोकपालसमा युधि॥१४॥

महोदर महापार्श्व अकम्पन हे राक्षस।
सेनापति रावणाचे लोकपालासम युद्धात॥१४॥

दशकोटिसहस्राणि रक्षसां कामरूपिणाम्।
मांसशोणितभक्ष्यानां लङ्कापुरनिवासिनाम्॥१५॥

स तैस्तु सहितो राजा लोकपालानयोधयत्।
सह देवैस्तु ते भग्ना रावणेन दुरात्मना॥१६॥

दशकोटिसहस्र संख्येने इच्छारूपी राक्षस।
रक्तमांस भक्षिणारे लङ्कापुरीत राहती॥१५॥
लोकपालांसवे करिता युद्ध रावण त्यांसह।
देवतांसह सर्वांना दुरात्मा लावि पळवुनी ॥१६॥
बिभीषणस्य तु वचस्तच्छ्रुत्वा रघुसत्तम।
अन्वीक्ष्य मनसा सर्वमिदं वचनमब्रवीत्॥१७॥
ऐकूनी बिभीषणाचे वचन रघुसत्तम।

विचार पूर्ण करोनी तया बोलती असे॥१७॥

यानि कर्मापदानि रावणस्य बिभीषण।

आख्यातानि च तत्त्वेन ह्यवगच्छामि तान्यहम्॥१८॥

पराक्रम सांगितले जे रावणाचे युद्धातले।

बिभीषणा जाणतो मी सर्व ते पूर्णपणे॥१८॥

अहं हत्वा दशग्रीवं सप्रहस्त महात्मजम्।

राजानं त्वां करिष्यामि सत्यमेतच्छृणोतु मे॥१९॥

मारुनिया रावणास प्रहस्त आणि पुत्रांसह।

करीन राजा लंकेचा तुजला हे सत्य सांगतो॥१९॥

रसातलं वा प्रविशेत् पातालं वापि रावण:।

पितामहसकाशं वा मे जीवन् विमोक्ष्यते॥२०॥

रसातळी वा पाताळी ब्रह्माजीपाशिही जरी।

गेला रावण तरिही मरेल तो मजहातुन॥२०॥

अहत्वा रावणं संख्ये सपुत्रजनबान्धवान्।

अयोध्यां न प्रवेक्ष्यामि त्रिभिस्तैर्भ्रातृभि: शपे॥२१॥

आपल्या तीन भावांची शपथ घेउन सांगतो।

युद्धामध्ये रावणास पुत्र जन बांधवांसह।
न मारता अयोध्येत प्रवेश करणार न मी॥२१॥
श्रुत्वा तु वचनं तस्य रामस्याक्लिष्टकर्मण:।
शिरसाऽऽवन्द्य धर्मात्मा वक्तुमेव प्रचक्रमे॥२२॥
ऐकोनि वचन रामाचे ज्याचे कर्म महान्।
मस्तके वन्दुनि त्यास लागे बोलाया असे॥२२॥
राक्षसानां वधे साह्य लङ्कायाश्च प्रधर्षणे।
करिष्यामि यथाप्रानं प्रवेक्ष्यामि च वाहिनीम्॥२३॥

करण्या राक्षस संहार यथाशक्ति जिंकण्या।
युद्धात लंका करीन साह्य सैन्यातही॥२३॥
इति ब्रुवाणं रामस्तु परिष्वज्य बिभीषणम्।
अब्रवील्लक्ष्मणं प्रीत: समुद्राज्जलमानय॥२४॥
तेन चेमं महाप्राज्ञमभिषिञ्च बिभीषणम्।
राजानं रक्षसा क्षिप्रं प्रसन्ने मयि मानद॥२५॥
बोलता तो असे राम आलिंगन देई तया।
आनन्दे लक्ष्मणा सांगे आणण्या सागरजल॥२४॥

म्हणे बिभीषणा शीघ्र अभिषेक लंकेवरी।
करी मी प्रसन्न होता त्यास हे आवश्यक॥२५॥
एवमुक्तस्तु सौमित्रभ्यषिञ्जद् बिभीषणम्।
मध्ये वानरमुख्यानां राजानम् राजशासनात्॥२६॥
ऐकता लक्ष्मण सौमित्र बिभीषणा अभिषेक करी।
वानरमुख्यांपुढे सर्व राक्षस राज पदावरी॥२६॥
तं प्रसादं तु रामस्य दृष्ट्वा सद्य: प्लवङ्गमा:।
प्रचक्रुशुर्महात्मानं साधुसाध्विति चाब्रुवन्॥२७॥

पाहुनी प्रसाद रामाचा हर्षध्वनि करूनिया।
“साधु साधु “ असे वदती सर्व वानरगण॥२७॥
अब्रवीच्च हनूमांश्च सुग्रीवश्च बिभीषणम्।
कथं सागरमक्षोभ्यं तराम वरुणालयम्।
सैन्ये परिवृता: सर्वे वानराणां महौजसाम्॥२८॥
बिभीषणास सुग्रीव हनुमान त्यानन्तर।
विचारती आम्ही सर्व महाबली वानरगण।
या अक्षोभ्य समुद्रास कैसे पार करू ॥२८॥

उपायैरभिगच्छाम यथा नदनदीपतिम्।
तराम तरसा सर्व्र् ससैन्या वरुणालयम्॥२९॥
सुचवा उपाय ऐसा आम्ही सर्व सैन्यासह।
करू पार नदीस्वामी समुद्र वरुणालय॥२९॥
एवमुक्तस्तु धर्मात्मा प्रत्युवाच बिभीषण:।
समुद्रं राघवो राजा शरणं गन्तुमर्हति॥३०॥
ऐकुनि हे उत्तर देई धर्मात्मा बिभीषण।
समुद्रा जाणे शरण राघवाने त्यास्तव॥३०॥

खानित: सगरेणायमप्रमेयो महोदधि:।
कर्तुमर्हसि रामस्य ज्ञाते: कार्य महोदधि:॥३१॥
सगराने खणिला सागर श्रीराम त्याचे वंशज।
समुद्रा म्हणुनी त्यांचे कार्य करणे बन्धन॥३१॥
एवं बिभीषणेनोक्तो राक्षसेन विपश्चिता ।
आजगामास सुग्रीवो यत्र राम: सलक्ष्मण:॥३२॥
विद्वान बिभीषणे ऐसे म्हणता येत सुग्रीव।
लक्ष्मणासह श्रीराम उपस्थित जेथ असे॥३२॥

ततश्चाख्यातुमारेभे बिभीषणवच: शुभम्।
सुग्रीवो विपुलग्रीव: सागरस्योपवेशनम्॥३३॥

ग्रीवा विशाल ज्याची सुग्रीव बिभीषणवच।
सांगण्या करि आरंभ सागरास प्रार्थावया॥३३॥

प्रकृत्या धर्मशीलस्य रामस्यस्याप्यरोचत्।
सलक्ष्मणं महातेजा: सुग्रीवं च हरीश्वरम्॥३४॥

सत्क्रियार्थ क्रियादक्षं स्मितपूर्वमभाषत।
धर्मशील रामासहि वच ते योग्य वाटले।

लक्ष्मणासह श्रीराम वानरराजा सुग्रीवा॥३४॥

सत्कारुनी कार्यदक्षा हासुनी बोलला असे।

बिभीषणस्य मन्त्रोऽयं मम लक्ष्मण रोचते॥३५॥

सुग्रीव: पण्डितो नित्यं भवान् मन्त्रविचक्षण:।

उभाभ्यां सम्प्रधार्यार्थं रोचते यत् तदुच्यताम्॥३६॥

लक्ष्मणा बिभीषणाचा सल्ला योग्य वाटतो॥३५॥

सुग्रीव राजनीतिज्ञ योग्य ते तोहि सांगतो।

म्हणुनी विचार करुनी योग्य ते ठरवा तुम्ही॥३६॥

एवमुक्तौ ततो वीरावुभौ सुग्रीवलक्ष्मणौ।
समुदाचारसंयुक्तमिदं वचनमूचतु:॥३७॥
ऐकता हे वीर दोघे सुग्रीव आणि लक्ष्मण।
भगवान श्रीरामास आदरपूर्वक बोलले॥३७॥
किमर्थं नौ नरव्याघ्र न रोचिष्यति राघव।
बिभीषणेन यत् तूक्तमस्मिन काले सुखावहम्॥३८॥
बिभीषणे बोललेली या काली योग्य कल्पना।
का न योग्य वाटेल पुरुषसिंहा दोघां आम्हा ॥३८॥

अवद्ध्वा सागरे सेतुं धीरेऽस्मिन् वरुणालये।
लङ्का नासादितुं स्जक्या सेब्द्रैरपि सुरासुरैः॥३९॥
भयंकर सागरी या इन्द्रासह असुर देवही।
पूल बांधल्याविना न शकती लंकेस पोचण्या॥३९॥
बिभीषणस्य शूरस्य यथार्थं क्रियतां वचः।
अल् कालात्ययं कृत्वा सागरोऽयं नियुज्यताम्।
यथा सैन्येन गच्छाम पुरीं रावणपालिताम्॥४०॥
वीर बिभीषणाचे हे योग्य आहे सांगणे।

विलम्ब न करता आता सागरासी विनवणे।
करण्या सहाय्य आम्हा ज्यामुळे सैन्यासहित।
जाणे शक्य होईल रावणपालित लंकेमध्ये॥४०॥

एवमुक्त: कुशास्तीर्णे तीरे नदन्दीपते:।
संविवेश तदा रामो वैद्यामिव हुताशन:॥४१॥

ऐकुनी सागरतीरी बसती राम कुशावरी।
जैसे होती अग्निदेव वेदीवर प्रतिष्ठित॥४१॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे एकोनविंश: सर्ग:॥१९॥

युद्धकाण्ड सर्ग २०

ततो निविष्टां ध्वजिनीं सुग्रीवेणाभिपालिताम्।
ददर्श राक्षसोऽभ्येत्य शार्दूलोनाम वीर्यवान्॥१॥
चारो राक्षसराजस्य रावणस्य दुरात्मनः।
तां दृष्ट्वा सर्वतोऽव्यग्रां प्रतिगम्य स राक्षसः॥२॥
आविश्य लङ्कां वेगेन राजानमिदमब्रवीत।
हेर राक्षसराजाचा वीर पराक्रमि राक्षस।

शार्दूल नावाचा तेथे येउनी सागर तटी॥१॥
सुग्रीवे सुरक्षित सेना तळ टाकुनि वैसली।
स्थित शान्तभावे तिज परते राक्षस पाहुनी॥२॥
जाउनी लंकापुरीस रावणा निवेदन करी।
एष वै वानरौंघो लङ्कां समभिवर्तते॥३॥
अगाधश्चाप्रमेयाश्च द्वितीय इव सागरः।
वानर अस्वल यांचा प्रवाह जणु लंकेकडे॥३॥

येतसे समुद्रासम अगाध आणि असीम जो।
पुत्रौ दशरथस्येमौ भ्रतारौ रामलक्ष्मणौ॥४॥
उत्तमौ रूपसम्पन्नौ सीताया: पदमागतौ।
दशरथाचे पुत्र राम लक्ष्मण श्रेष्ठ रूपवान॥४॥
येणार असती सीतेचा करण्यास उद्धार् ते।

एतौ सागरमासाद्य संनिविष्टौ महाद्युते॥५॥
बलं चाकाशमावृत्य सर्वतो दश योजनम्।

तत्त्वभूतं महाराज क्षिप्रं वेदितुमर्हसि॥६॥

महाराज आले असती सागरतीरी सर्व ते॥५॥

सेना बसलेली तिथे दश योजन व्यापुनी।

शीघ्र माहिती अधिक तुम्ही मिळविली पाहिजे॥६॥

तव दूता महाराज क्षिप्रमर्हति वेदितुम्।

उपप्रदानं सान्त्वं वा भेदो वात्र प्रयुज्यताम॥७॥

आपले दूत महाराज त्वरित पाठवा जाणण्या।

ठरवा नन्तर काय करणे याचा विचार।

सीतेस करा परत वा सुग्रीवा आपल्याकडे

वळवा गोड बोलून वा फूट पाडा दोघांमध्ये ॥७॥

टीप: येथे वाल्मिकींनी अतिसंक्षिप्तीकरण केले आहे.उपप्रदान सान्त्व म्हणजे सीतेस परत करणे आणि भेद म्हणजे सुग्रीव व श्रीराम यांच्यात फूट पाडणे

शार्दूलस्य वचः श्रुत्वा रावणो राक्षसेश्वरः।

उवाच सहसा व्यग्रः सम्प्रधार्यार्थमात्मनः।

शुकं साधु तदा रक्षो वाक्यमर्थविदां वरम्॥८॥

ऐकुनी शार्दुल बोल राक्षसराजा रावण।

विचारात पडुनी उठे करुनी कर्तव्य निश्चित।
अर्थवेत्ता शुका श्रेष्ठ उत्तम् वचन बोलला॥८॥
सुग्रीवं ब्रूहि गत्वाऽऽशु राजानं वचनान्मम।
यथासंदेशमक्लीबं श्लक्ष्ण्या परया गिरा॥९॥
वानरराज सुग्रीवा शीघ्र जाउनि सांग तू।
मधुर उत्तम वाणीने संदेश माझा हा असे॥९॥
त्वं वै महाराजकुलप्रसूतो महाबलश्चर्खरज:सुतश्च।
न कश्चनार्थस्तव नास्त्यनर्थस्तथापि मे भ्रातृसमो हरीश॥१०॥

उत्पन्न तू महाराजकुलात ऋक्षरजेचा पुत्र आणि बलवानही।
बंधु मानतो मी तुजला न लाभ तशी हानी माझ्याकडूनि तुज॥१०॥

अहं यद्यहरं भार्या राजपुत्रस्य धीमत:।
किं तत्र तव सुग्रीव किष्किन्धा प्रति गम्यताम्॥११॥

भार्या राजपुत्राची जरि मी आणली असे।
काय हानि तुझी त्यात किष्किन्धेस परत जा॥११॥

नहीयं हरिभिर्लंकां प्राप्तुं शक्या कथंचन।
देवैरपि सगन्धर्वै: किं पुन्नरवानरै:॥१२॥

वानरांस इथे येणे कदापि शक्य नसे।
देव गन्धर्वही न शकती कपींचे काय मग॥१२॥
स तदा राक्षसेन्द्रेण संदिष्टो रजनीचर:।
शुको विहंगमो भूत्वा तूर्णमाप्लुत्य चाम्बरम्॥१३॥
संदेश रावणाचा हा मिळता निशाचर तो ।
शुकरूप धारुनीया उडाला त्वरित नभी॥१३॥
स गत्वा दूरमध्वानमुपर्युपरि सागरम्।
संस्थितो ह्याम्बरे वाक्यं सुग्रीवमिदमब्रवीत्॥१४॥

सर्वमुक्तं यथाऽऽदिष्टं रावणेन दुरात्मना।
जाउनी समुद्रावरुनी एवढे दूर अन्तर।
सुग्रीवापाशि तो जाई नभातूनच सुग्रिवा॥१४॥
सांगे निरोप दुरात्मा रावणे दिधला जसा।
तत् प्रापयन्तं वचनं तूर्णमाप्लुत्य वानरा:॥१५॥
प्रपयन्त तदा क्षिप्रं लोप्तुं हन्तुं च मुष्टिभि:।
संदेश देताना त्याच्या जवळी मारुनिया उड्या॥१५॥
पंख तोडुनिया त्याला नष्ट करण्या पाहती।

सर्वैः प्लवंगैः प्रसभं निगृहीतो निशाचरः॥१६॥

गगनाद् भूतले चाशु प्रतिगृह्यावतारितः।

निश्चये या कपींनी त्या राक्षसा धरुनी बळे॥१६॥

खालती उतरविले आकाशातून भूवरी।

वानरैः पीड्यमानस्तु शुको वचनमब्रवीत्॥१७॥

न दूतान् जन्ति काकुत्स्थ वार्यन्तां साधु वानराः।

यस्तु हित्वा मतं भर्तुः स्वमतं सम्प्रधारयेत्।

अनुक्तवादी दूतः सन् स दूतो वधमर्हति॥१८॥

वानरांकडुनी पीडित शुक वचन् बोलला॥१७॥

दूतां न वधती रामा थाम्बवा वानरां तुम्ही।

जो दूत मत स्वामींचे न सांगता अन्य मत।

सांगे तो अपराधी वध करण्या योग्य तो॥१८॥

शुकस्य वचनं राम: श्रुत्वा तु परिदेवितम्।

उवाच मावधिष्टेति नत: शाखामृगर्षभान्॥१९॥

शुकवचन ऐकोनी वानरातिल मुख्य त्या।

सांगतसे पुकारूनी “नका मारू या शुका”॥१९॥

स च पत्रलघुर्भूत्वा हरिभिर्दर्शितेऽभये।

अन्तरिक्षे स्थितो भूत्वा पुनर्वचनमब्रवीत्॥२०॥

त्यामुळे सोडता जाता भार पंखावरील तो।

अभय मिळता जात नभी पुन्हा बोलला॥२०॥

सुग्रीव सत्त्वसम्पन्न महाबलपराक्रम।

किं मया खलु वक्तव्यो रावणो लोकरावण:॥२१॥

महाबली पराक्रमी सत्त्वशाली हे सुग्रीवा ।

काय उत्तर तुझे देऊ रावणा लोकरावणा॥२१॥

स एवमुक्त: प्लवगाधिपस्तदा प्लवंगमानामृषभो महाबल:।
उवाच वाक्यं रजनीचरस्य चारं शुकं शुद्धमदीनसत्त्व:॥२२॥

विचारता तो हे प्लवगाधिपास महाबली उदारमनस्क सुग्रीव।
शुकास निशाचर दूत त्यास सांगे स्पष्टपणे निश्चित ऐसे॥२२॥

न मेऽसि मित्रं न तथानुकम्प्यो न चोपकर्तासि ब मे प्रियोऽसि।
अरिश्च रामस्य सहानुबन्धस्ततोऽसि वालीव वधार्ह वध्य:॥२३॥

न मित्र माझा न दयापात्र न उपकर्ताहि न मम प्रिय व्यक्ती।

श्रीरामाचा तू शत्रु अससी तदा मित्रबान्धवांसह वध्य वालिसम॥२३॥

निहन्महं त्वां ससुतं सबन्धु सज्ञातिवर्ग रजनीचरेश।

लङ्कां च सर्वां महता बलेन सर्वै: करिष्यामि समेत्य भस्म॥२४॥

तुझ्या पुत्र बन्धु कुटुम्बियांसह सर्वांस संहारिन निशाचरराज।

घेऊन येऊन मम सैन्य थोर करीन भस्म सर्व लङ्कापुरीस॥२४॥

न मोक्ष्यसे रावण राघवस्य सुरै: सहेन्द्रैरपि गूढ गुप्त:।

अन्तर्हितं: सूर्यपथं गतोऽपि तथैव पातालमनुप्रविष्ट:।

गिरीशपादाम्बुजसंगतो वा हतोऽसि रामेण सहानुजस्त्वम्॥२५॥

इन्द्रादि देव जरि रक्षति तुज तरी न जीवित राहसी तू।
जरि गुप्त होसी शिरशील नभी अथवा पाताळात तरिही।
घेशील आश्रय शिवपदी तरी निश्चित मृत तू श्रीरामहस्ते॥२५॥

तस्य ते त्रिषु लोकेषु न पिशाचं न राक्षसम्।
भ्रातारं नानुपश्यामि न गन्धर्व न चासुरम्॥२६॥

पिशाच राक्षस किंवा गन्धर्व असुर नसे।
तिन्ही लोकी असा जो करेल तव रक्षण्॥२६॥

अवधीस्त्वं जरावृद्धं गृध्रराजं जटायुधम्।

किं तु ते रामसांनिध्ये सकाशे लक्ष्मणस्य च।
हृता सीता विशालाक्षी यां त्वं गृह्य न बुध्यसे॥२७॥
का मारिले जरावृद्ध गृध्रराज जटायूस।
का पळविले सीतेस रामलक्ष्मणापासुनी।
त्यामुळे येइ आपत्ति कळे न का हे तुज॥२७॥
महाबलं महात्मानं दुराधर्ष सुरैरपि।
न बुध्यसे रघुश्रेष्ठं यस्ते प्राणान् हरिष्यति॥२८॥
ना जाणसी रघुश्रेष्ठ देवांनाही दुर्जय।

हरेल पुढे येऊन तव प्राणां तो निश्चित॥२८॥

ततोऽब्रविद् वालिसुतोऽप्यङ्गदो हरिसत्तम:।
नायं दूतो महाराज चारक: प्रतिभाति मे॥२९॥
तुलितं हि बलं सर्वमनेन तव तिष्ठता।
गृह्यतां मागमल्लङ्कामेतद्धि मम रोचते॥३०॥

तेव्हां अङ्गद बोले वालिसुत कपीवर।
न दूत हा गुप्तचर असे मजला वाटते॥२९॥
उभे राहुनी घेई अंदाज आपला तया।

पकडुनी लंकेत जाण्यापासुनी थाम्बवा॥३०॥

ततो राज्ञा समादिष्टा: समुत्पत्य वलीमुखा:।

जगृहुश्च बबन्धुश्च विलपन्तमनाथवत्॥३१॥

तेव्हां सुग्रिवा आदेशे पकडुनी त्यास बान्धता।

अनाथापरी तो दूत विलाप करु लागला॥३१॥

शुकस्तु वानरैश्चण्डैस्तत्र तै: सम्प्रपीडित:।

व्याचुक्रोश महात्मानं रामं दशरथात्मजम्।

लुप्यते मे बलात् पक्षी भिध्यते मे तथाक्षिणी॥३२॥

यां च रात्रिं मरिष्यामि जाये रात्रिं च यामहम्।
एतस्मिन्नन्तरे कालो यन्मया ह्यशुभं कृतम्।
सर्वं तदुपपद्येथा जह्यां चेद् यदि जीवितम्॥३३॥
प्रचण्ड वानरांकडुनी पीडित झालेला शुक।
पुकारूनि श्रीरामा महात्मा दशरथात्मजा।
पहा बळे पंख माझे तैसे डोळेहि फोडती।
असे करिता मम जन्म मृत्यु मधील काळात्।
केले असे जे मी पाप ते सर्व लागे तुम्हा॥३३॥

नाघातयत् तदा राम: श्रुत्वा तत्परिदेवितम्।

वानरानब्रवीद् रामो मुच्यतां दूत आगत:॥३४॥

ऐकुनी वचन त्याचे वध त्याचा राम थाम्बवी।

वानरांस म्हणे हा दूत म्हणुनी त्या सोडून द्या॥३४॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे विंश: सर्ग:॥२०॥

युद्धकाण्ड सर्ग २१

ततः सागरवेलायां दर्भानास्तीर्य राघवः।
अञ्जलिं प्राङ्मुखः कृत्वा प्रतिशिश्ये महोदधेः॥१॥

नन्तर समुद्रतीरी कुश अन्थरुनी राघव।
हात् जोडूनि सागरा पूर्वाभिमुख पसरले॥१॥

बाहुं भुजङ्गभोगाभमुधायारिसूदनः।
जातरूपमयैश्चैव भूषणैर्भूषतं पुरा॥२॥

सर्पशरीरासम कोमल पूर्वी भूषण भूषित।
बाहु मस्तकाखाली घेउनि राम झोपला॥२॥
मणिकाञ्चनकेयूरमुक्ताप्रवरभूषणै:।
भुजै: परमनारीणाम्भिष्टमनेकथा॥३॥
बाहु जे उत्तम स्वच्छ करता दाबती।
मणि सुवर्ण भूषित उत्तम मातृकोटि स्त्रिया॥३॥
चन्दनागुरुभिश्चैव पुर्स्तादभिसेवितम्।
बालसूर्यप्रकाशैश्च चन्दनरुपशोभितम्॥४॥

प्रथम चन्दन अगुरु सेवित असति जे।
सूर्यासम कान्ति ज्याची रक्तचंदन शोभवी॥४॥
शयने योत्तमाङ्गेन सीताया: शोभितं पुरा।
तक्षकस्येव सम्भोगं गङ्गाजलनिषेवितम्॥५॥
पूर्वी सीतेचे मस्तक ज्या बाहूवर शोभत असे।
गंगाजलवासी तक्षक शरीरापरी सुशोभित॥५॥
संयुगे युगसंकाशं शत्रूणां शोकवर्धनम्।
सुहृदां नन्दनं दीर्घ सागरान्तव्यपाश्रयम्॥६॥

विशाल भुजा युद्धात शत्रूंचा शोक वाढवी।
सुहृदा आनंद देणारी ज्यांवरी भार पृथ्विचा॥६॥
अस्यता च पुन: सव्यं ज्याघातविहतत्वचम्।
दक्षिणो दक्षिणं बाहुं महापरिघसंनिभम्॥७॥
गोसहस्रप्रदातारं ह्युपधाय भुजं महत्।
अद्य मे तरणं वाथ मरणं सागरस्य वा॥८॥
इति रामो धृतिं कृत्वा महाबाहुर्महोदधिम्।
अधिशिष्ये च विधिवत् प्रयतो नियतो मुनि:॥९॥

दक्षिण हस्ते सदैव तीर सोडल्या कारणे।
प्रत्यंचाघाते त्वचा जी कठिण झाली असे।
विशाल तो उजवा हस्त दान ज्याने जाहले।
सहस्रावधि गाईंचे तो उशाशी ठेउनी श्रीराम।
विचार करि मी आज समुद्रा करेन आधीन।
अथवा त्याचा संहार मम हस्ते घडवीन।
निश्चये मौन धरुनी मन,वाणी शरीरावरी।

संयम राखून उद्देशे करण्या अनुकूल सागरा ।
धरेवरी विधिपूर्वक निद्रा कुशासनी करी॥७-९॥

तस्य् रामस्य सुप्तस्य कुशास्तीर्णे महीतले।
नियमाग्रस्तस्य निशास्तिस्रोऽभिजग्मतु:॥१०॥

कुशासनी भूमीवरी नियमे सावध राहुनी ।
श्रीरामाच्या तीन रात्री होती व्यतित यापरी॥१०॥

स त्रिरात्रोषितस्तत्र नयज्ञो धर्मवत्सल:।
उपासत तदा राम: सागरं सरितापतिम्॥११॥

न च दर्शयते रूपं मन्दो रामस्य सागरः।
प्रयतेनापि रामेण यथार्हमभिपूजितः॥१२॥

तीन रात्री याप्रकारे सागराची उपासना ।
नीतिज्ञ धार्मिक राम करी भूवरि पसरुनि ॥११॥
होता यथोचित पूजा रामाकडुनि सत्कार ।
तरिही प्रकट न होई सागर मन्दमति॥१२॥

समुद्रस्य ततो क्रुद्धो रामो रक्तान्तलोचनः।
समीपस्थमुवाचेदं लक्ष्मणं शुभलक्षणम्॥१३॥

समुद्रावरि होउनि क्रुद्ध राम रक्तलोचन।
लक्ष्मणा शुभलक्ष्मण जवळ जो त्या असे म्हणे॥१३॥
अवलेप: समुद्रस्य न दर्शयति य: स्वयम्।
प्रशमस्य क्षमा चैव आर्जवं प्रियवादिता॥१४॥
असामर्थ्यफला ह्येते निर्गुणेषु सतां गुणा:।
अहंकारामुळे सागर स्वयं प्रकट न होतसे।
शान्ति,क्षमा,प्रियवाक्य आर्जवे गुणवान नरा॥१४॥
गुणांमुळे गुणहीन समजती असमर्थ त्या।

आत्मप्रशंसितं दुष्टं धृष्टं विपरिधावकम्॥१५॥

सर्वत्रोत्सृष्टदण्डं च लोकः सत्कुरुते नरम्।

करी आत्मप्रशंसा जो दुष्ट धावे सर्वत्र जो॥१५॥

सुष्ट दुष्टा करी दण्ड सत्कारति त्या नरा।

न साम्ना शक्यते कीर्तिर्न साम्ना शक्यते यशः॥१६॥

प्राप्तु लक्ष्मण लोकेऽस्मिञ्जयो वा रणमूर्धनि।

न मिळे कीर्ति शान्तीने न मिळे यशही तसे॥१६॥

न मिळे जय लक्ष्मणा युद्धातहि रणावरी।

अद्य मद्बाणनिर्भग्नैर्मकरैर्मकरालयम्॥१७॥

निरुद्धतोयं सौमित्रे प्लवद्भि: पश्य सर्वत:।

मम बाणे भग्न मत्स्य मकर मृत शवे त्यांची॥१७॥

आच्छादित समुद्राचे जल नेत्रे पाहशील तू।

भोगिनां पश्य भोगानि मया भिन्नानि लक्ष्मण॥१८॥

महाभोगानि मत्स्यानां करिणां च करानिह।

करतो छिन्न शरीरे मत्स्यांची विशाल तशी॥१८॥

जलहत्तींच्या शुण्डदण्डांही भग्न करीन मी।

सशंखशुक्तिकाजालं समीनमकरं तथा॥१९॥
अद्य युद्धेन महता समुद्रं परिशोषये।
करुनी महान् युद्ध शंख शिम्पांसह तथा॥१९॥
मत्स्य मकरांसह करीन मी शुष्क सागरा।
क्षमया हि समायुक्तं मामयं मकरालयः॥२०॥
असमर्थ विजानाति धिक् क्षमामीदृशे जने।
क्षमाशीलतेमुळे मज समजे असमर्थ हा॥२०॥
सागरासम जनाप्रति क्षमेचा धिक्कार हो।

न दर्शयति साम्ना मे सागरो रूपमात्मन:॥२१॥
चापमानय सौमित्रे शरांश्चाशीविषोपमान्।
समुद्रं शोषयिष्यामि पद्भ्यां यान्तु प्लवंगमा:॥२२॥

सामनीतीमुळे माझ्या न सागर प्रकटे पुढे।
त्यामुळे आण सौमित्रा विषारी बाण भयंकर।
समुद्रा सुकवीन चालत जातील लंकेस कपि॥२२॥

अयाक्षोभ्यमपै क्रुद्ध: क्षोभयिष्यामि सागरम्।
वेलासु कृतमर्यादं सस्त्रोर्मिसमाकुलम्॥२३॥

निर्मर्यादं करिष्यामि सायकैर्वरुणालयम।
महार्णवं क्षोभयिष्ये महादानवसंकुलम्॥२४॥
अक्षोभ्य सागर म्हणति परि प्रक्षुब्ध करीन मी।
सहस्रोर्मी जरी उठती तटी हा मर्यादित परि॥२३॥
मम बाणांनी आज अमर्याद करीन तया।
खळबळ उडवीन त्यात महादानव युक्त जो॥२४॥
एवमुक्त्वा धनुष्पाणि: क्रोधाविस्फारितेक्षण:।
बभूव रामो दुर्धर्षो युगान्ताग्निरिव ज्वलन्॥२५॥

दुर्धर्ष वीर भगवान घेई धनुष्या हातात।
क्रोधे विस्फारी नेत्र प्रज्वलित प्रलयाग्निसम ॥२५॥
सम्पीड्यच धनुर्घोरं कम्पयित्वा शरैर्जगत्।
नुनोच विशिखानुग्रान वज्रानिव शतक्रतु:॥२६॥
स्वधनु भयंकर ताणी टणत्कारे जगा कम्पित।
करुनी भयंकर बाण सोडी इन्द्रवज्रासम ॥२६॥
ते ज्वलन्तो महावेगास्तेजसा सायकोत्तमा:।
प्रविशन्ति समुद्रस्य जलं वित्रस्तपन्नगम्॥२७॥

तेजे प्रज्वलित श्रेष्ठ तीर घुसती सागरामध्ये।
त्यामुळे सर्प तेथील भयाने थरकांपती॥२७॥
तोयवेग: समुद्रस्य समीनमकरो महान्।
स बभूव महाघोर: समारुतरवस्तथा॥२८॥
जलवेग मत्स्य मकरां सह भयंकर वाढला।
त्यामुळे तेथे वादळा सम कोलाहल माजला॥२८॥
महोर्मिमालाविवत: शङ्कशुक्तिसमावृत:।
सधूम: परिवृत्तोर्मि सहसासीन्महोददहि:॥२९॥

उठती तरङ्गमाला येती वर शंख शिम्पले।
धूमासह महा लाटा सागरात उमडती॥२९॥
व्यथिता पन्नगाश्चासन् दीप्तास्या दीप्तलोचना:।
दानवाश्च महावीर्या: पातालतलवासिन:॥३०॥
फणाधारी दीप्तनेत्र सर्प व्यथित दानव।
पाताळात रहाणारे पराक्रमी होत व्याकुळ्॥३०॥
ऊर्मय: सिन्धुराजस्य समक्रमकरास्तथा।
विन्ध्यमन्दरसंकाशा: समुत्पेतु: सहस्रश:॥३१॥

विन्ध्य मन्दरासम लाटा विशाल स्हस्रावधि।
समुद्रावर उठती त्यावरि जलचरहि तरंगती॥३१॥

आघूर्णिततरङ्गौघ: सम्भ्रान्तोरगराक्षस:।
उदर्तितमहाग्राह: सघोषो वरुणालय:॥३२॥

लाटांच्या वेगाने नाग भयभीत होति राक्षस ।
वर येति महाग्राह महाघोष हो सागरी॥३२॥

ततस्तु तं राघवमुग्रवेगं प्रकर्षमाणं धनुरप्रमेयम्।
सौमित्रिरुत्पत्य विनि:श्वसन्तं मामेत् चोक्त्वा धनुराललम्बे॥३२॥

श्रीराम त्यानंतर दीर्घ श्वास घेऊन धनुष्या पुन: खेचु लागती।
तदा सौमित्र थाम्बवी तया आता पुरे म्हणत धनुष्या धरुनी॥३३॥
एतद्विनापि ह्युदधेस्तवाद्य सम्पत्स्यते वीरतमस्य कार्यम्।
भवद्विधा: क्रोधवशं न यान्ति दीर्घ भवान् पश्यतु साधुवृत्तम्॥३४॥
हे वीरशिरोमणि कार्य साध्य होईल संपन्न न करता नष्ट सागरा।
न होत क्रोधाधिन साधु तुम्ही शोधा उपाय योग्य जो उत्तम याहुनी॥३४॥
अन्तर्हितेश्चापि तथान्तरिक्षे ब्रह्मर्षिभिश्चैव सुरर्षिभिश्च।
शब्द: कृत: कष्टमिति ब्रुवद्भिर्मामेति चोक्त्वा महता स्वरेण॥३५॥

तसेच अव्यक्तरूपे अन्तरिक्षे ब्रह्मर्षि तैसे सुरर्षीही स्वरे महान।
करू नये कृत्य कष्टदायक ऐसे म्हणुनी थाम्बण्यास त्या विनवती॥३५॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे एकविंश: सर्ग:॥२१॥

युद्धकाण्ड सर्ग २२

अथोवाच रघुश्रेष्ठ: सागरं दारुणं वच:।
अद्य त्वां शोषयिष्यामि सपातालं महार्णव॥१॥
तेव्हां कठोर शब्दात बोले श्रीराम सागरा।
पाताळासह तुजला सुकवून् आज टाकतो॥१॥
शरनिर्दग्धतोयस्य परिशुष्कस्य सागर।
मया निहतसत्त्वस्य पांसुरुत्पद्यते महान्॥२॥

शरे दग्ध मम होशी शुष्क जीवितहीन तू।
होईल जलराशीस्थली वालुकाराशी या इथे॥२॥
मत्कार्मुकविसृष्टेन शरवर्षेण सागर।
परं तीरं गमिश्यन्ति पद्भिरेव प्लवंगमा:॥३॥
धनुष्यातुन माझ्या सुटलेल्या बाणामुळे।
शुष्क तव परतीरी वानर चालत जातिल॥३॥
विचिन्वन्नाभिजानासि पौरुषं नापि विक्रमम्।
दानवालय संतापं मत्तो नाम गमिष्यसि॥४॥

न जाणसि तू माझे बल आणि पराक्रम।
ध्यानि घे प्राप्त होइल मम संताप तुला॥४॥
ब्राह्मणास्त्रेण् संयोज्य ब्रह्मदण्डनिभं शरम्।
संयोज्य धनुषि श्रेष्ठ विचकर्ष महाबल:॥५॥
ब्रह्मदण्ड सम बाण ब्रह्मास्त्रे अभिमन्त्रित।
करुनी श्रेष्ठ धनुष्यी चढवुनी ओढू लागला॥५॥
तस्मिन विकृष्टे सहसा राघवेण शरासने।
रोदसी सम्पफालेव पर्वताश्च चकम्पिरे॥६॥

खेचता राघवे बाण पृथ्वी आकाश जणु।
फाटु लागति आणि पर्वत कांपू लागती॥६॥
तमश्च लोकमावर्ते दिशश्च न चकाशिरे।
प्रतिचुक्षुभिरे चाशु सरांसि सरितस्तथा॥७॥
अन्धार सर्वत्र पसरे दिशा न दिसती तशा।
खळबळ सरोवरे सरिता यामध्ये होतसे॥७॥
तिर्यक् च सह नक्षत्रैः संगती चन्द्रभास्करौ।
भास्करांशुभिरागीप्तं तमसा च समावृतम्॥८॥

तिर्यक सूर्य नक्षत्र चन्द्रमा चालु लागती।
असता सूर्य सर्वात्र पसरे अन्धार नभी॥८॥
प्रचकशे तदाऽऽकाशमुल्काशतविदीपितम्।
अन्तरिक्षाच्च निर्घाता निर्जग्मुरतुकस्वना:॥९॥
शत उल्का प्रकाशित होती नभी प्रज्वलित।
वज्रपात तसा होई प्रचंड गडगडाटासह॥९॥
वपु:प्रकर्षेण ववुर्दिव्यमारुतपङ्तय।
बभञ्ज च तदा वृक्षाञ्जलदानुदहन्मुहु:॥१०॥

आरुजंश्चैव शैलाग्रान् शिखराणि बभंज च।
परिवहादि मारुतभेद वेगाने वाहु लागती।
मेघघटांना उडवी वृक्षां छिन्न करी तसे।
महापर्वतां तुडवी करुनी शिखरां त्यांच्या।
छिन्नभिन्न करुनिया जमीनदोस्त करी।१० १/२॥
दिवि च स्म महामेघा: संहता: समहास्वना:॥११॥
मुमुचुर्वैद्युतानग्नींस्ते महाशनयस्तदा।
यानि भूतानि दृश्यानि चुक्रुशुस्चाशने: समम्॥१२॥

अदृश्यानि च भूतानि मुमुचुभैरवस्वनम्।
आकाशी मेघ विशाल वज्रासम कडाडती॥११॥
आणि विद्युत अग्नीचा वर्षाव करु लागती।
प्राणि जे दिसती तैसे जे न दिसती ते प्राणिही॥१२॥
भयंकर नाद करू लागती बिजलीसम।
शिश्यिरे चाभिभूतानि संत्रस्तान्युद्विजन्ति च॥१३॥
सम्प्रविव्यधिरे चपि न च पस्पन्दिरे भयात्।
होती धराशायि काही अन्य भयभीत उद्विग्न॥१३॥

व्यथेने व्याकुळ काही भये होती जडभार ।

सह भूतैः सतोयोर्मिः समागः सहराक्षसः॥१४॥

सहसाभूत् वेगाद् भीमवेगो महोदधिः।

योजनं व्यतिचक्राम वेलामन्यत्र सम्प्लवात्॥१५॥

प्राण्यांसह लाटांसह राक्षसांसह त्यातिल ।१४॥

समुद्र भयानक वेगे स्वमर्यादा सोडुनी।

येई अनेक योजन नसता प्रलयकालही॥१५॥

तं तथा समतिक्रान्तं नातिचक्राम राघवः।

समुद्धतममित्रघ्नो रामो नदनदीपतिम्॥१६॥

नदनदीस्वामी सोडी मर्यादा तरी श्रीराम।

शत्रुसूदन ना सोडी स्थान न मागे जातसे॥१६॥

ततो मध्यात् समुद्रस्य सागर: स्वयमुत्थित:।

उदयाद्रिमहाशैलानमेरोरिव दिवाकर:॥१७॥

तेव्हां समुद्रामधुनी स्वयं मूर्तिमान होतसे।

सूर्यदेव जणु उगवे उदयाचली मेरुच्या॥१७॥

पन्नगै: सह दीप्तास्यै: समुद्र: प्रत्यदृश्यत।

स्निग्धवैदूर्यसंकाशो जाम्बूनदविभूषण:॥१८॥

चमकदार सर्पांसह होतसे समुद्रदर्शन।

स्निग्ध वैदूर्यवर्ण अलंकृत जाम्बूनदभूषणे॥१८॥

जाम्बूनद सोन्याचा एक प्रकार।

रक्तमाल्याम्बरधर: पद्मपत्रनिभेक्षण:।

सर्वपुष्पमयीं दिव्यां शिरसा धारयन् स्रजम्॥१९॥

रक्तवर्ण फुलांची माळ आणि वस्त्रे धारण।

कमलदलासम नेत्र पुष्पमाला दिव्य शिरी॥१९॥

जातरूपमयैश्चैव तपनीयविभूषणै:।
आत्मजानां च रत्नानां भूषितो भूषणोत्तमै:॥२०॥

सुवर्ण तप्तकांचन भूषणे शोभित असे।
रत्नांच्या त्यामधील आभूषणे विभूषित॥२०॥

धातुभिर्मण्डित शैलो विविधैर्हिमवानिव।
एकावलीमध्यगतं तरलं पाण्डरप्रभम्॥२१॥

विपुलेनोरसा विस्भ्रत्कौस्तुभश्च सहोदरम्।
नानाधातु अलंकृत हिमवान् पर्वतासम।

कौस्तुभमणीसदृश्य रत्न श्वेतप्रभायुक्त॥२१॥

वक्षस्थली विशाल धारण करी एकावली।

आपूर्णिततरङ्गौघ: कालिकानिलसंकुल:॥२२॥

गङ्गासिन्धुप्रधानाभिरापगाभि: समावृत:।

चंचलतरंगयुक्त व्याप्त मेघमाला वायूने॥२२॥

गंगा सिन्धु नद्या त्यास वेढुनीया राहती उभ्या।

उद्धर्तितमहाग्राह: सम्भ्रान्तोरगराक्षस:॥२३॥

देवतानां सुरूपाभिर्नानारूपाभिरीश्वर:।

सागर: समुपक्रम्य पूर्वमामन्त्र्य वीर्यवान्॥२४॥
अब्रवीत् प्राञ्जलिर्वाक्यं राघवं शरपाणिनम्॥२५॥

महाग्राह दिसती आत भयभीत नागराक्षस।
देवतांसम धारण सुन्दर रूपे नद्यांसवे।
नदीपति शक्तिशाली जवळी येऊनिया॥२४॥
हात जोडुनिया बोले धनुर्धर रामचन्द्रास॥२५॥

पृथिवी वायुराकाशमापो ज्योतिश्च राघव।
स्वभावे सौम्य तिष्ठन्ति शाश्वतं मार्गमाश्रिता:॥२६॥

पृथ्वी वायु जल तेज आकाश स्वभावे स्थित।
राघवा सनातन मार्गी सदैव राहति आश्रित॥२६॥
तत्स्वभावो ममाप्येष यद्गाधोऽहमप्लव:।
विकारस्तु भवेद् गाध एतत् ते प्रवदाम्यहम्॥२७॥
स्वभावे अगाध मज न ओलांडू कोणी शके।
धर्म हा मम ओलांडाया उपाय तुज सांगतो॥२७॥
न कामान्न च लोभाद् वा न भयात् पार्थिवात्मज।
ग्राहनक्राकुलजलं स्तम्भयेयं कथंचन॥२८॥

कामना भय वा लोभे मकर नक्रयुक्त जला।
न होऊ देईन स्तम्भित कधीही पार्थिवात्मजा॥२८॥
विधास्ये येन गन्तासि विषहिष्येऽप्यहं तथा।
न ग्राहा विधमिष्यन्ति यावत्सेना तरिष्यति।
हरीणां तरणे राम करिष्यामि यथा स्थलम्॥२९॥
सांगतो उपाय ऐसा ज्यामुळे कराल पार मज।
वानरांना कष्ट न होता उतरतील पार मम।
वानरांना पार करण्या सेतु कसा बांधायचा।

याविषयी प्रयत्न करण्या अनुकूल मी ॥२९॥

तमब्रवीत् तदा राम: श्रुणु मे वरुणालय।
अमोघोऽयं महाबाण: कस्मिन् देशे निपात्यताम्॥३०॥

सागरा ऐक माझे हे वच बाण अमोघ हा।
कोणत्या स्थानि सोडू हा हे तू मजला सांगसी॥३०॥

रामस्य वचन् श्रुत्वा तं च दृष्ट्वा महाशरम्।
महोदधिर्महातेजा राघवं वाक्यमब्रवीत्॥३१॥

ऐकून वच रामाचे पाहुनी बाण अमोघ ।

महासागर तेजस्वी श्रीरामास सांगे असे॥३१॥

उत्तरेणावकाशोऽस्ति कश्चित् पुण्यतरो मम।

द्रुमकुल्य इति ख्यातो लोके ख्यातो यथा भवान् ॥३२॥

उत्तरेस द्रुमकुल्य विख्यात पवित्र देश।

जसे आपण जगती विख्यात पुण्यात्मा असे॥३२॥

उग्रदर्शनकर्माणो बहवस्तत्र दस्यवः।

आभीरप्रमुखाः पापाः पिबन्ति सलिलं मम॥३३॥

भयानक रूप कर्म ज्यांचे आभीर नाम नर।

पापी लुटारू असती करती मम प्राशन जल॥३३॥

तैर्न तत्स्पर्शनं पापं सहेयं पापकर्मभि:।

अमोघ: क्रियतां राम अयं तत्र शरोत्तम:॥३४॥

न पापी स्पर्श तयांचा सहन करणे मज।

करी तेथच श्रीरामा सफल शर आपला ॥३४॥

तस्य तद् वचनं श्रुत्वा सागरस्य महात्मन:।

मुमोघ तं शरं दीप्तं परं सागरदर्शनात्॥३५॥

ऐकुनी सागरवचना त्याने दाखविल्या देशा।

सोडिला श्रीरामचन्द्रे प्रज्वलित बाण आपला॥३५॥

तेन तन्मरुकान्तारं पृथिव्यां किलं विश्रुतम्।

निपातित: शरो यत्र वज्राशनिसमप्रभ॥३६॥

अशनिसम तो तीर ज्या स्थानि जाउनि पडे।

पृथ्वीवर मरुभूमि ऐसे ते प्रसिद्ध होतसे॥३६॥

ननाद च तदा तत्र वसुधा शल्यपीडिता।

तस्माद व्रणमुखात् तोयमुत्पपात रसातलात्॥३७॥

बाण पडे जेथ आर्त नाद होउन जल।

रसातलाचे व्रणातुन वरती उडू लागले॥३७॥

स बभूव तदा कूपो व्रण इत्येव विश्रुत:।

सततं चोत्थितं तोयं समुद्रस्येव दृश्यते॥३८॥

छिद्र विहिरीसम होउनि व्रण नामे प्रसिद्ध ते।

जल सदा त्यात असे ते दिसे सागरजलासम॥३८॥

अवदारणशब्दश्च दारुण: समपद्यत।

तस्मात् तद् बाणपातेन अप: कुक्षिष्वशोषयत्॥३९॥

होउनी भूमि विदीर्ण भयंकर शब्द होतसे।

बाणामुळे भूमीतिल जल सुकूनी जातसे॥३९॥

विख्यातं त्रिषु लोकेषु मरुकान्तारमेव च ।

शोष्यित्वा तु तं कुक्षि रामो दशरथात्मज:॥४०॥

वरं तस्मै ददौ विद्वान् मरवेऽमरविक्रम:॥४१॥

विख्यात मरुकान्तार नामे स्थान त्रिलोकी ते।

सुकविता श्रीरामाने कुक्षिप्रदेश सागरी॥४०॥

मरुभूमीस श्रीराम त्या ऐसा वर देतसे॥४१॥

पशव्यश्चाल्परोगश्च फलमूलआयुत:।

बहुस्नेहो बहुक्षीर: सुगन्धिर्विविधौषधि:॥४१॥

निरोगी पशु येथील भूमि सम्पन्न होइल।

फल् मूल रसे युक्त सुगन्धी औषधींसह॥४१॥

एवमेतैश्च संयुक्तो बहुभि: संयुतो मरु:।

रामस्य वरदानाच्च शिव: पन्था बभूव ह॥४३॥

वरदाने या रामाच्या मरुभूमि होत संपन्न।

अनेक गुणांनी युक्त सर्वां मङ्गलकारक॥४३॥

तस्मिन् दग्धे तदा कुक्षौ समुद्र: सरितां पति:।

राघवं सर्वशास्त्रज्ञमिदं वचनमब्रवीत् ॥४४॥

होता कुक्षिस्थान ते दग्ध समुद्र सरितापति।

राघवा शास्त्रज्ञात्यास त्यानन्तर ऐसे वदे ॥४४॥

अयं सौम्य नलो नाम तनयो विश्वकर्मण:।

पित्रा दत्तवर: श्रीमान् प्रीतिमान् विश्वकर्मण:॥४५॥

विश्वकर्म्याचा पुत्र नल नावाचा राघवा।

पिता विश्वकर्म्याने वर त्यास असे दिला॥४५॥

टीप: नल नावाचा वानर सैन्यातच आहे.

एष सेतुं महोत्साहः करोतु मयि वानरः।
तमहं धारयिष्यामि यथा ह्येष पिता तथा॥४६॥

वानर हा शिल्पकर्मी समर्थ पित्यासम ।
बांधेल मजवर सेतु करीन तो मी धारण॥४६॥

एवमुक्त्वोदधिनष्टः समुत्थाय नलस्ततः।
अब्रवीद् वानरश्रेष्ठो वाक्यं रामं महाबलम्॥४७॥

एवढे बोलुनि होई सागर अदृश्य नंतर।
उठोनी वानरश्रेष्ठ नल श्रीरामास वदे॥४७॥

अहं सेतुं करिष्यामि विस्तीर्ण मकरालये।
पितु: सामर्थ्यमासाद्य तत्त्वमाह महोदधि:॥४८॥
पित्याने दिधली शक्ती योजुनी सागरावरी।
निर्माण करिन मी सेतु जसे सागर बोलला॥४८॥
दण्ड एव नरो लोके पुरुषस्येति मे मति:।
धिक् क्षमामकृतज्ञेषु सान्त्वं दानमथापि वा॥४९॥
प्रयोग दण्डनीतीचा पुरुषावर योग्य वाटते।
क्षमा सान्त्वन दान प्रयोग त्याज्य असे॥४९॥

अयं हि सागरो भीम: सेतुकर्मदिदृक्षया।
ददौ दण्डभयात् गाधं राघ्वाय महोदधि:॥५०॥
सागर विसरे त्याला सगरपुत्रे निर्मिला।
दण्डभये येउनि सुचवी बांधण्या सेतु त्यावरी॥५०॥
मम मातुर्वरो दत्तो मन्दरे विश्वकर्मणा।
मया तु सदृश: पुत्रस्तव देवि भविष्यति॥५१॥
मन्दराचले मातेस विश्वकर्म्याने दिला।
वर तयासारखा पुत्र होण्याचा जो मी असे॥५१॥

औरसस्तस्य पुत्रोऽहं सदृशो विश्वकर्मणा।
स्मारितोऽस्म्यहमेतेन तत्त्वमाह महोदधिः।
न चाप्यहमनुक्तो चः प्रब्रूयामात्मनो गुणान्॥५२॥

औरस विश्वकर्म्याचा पुत्र शिल्पकर्मी तयासम।
सागरे दिले करुनि स्मरण योग्य ते असे।
स्वगुणां मी न उच्चारी विचारल्याविण मज॥५२॥

समर्थश्चाप्यहम् सेतुं कर्तुं वै वरुणालये।
तस्मादद्यैव बध्यान्तु सेतुं वानरपुङ्गवाः॥५३॥

सागरावर सेतू बान्धण्यास समर्थ मी।

करोत वानर सर्व आरंभ कार्यास या ॥५३॥

ततो विसृष्टा रामेण सर्वतो हरिपुङ्गवा:।

उत्पेतुर्महारण्यं हृष्टा शतसहस्रश:॥५४॥

रामाने सांगता ऐसे हर्षाने लक्ष वानर।

जंगलात मोठमोठ्या शिरती उड्या मारत॥५४॥

ते नगान् नगसंकाशा: शाखामृगगणर्षभा:।

बभञ्ज् पादपांस्तत्र प्रचकर्षुश्च सागरम्॥५५॥

विशालकाय नगासम तोडुनी पर्वतशिखरा।
वृक्षांसही तसे ओढुनि आणती सागराकडे॥५५॥
ते सालैश्चाश्वकर्णैश्चधवैर्वशैश्च वानरा:।
कुटजैरर्जुनैस्तालकैस्तिनिशैरपि ॥५६॥
बिल्वकै: सप्रपर्णैश्च कर्णिकारैश्च पुष्पितै:
चूतैश्चाशोकवृक्षैश्च सागरं समपूरयन्॥५७॥
धव अश्वकर्ण साल कुटज ताल अर्जुन।
ताल् तिलक तिनिश बेल आम्र छितवन॥५६॥

अशोक कन्हेर फुललेली पानासह वृक्ष तसे।

आणति ओढून सर्व समुद्रास भरावया॥५७॥

या दोन श्लोकात वृक्षांची नावेच आहेत.

समूलांश्च विमूलांश्च पादपान् हरिसत्तमा:।

इन्द्रकेतूनिवोद्यम्य प्रजह्वानरास्तरून्॥५८॥

तोडुनी समूळ किंवा मधुनी वृक्ष आणती।

इन्द्रध्वजसम उंच वृक्षा उचलुनि आणती॥५८॥

तालन् दाडिमगुल्मांश्च नारिकेलबिभीतकान्।

करीरान् बकुलान् निम्बान् समाजलुरितस्तत:॥५९॥

डाळींब नारळ ताड बेहेडॅ नीम करीर।

बकुळ लिंब असे वृक्षही तोडुनि आणती॥५९॥

हस्तिमात्रान् महाकाया: पाषाणांश्च महाबला:।

पर्वतांश्च समुत्पाट्य यन्त्रै: परिवहन्ति च॥६०॥

महाकाय वानर ते मोठ्या शिळा गजासम ।

पर्वतांही उखडून समुद्रतटी आणती॥६०॥

प्रक्षिप्यमाणैरचलै: सहसा जलमुद्धृतम्।

समुत्ससर्प चाकाशमवासर्पत् ततः पुनः॥६१॥

फेकल्याने शिलाखण्ड जल आकाशी उडे।

आणि पुन्हा येई खाली सागरातच पडे।

समुद्रं क्षोभयामासुर्निपतन्तः समन्ततः।

सूत्राण्यन्ये प्रगृह्यन्ति ह्यायतं शतयोजनम्॥६२॥

फेकलेल्या शिलाखण्डे समुद्रजल खळबळे।

धरती शतयोजन सूत्र हाती काही वानर ॥६२॥

नलश्चक्रे महासेतुं मध्ये नदनदीपतेः।

स तदा क्रियते सेतुर्वार्वानरैर्घोरकर्मभि:॥६३॥

घोरकर्म करणाऱ्या वानरांच्या सहाय्याने ।

निर्माण करतसे सेतु नल सागरावरी ॥६३॥

दण्डानन्ये प्रगृह्यन्ति विचिन्वति तथापरे।

वानरै: शतशस्तत्र रामस्याज्ञापुर:सरै:॥६४॥

मेघाभै: पर्वताभैश्च तृणै: काष्ठैर्बबन्धिरे।

पुष्पिताग्रैश्च तरुभि: सेतुं बध्नन्ति वानरा:॥६५॥

मापति दण्डाने काही अन्य सामग्री आणती।

श्रीराम आज्ञेनुसार शतसहस्र वानरे॥६४॥
मेघ पर्वतासम ते तृणकाष्ठे योजुनी।
पुष्पांसह वृक्षांनीही करती सेतुबन्धना॥६५॥
पाषाणांश्च गिरिप्रख्यान् गिरीणां शिखराणि च।
दृश्यन्ते परिधावन्तो गृह्य दानवसंनिभा:॥६६॥
पर्वतासम शिळा भव्य पर्वतशिखरे घेउनी।
धावणारे दिसती ते वानर दानवांपरी॥६६॥
शिलानां क्षिप्यमाणानां शैलानां तत्र पात्यताम्।
बभूव तुमुल शब्दस्तदा तस्मिन् महोदधौ॥६७॥

शिला फेकता तैसे पर्वत तेथे पाडता।
महासागरी होई अतिशय भीषण ध्वनी॥६७॥
कृतानि प्रथमेनाना योजनानि चतुर्दश।
प्रहृष्टर्गजसंकाशैस्त्वरमाणै: प्लव्ङ्गमै:॥६८॥
उत्साहे करता कार्य गजासम भव्यवानर।
बान्धती प्रथम दिनी पूल चौदा योजन॥६८॥
द्वितीयेन् तथैवाह्वा योजनानि तु विंशति:।

कृतानि प्लवगैस्तूर्ण भीमकायैर्महाबलै:॥६९॥

दिनि दुसऱ्या वानर वेगे काम करूनिया।

वीस योजन करती पूर्ण सेतुबन्धन ॥६९॥

अह्ना तृतीयेन तथा योजनानि तु सागरे।

त्वरमाणैर्महाकायैरेकविंशतिरेव च॥७०॥

वेगाने करुनी काम तिसऱ्या दिनि महाकपि।

एकवीस योजन लांब सागरी सेतु बान्धती ॥७०॥

चतुर्थेन तथा चाह्ना द्वाविंशतिरथापि वा।

योजनानि महावेगै: कृतानि त्वरितैस्तत:॥७१॥

वानरांनी वेगवान चौथ्या दिनि अतिवेगे ।

बावीस योजन लांब आणखी सेतु बान्धला॥७१॥

पञ्चमेन तथा चाला प्लवगै: क्षिप्रकारिभि:।

योजनानि त्रयोर्विंशत् सुवेलमधिकृत्य वै॥७२॥

पाचव्या दिवशी शीघ्र सुचेत गिरीजवळी।

बांधती वानरवीर सेतु तेवीस योजन ॥७२॥

स वानरवर: श्रीमान् विश्वकर्मात्मजो बली।

बबन्ध सागरे सेतु यथा चास्य पिता तया॥७३॥

समुद्रात शत योजन करी निर्माण सेतु तो।

पुत्र विश्वकर्म्याचा प्रतिभाशालि त्यासम॥७३॥

स नलेन कृत: सेतु: सागरे मकरालये।

शुशुभे सुभग: श्रीमान् स्वातीपथ इवाम्बरे॥७४॥

नलाने बांधला सेतु मकरालय सागरी।

शोभिवन्त दिसे जैसा स्वातीपथ अम्बरी॥७४॥

ततो देवा: सगन्धर्वा: सिद्धाश्च परमर्षय:।

आगम्य गगने तस्थुर्द्रष्टुकामास्तदद्भुतम्॥७५॥

देवता गन्धर्व सिद्ध महर्षि येउनि तदा।

पाहण्या अद्भुत कार्या नभी होति उपस्थित॥७५॥

दशयोजन विस्तीर्ण शतयोजनमापनम्।

ददृशुर्देवगन्धर्वा नलसेतुं सुदुष्करम्॥७६॥

रुंदीने दश योजन शत योजन लाम्ब तो।

पाहती देवगन्धर्व दुष्कर नलकृत्य ते॥७६॥

आप्लवन्त: प्लवन्तश्च गर्जन्तश्च प्लवङ्गमा:।

तमचिन्त्यमसह्यं चह्याद्भुतं लोमहर्षणम्॥७७॥
ददृशु: सर्वभूतानि सागरे सेतुबन्धनम्।
उड्या मारत तैसे गर्जना करित वानर।
सेतु रोमांचकारी अद्भुत अचिन्त्य पाहती॥७७॥
सेतुबन्धन् ते कार्य समस्त प्राणी पाहती।
तानि कोटिसहस्राणि वानराणां महौजसाम्॥७८॥
बध्यन्त: सागरे सेतुं जग्मु: पारं महोदधे:।
कोटि सहस्र उत्साही वानरदल सागरा॥७८॥

बान्धत बान्धत सेतु पोचती दुसऱ्या तिरी।
विशाल: सुकृत: श्रीमान् सुभूमि: सुसमाहित:॥७९॥
अशोभत महान् सेतु: सीमन्त एव सागरे।
सेतु विशाल सुन्दर समतल सुशोभित॥७९॥
जैसा सागरे सीमन्त शोभासंपन्न तो दिसे।
तत: पारे समुद्रस्य गदापाणिर्बिभीषण:॥८०॥
परेषामभिघातार्थमतिष्ठत् सचिवै: सह।
बिभीषण गदासहित सागरतीरी दुसऱ्या ॥८०॥

शत्रूपासून रक्षण्या सेतु जाई सचिवासह।
सुग्रीवस्तु तत: प्राह रामं सत्यपराक्रमम्॥८१॥
हनूमन्तं त्वमारोह अङ्गदं त्वथ लक्ष्मण:।
अयं हि विपुलो वीर सागरो मकरालय:॥८२॥
वैहायसौ युवामेतौ वानरौ धारयिष्यत: ।
सुग्रीव नन्तर बोले श्रीरामा सत्यपराक्रमी।
हनूमन्त स्कन्दी तुम्ही अङ्गदावरि लक्ष्मण।
बसा कारण अन्तर सागरावरी अधिक ॥८२॥

आकाशामार्गे दोघे जातील आपणांसह।
अग्रतस्तस्य सैन्यस्य श्रीमान् राम: सलक्ष्मण:॥८३॥
जगाम धन्वी धर्मात्मा सुग्रीवेण समन्वित:।
लक्ष्मणासह श्रीराम धर्मात्मा धनुर्धर ॥८३॥
सुग्रीवासवे जाती सैन्याच्या त्या पुढे पुढे।
अन्य मध्येन गच्छन्ति पार्श्वतोऽन्ये प्लवंगमा:॥८४॥
सलिलं प्रपतन्त्यन्ये मार्गमन्ये प्रपेदिरे।
केचिद् वैहायसगता: सुपर्णा इव पुप्लुवु:॥८५॥

सैन्यमध्ये दो बाजूस चालती अन्य वानर।
काही पाण्यात पडती आणि पोहती जली।
काही उडुनि आकाशी गरुडासम तरंगती॥८५॥

घोषेण महता घोषं सागरस्य समुछ्रितम्।
भीममन्तर्दधे भीमा तरन्तौ हरिवाहिनी॥८६॥

अशी वानरसेना जाता करति गर्जना।
समुद्र भीषण नाद जाइ दबुनी त्यामुळे॥८६॥

वानराणां हि सा तीर्णा वाहिनी नलसेतुना।

तीरे निविविशे राज्ञो बहुमूलफलोदके॥८७॥

पुलावरुनि ती सेना नलनिर्मित जातसे।

फलमूलाधिक्य जिथे सुग्रीव करत छावणी॥८७॥

तदद्भुतं राघवकर्मं दुष्करं समीक्ष्य देवा: सह सिद्धचारणै:।

उपेत्य रामं सहसा महर्षिभिस्तमभ्यषिञ्चन् सुशुभै लै: पृथक्॥८८॥

ते अद्भुत राघवकर्म पाहुनी दुष्कर देव सिद्ध चारण यांसवे।

येउनी रामाजवळी पवित्र जले करती अभिषेक महर्षींसवे॥८८॥

जयस्व शत्रून् नरदेव मेदिनी ससागरां पालव शाश्वती: समा:।

इतीव रामं नरदेवसत्कृतं शुभैर्वचोभिर्विविधैरपूजयन्॥८९॥

विजय शत्रूवर मिळवी नरवरा समुद्रपर्यन्त पृथ्वी पालन।

वचने मङ्गल ऐश्या अभिवादती राजसन्मानित श्रीरामा॥८९॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये अदिकाव्ये युद्धकाण्डे द्वाविंश: सर्ग:॥२२॥

युद्धकाण्ड सर्ग २३

निमित्तानि निमितज्ञो दृष्ट्वा लक्ष्मणपूर्वज:।
सौमित्रिं सम्परिष्वज्य इदं वचनमब्रवीत्॥१॥
निमित्तज्ञ श्रीराम निमित्ता पाहुनि वदे।
अपशकुना पाहूनी हृदया लावुनि लक्ष्मणा॥१॥
परिगृह्योदकं शीतं वनानि फलवन्ति च ।
बलौघ संविभज्येमं व्यूह्य तिष्ठेम लक्ष्मण॥२॥

लक्ष्मणा जिथे शीतल जल आणि विपुल फल ।
स्थापी सैन्या तेथे त्यांच्या रक्षणी सावध रहा॥२॥

लोकक्षयकरं भीमं भयं पश्याम्युपस्थितम्।
प्रबर्हणं प्रवीराणामामृक्षवानररक्षसाम्॥३॥

लोकसंहारक भय भीषण उपस्थित मज।
वानर अस्वल राक्षस नाश सूचक दिसे॥३॥

वाताश्च कलुषा वान्ति कम्पते च वसुन्धरा।
पर्वताग्राणि वेपन्ते पतन्ति च महीरुहा:॥४॥

वाहते हवा प्रचण्ड धरती कांपते पर्वत।
शिखरे हालती तैसे पडती वृक्ष उन्मळुनी॥४॥
मेघा: क्रव्यादसंकाशा: परुषा: परुषस्वना:।
क्रूरा: क्रूरं प्रवर्षन्ति मिश्रं शोणितबिन्दभि:॥५॥
दाटुनी येती मेघ मांसभक्षी राक्षसापरी।
दिसती क्रूर करती गर्जनाही क्रूर तशी।
वर्षाव रक्तथेंबासम करती मेघ जल॥५॥
रक्तचन्दनसंकाशा संध्या परमदारुणा।

ज्वलत: प्रपतत्येतदादित्यादग्निमण्डलम्॥६॥

रक्तचन्दनसम संध्या भयंकर दिसतसे।

अग्निज्वाला निघती जणू प्रज्वलित सूर्यातुनी॥६॥

दीना दीनस्वरा:क्रूरा:सर्वतो मृगपक्षिण:।

प्रत्यादित्यं विनर्दन्ति जनयन्तो महद्भयम्॥७॥

क्रूर पशु पक्षी दीन सूर्याकडे पाहुनी चित्कारती।

दीन स्वर काढुनिया महान भय निर्मिती॥७॥

रजन्यामप्रकाशस्तु संतापयति चन्द्रमा:।

कृष्णरक्तांशुपर्यन्तो लोकक्षय इवोदित:॥८॥

प्रकाश न देता देई ताप चन्द्र न स्वाभाविक।

रक्तकृष्ण किरणे दावी प्रलयकाल सन्निध॥८॥

ह्रस्वो रूक्षोऽप्रशस्तश्च परिवेषतु लोहित:।

आदित्ये विमले नीलं लक्ष्म लक्ष्मण दृश्यते॥९॥

पहा नील चिह्न दिसे लक्ष्मणा सूर्यमण्डले।

सूर्याभोवती अशुभ रुक्ष घेर दिसतसे॥९॥

रजसा महता चापि नक्षत्राणि हतानि च।

युगान्तमिव लोकानां पश्य शंसन्ति लक्ष्मण॥१०॥

धुलिकणे आच्छादित तारे हतप्रभ सुचविती।

जगाचा संहार भावी जणु होणार लक्ष्मणा॥१०॥

काका: श्येनास्तथा नीचा गृध्रा: परिपतन्ति च।

शिवाश्चाप्यशुभान् नादान् नदन्ति सुमहाभयान्॥११॥

काक श्येन अधम गृध्र उडती चहु बाजुनी।

अशुभ स्वर काढती लांडगेही भयंकर॥११॥

शैलै: शूलैश्च खडगैश्च विमुक्तै: कपिराक्षसै:।

भविष्यत्यावृता भूमिमांसशोणितकर्दमा।१२॥

शिला शैल तलवारी चालविती कपि राक्षस।

भूमीत तदा होइल रक्तमांसकर्दम जणु॥१२॥

क्षिप्रमद्यैव दुर्धर्षा पुरीं रावणपालिताम्।

अभियाम जवेनैव सर्वैर्हरिभिरावृता:॥१३॥

घाई करुनी शक्यतो रावणाच्या लंकेवरी।

वेगे चालुनिया जाऊ वानर सैन्यासह॥१३॥

इत्येवमुक्त्वा धन्वी स राम: संग्रामधर्षण:।

प्रतस्थे पुरतो रामो लङ्कामभिमुखो विधु:॥१४॥

संग्रामविजयी राम असे बोलुनि घेउनी।

निघे धनुष्यासह हाती लंकेकडे सर्वांपुढे॥१४॥

सबिभीषणसुग्रीवा: सर्वे ते वानरर्षभा:।

प्रतस्थिरे विनर्दन्तो धृतानां द्विषतां वधे॥१५॥

बिभीषण सुग्रीवासह सर्व वानरश्रेष्ठ ते।

वध करण्या शत्रूंचा युद्धास्तव जाती पुढे॥१५॥

राघवस्य प्रियार्थं तु सुतरां वीर्यशालिनाम्।

हरीणां कर्मचेष्टाभिस्तुतोष रघुनन्दन:॥१६॥

करण्यास्तव राघवाचे प्रिय सर्व वानर।

निघती पाहूनि त्यांचे कर्म संतुष्ट राघव॥१६॥

इत्याचे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे त्रयोविंश: सर्ग:॥२३॥

युद्धकाण्ड सर्ग २४

सा वीरसमिती राज्ञा विरराज व्यवस्थिता।
शशिना शुभनक्षत्रा पौर्णमासीव शारदी॥१॥
सुग्रीव वीर सैन्याची रचना योग्य करी।
त्यामुळे शरत्कालिन शोभे ती पौर्णिमेसम॥१॥
प्रचचाल च वेगेन त्रस्ता चैव वसुन्धरा ।
पीड्यमाना बलौघेन तेन सागरवर्धसा॥२॥

सागरासम विशाल वेगाने सैन्य चालता ।
वसुंधरा भयभीत वेगे त्या डोलु लागली॥२॥

ततःशुश्रुवुराक्रुष्टं लङ्कायां काननौकसः।
भेरीमृदङ्गसंघुष्टं तुमुलं लोमहर्षणम्॥३॥

गंभीर ध्वनि लंकेत श्रवणी येई वानरां
घोष भेरी मृदंगाचा मिळूनी रोमांचकारि जो॥३॥

बभूवस्तेन घोषेण संहृष्टा हरियूथपाः।
अमृष्यमाणास्तद् घोषं विनेदुर्घोषवत्तरम्॥४॥

तुमुलनाद ऐकोनी उत्साहित कपीवर।
आणि त्याहुनी जोराने घोष करण्या लागती॥४॥
राक्षसास्तत् प्लवंगानां शुश्रुवुस्तेऽपि गर्जितम्।
नर्दतामिव दृप्तानां मेघानाम्बरे स्वनम्॥५॥
ऐकती राक्षस नाद गर्वाने करती कपि।
मेघगर्जनेपरि तो ध्वनि घुमे नभामध्ये॥५॥
दृष्ट्वा दाशरथिर्लंकां चित्रध्वजपताकिनीम्।
जगाम मनसा सीतां दूयमानेन चेतसा॥६॥

ध्वजपताङ्कित लंका पाहुनी सुशोभित।
व्यथितचित्त श्रीरामा सीतेचे स्मरण होतसे॥६॥
अत्र सा मृगशावाक्षी रावणेनोपरुध्यते।
अभिभूता ग्रहणेव लोहिताङ्गेन रोहिणी॥७॥
मृगलोचना येथेच कैदेत ठेवि रावण।
मङ्गलग्रहे आक्रान्त रोहिणीसम दशा॥७॥
दीर्घमुष्णं च नि:श्वस्य समुद्रीक्ष्य च लक्ष्मणम्।
उवाच वचन वीरस्तत्कालहितमात्मन:॥८॥

दीर्घ उष्ण श्वास घेत पाही तो लक्ष्मणाकडे।
आणि समयानुकूल वचन हितकर बोलला॥८॥
आलिखन्तीमिवाकाशमुत्थितां पश्य लक्ष्मण।
मनसेव कृतां लङ्कां नगाग्रे विश्वकर्मणा॥९॥
नभी रेषेसम उंच लङ्का दिसे लक्ष्मणा।
विश्वकर्म्याने मनाने ही नगाग्रे निर्मिली जणु॥९॥
विमानैर्बहुभिर्लंका संकीर्णा रचिता पुरा।
विष्णो: पदमिवाकाशं छिदतं पाण्डुभिर्घनै:॥१०॥

बहुमंजिल गृहांनी युक्त ही रचिली पुरी।
विमानाकार भवने श्वेत आच्छादती नभा।
जे असे स्थानभूत विष्णूच्या चरणस्थापना॥१०॥

पुष्पितै: शोभिता लङ्का वनैश्चित्ररथोपमै:।
नानापतगसंघुष्टफलपुष्पोपगै: शुभै:॥११॥

चित्ररथ सदृश्य वने सजलेली लङ्का असे।
वनी अनेक पक्षी फलफूलांसह शोभती॥११॥

पश्य मत्तविहंगानि प्रलीनभ्रमराणि च।

कोकिलाकुलखण्डानि दोधवीति शिवोऽनिल:॥१२॥

पहा मत्त पक्षी भ्रमर तैसे फुलांवरी।

कोकिलगण गाण्यांनी कम्पित होतसे वन॥१२॥

इति दाशरथी रामो लक्ष्मणं समभाषत।

बलं च तत्र विभजच्छास्त्रदृष्टेन कर्मणा॥१३॥

लक्ष्मणा बोलुनि ऐसे युद्धशास्त्रानुसार ।

करी सेनेस विभाजित श्रीराम दशरथनन्दन॥१३॥

शशास कपिसेनां तां बलादादाय वीर्यवान्।

अङ्गद: सह नीलेन तिष्ठेदुरसि दुर्जय:॥१४॥

आदेशी कपिसेनेस अङ्गद नील पराक्रमी।

यांच्यासवे कपिसेना दुर्जय वीरांच्या सवे।

घेउनी करा स्थापित सैन्याच्या मध्यावर॥१४॥

तिष्ठेत् वानरवाहिन्या वानरौघसमावृत:।

आश्रितो दक्षिणं पार्श्वमृषभो नाम वानर:॥१५॥

तैसे ऋषभ वानर स्वसमुदायासवे उभे।

वानरवाहिनीच्या पाठीस दक्षिणेकडे॥१५॥

गन्धहस्तीव दुर्धर्षस्तरस्वी गन्धमादन:।
तिष्ठेद् वानरवाहिन्या: सव्यं पार्श्वमधिष्ठित:॥१६॥
गन्धहस्तीसम दुर्जय कपिश्रेष्ठ वेगवान्।
गन्धमादन वानरांच्या पाठीस डावीकडे॥१६॥
मूर्ध्नि स्थास्याम्यहं यत्तो लक्ष्मणेन समन्वित:।
जाम्बवांश्च सुषेणश्च वेगदर्शी वानर:॥१७॥
ऋष्यमुख्या महात्मान: कुक्षिं रक्षन्तु ते त्रय:।
व्यूहाच्या मस्तकस्थानी लक्ष्मणासह मी उभा।

जाम्बवान् वेगदर्शी सुषेण महावीर हे॥१७॥

अस्वलांसह करतील कुक्षिभागाचे रक्षण।

जघनं कपिसेनया: कपिराजोऽभिरक्षतु।

पश्चार्थमिव लोकस्य प्रचेतास्तेजसा वृत:॥१८॥

सुग्रीव कपिसेनेच्या पिछाडिस राहतील।

जसा वरुण तेजस्वी पश्चिम दिशा रक्षत॥१८॥

सुविभक्तमहाव्यूहा महावानररक्षिता।

अनीकिनी सा विबभौ यथा द्यौ: साभ्रसम्लवा॥१९॥

सुव्यवस्थित सेना ती रक्षिती जी महाकपि।
मेघव्याप्त नभासम वरुनी पाहता दिसे॥१९॥

प्रगृह्य गिरिशृंगाणि महतश्च महीरुहान्।
आसेदुर्वानरा लङ्हां मिमर्दयिषवो रणे॥२०॥

गिरिशिखरे घेऊनी महावृक्षहि त्यासवे।
पददलित करण्या लंका येती वानरवीर ते ॥२०॥

शिखरैर्विकिरामैनां लंकां मुष्टिभिरेव वा।
इति स्म दधिरे सर्वे मनांसि हरिपुङ्गवा:॥२१॥

शिखरवर्षाव किंवा मुष्टिमाराने विदीर्ण।
करू लंकावासिया हा विचार वानरांचा असे॥२१॥
ततो रामो महातेजा: सुग्रीवमिदमब्रवीत्।
सुविभक्तामि सैन्यानि शुक एष विमुच्यताम्॥२२॥
श्रीराम महातेजस्वी सुग्रीवा म्हणे असे।
सेना सुव्यवस्थित आता शुक हा द्यावा सोडुनि ॥२२॥
रामस्य तु वच: श्रुत्वा वानरेन्द्रो महाबल:।
मोचयामास तं दूतं शुकं रामस्य शासनात्॥२३॥

ऐकुनी श्रीरामवचना वानरराज महाबली।
करी बन्धनमुक्त रावणदूता त्या शुका॥२३॥
मोचितो रामवाक्येन वानरैश्च निपीडित:।
शुक: परमसंत्रस्तो रक्षोधिपमुपागमत्॥२४॥
सुटता रामाज्ञेने शुक भयभीत पीडित।
वानरांकडुनी जाई पुन्हा राक्षसराजाकडे॥२४॥
रावण: प्रहसन्नेव शुकं वाक्यमुवाच ह।
किमिमौ ते सितौ पक्षौ लूनपक्षश्च दृश्यसे॥२५॥

कच्चिन्नानेकचित्तानां तेषां त्वं वशमागतः।

हसुनी रावण बोले शुकास वाक्य असे।

पंख तव दोन्ही कैसे दिसती बद्ध हे असे॥२५॥

चंचल वानरांच्या का सापडसी हातात तू?।

ततः स भयस्विग्नस्तेन राज्ञाभिचोदितः।

वचनं प्रत्युवाचेद राक्षसाधिपमुत्तमम्॥२६॥

रावणाने विचारता ऐसे दूत भयभीत।

राक्षसराजा श्रेष्ठ उत्तर देई असे॥२६॥

सागरस्योत्तरे तीरेऽब्रुवं ते वचनं तथा।

यथा संदेशमक्लिष्टं सान्त्वयन् श्लक्ष्णया गिरा॥२७॥

सागर उत्तर तीरे जाउनी संदेश आपला।

स्पष्ट शब्दे मधुर वाणी योजुनि मी सांगीतला॥२७॥

क्रुद्धैस्तैरहमुप्लुत्य दृष्टमात्रः प्लवङ्गमैः।

गृहीतोऽस्म्यपि चारब्धो हन्तुं लोप्तुंच मुष्टिभिः॥२८॥

होउनि पाहता क्रुद्ध मज त्वेषे पकडिले।

मारती मज मुष्टिने पंख उपटू लागती ॥२८॥

न ते सम्भाषितुं शक्या: सम्प्रश्नोऽत्र न विद्यते।

प्रकृत्या कोपनास्तीक्ष्णा वानरा राक्षसाधिप॥२९॥

स्वभावे तीक्ष्ण अन् कोपी संभाषण शक्य ना सवे।

त्यामुळे कसा विचारू त्यां का मजला मारता॥२९॥

स च हन्ता विराधस्य कबन्धस्य खरस्य च।

सुग्रीवसहितो राम: सीताया: पदमागत:॥३०॥

खर विराध कबन्धा वधुनी सीतेस शोधुनी।

परत नेण्या तिजला आले असती ते इथे॥३०॥

स कृत्वा सागरे सेतुं तीर्वा च लवणोदधिम्।
एष रक्षांसि निधूय धन्वी तिष्ठति राघवः॥३१॥

बान्धुनी सागरी सेतू करुनी पार येउनी।
राक्षसां क्षुद्र मानोनी धनुधारित राम इथे॥३१॥

ऋक्षवानरसङ्घानामनीकानि सहस्रशः।
गिरिमेघनिकाशानां छादयन्ति वसुंधराम्॥३२॥

विशालकाय अस्वल वानर सेनासहस्र ।

पर्वत मेघासम टाकती पृथ्वीस व्यापुनी॥३२॥

राक्षसानां बलौघश्च वानरेन्द्रबलस्य च।
नैतयोर्विद्यते संधिर्देवदानवयोरिव॥३३॥

राक्षस आणि वानर सन्धि असम्भव जसा।
देवता दानव यांचा मेळ जमणे अशक्य॥३३॥

पुरा प्राकारमायान्ति क्षिप्रमेकतरं कुरु।
सीतां चास्मै प्रयच्छाशु युद्धं वापि प्रदीयताम्॥३४॥

शिरण्यापुर्वी ते लंकेत शीघ्र एक काम करा।

सीतेस परत करा वा करा युद्ध त्यांच्यासवे॥३४॥

शुकस्य वचनं श्रुत्वा रावणो वाक्यमब्रवीत्।

रोषसंरक्तनयनो निर्दहन्निव चक्षुषा॥३५॥

वच ऐकुनी शुकाचे रावण बोलू लागला।

रागाने नेत्र लाल त्याचे होती इतके जणू।

करी दृष्टीने दग्ध रोखून पाहता त्याकडे॥३५॥

यदि मां प्रति युद्धेरन् देवगन्धर्वदानवा:।

नैव सीतां प्रदास्यामि सर्वलोकभयादपि॥३६॥

युद्धा स्तव जरी आले देवगन्धर्व दानव।

सीतेस न परत देईन सर्व लोकांच्या भये॥३६॥

कदा समभिधावन्त मामका राघवं शरा:।

वसन्ते पुष्पितं मत्ता भ्रमरा: इव पादपम्॥३७॥

जसे वसन्ती भ्रमर भिडती पुष्पित वृक्षां।

रामा तसे शर माझे लावतील पळवूनी॥३७॥

कदा शोणितदिग्धाङ्गं दीप्तै: कार्मुकविच्युतै:।

सरैरादीयिष्यामि उल्काभिरिव कुञ्जरम्॥३८॥

होईल तनु घायाळ तेजस्वी बाणांनी मम।

बाणानी जाळीन त्यास हत्तीस उल्का जशी॥३८॥

तच्चास्य बलमादास्ये बलेन महता वृत:।

ज्योतिषामिव सर्वेषां प्रभामुद्यन् दिवाकर:॥३९॥

उगवता सूर्य प्रभा नष्ट नक्षत्रांची जशी ।

तशी रामाची सेना ससैन्य उभा मी राहता ॥३९॥

सागरस्येव मे वेगो मारुतस्येव मे बलम्।

न च दाशरथिर्वेद तेन मां योद्धुमिच्छति॥४०॥

सागरासम मम वेग वायूसम मम बल।

न जाणे राम म्हुनी येई युद्धा मजसवे॥४०॥

न मे तूणीशयान् बाणान् सविषानिव पन्नगान्।

रामः पश्यति संग्रामे तेन मां योद्धुमिच्छति॥४१॥

भयंकर माझे बाण विषारी सर्पासम।

न पाहिल्यामुळे राम मजसी लढण्या येतसे॥४१॥

न जानाति पुरा वीर्यं मम युद्धे स राघवः।

मम चापमयीं वीणां शरकोणै: प्रवादिताम्॥४२॥
ज्याशब्दतुमुलां घोरामार्तगीतमहास्वनाम्।
नाराचतलसंनादां नदीमहितवाहिनीम्।
अवगाह्य महारङ्गं वादयिष्याम्यहं रणे॥४३॥

यापूर्वी मम युद्धात शौर्या राम न जाणत।
धनु माझे असे वीणा शरे वाजत ती असे॥४२॥
प्रत्यंचेचा टणत्कार स्वरलहरी भयंकर।
आर्तस्वर चीत्कार त्यावरी गीत वाजते।

सोडिता बाण जो नाद गीताचा ताल तो असे।
रंगभूमी रणावरी वीणा वाजेल मम॥४३॥
न वासवेनापि सहस्रचक्षुषा युद्धेऽस्मि शक्यो वरुणेन वा स्वयम्।
यमेन वा धर्षयितुं शराग्निना महाहवे वैश्रवणेन वा पुन:॥४४॥
न इन्द्रासहि सहस्रचक्षु वा साक्षात् वरुणा मजसवे युद्ध शक्य।
वा मम ज्येष्ठ बन्धु कुबेरहि न करु शके पराजित तीरांनी मज॥४४॥

इत्याचे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे चतुर्विंश: सर्ग:॥२४॥

युद्धकाण्ड सर्ग २५

सबले सागरं तीर्णे रामे दशरथात्मजे।
अमात्यौ रावण: श्रीमानब्रवीच्छुकसारणौ॥१॥

ससैन्य सागर राम ओलांडुनि आल्यावर।
शुक सारण अमात्या बोले रावण असे॥१॥

समग्रं सागरं तीर्णं दुस्तरं वानरं बलम्।
अभूतपूर्व रामेण सागरे सेतुबन्धनम्॥२॥

दुस्तर सागर येई कपिसेना ओलांडुनि।
अभूतपूर्व कार्य करी श्रीराम सेतुबन्धन ॥२॥
सागरे सेतुबन्धं तं न श्रद्दध्यां कथंचन ।
अवश्यं चापि संख्येयं त्नमया वानरं बलम्॥३॥
सेतुबन्धन ऐकाया अविश्वसनीय वाटले।
करणे अवश्य ज्ञात कपींचे संख्याबळ॥३॥
भवन्तौ वानरं सैन्यं प्रविश्यानुपलक्षितौ।
परिमाणं च वीर्यं च ये च मुख्या: प्लवङ्गमा:॥४॥

मन्त्रिणो ये च रामस्य सुग्रीवस्य च सम्मता:।
ये पूर्वमभिवरतन्ते ये च शूरा: प्लवङ्गमा:॥५॥
स च सेतुर्यथा बद्ध: सागरे सलिलार्णवे।
निवेशं च यथा तेषां वानराणां महात्मनाम्॥६॥
रामस्य व्यवसायं च वीर्यं प्रहरणानि च ।
लक्ष्मणस्य् च वीरस्य तत्त्वतो ज्ञातुमर्हथ:॥७॥
कथा सेनापतिस्तेषां वानराणां महात्मनाम्।
तच्च ज्ञात्वा यथातत्त्वं शीघ्रमागन्तुमर्हथ:॥८॥

तुम्ही वानरसैन्यात शिरुनी गुप्त राहुनी।
पहा संख्या बल तैसे कोण प्रमुख वानरे॥४॥
मन्त्री सुग्रीव रामाचे कोणते अनुकूल त्यां।
राहती कोणते शूर वीर सैन्यात अग्रणी॥५॥
सागरात कसा सेतु शकले बांधण्यास ते ।
कशी रचना सैन्याची निरीक्षण याचे करा॥६॥
राम लक्ष्मण काय करणार घेणे जाणुनी।

कोण् सेनापति त्यांचे मुख्य त्यांचे वीर्यबल॥७॥

शस्त्रबळ कसे त्यांचे करुनी सर्व ज्ञात हे।

यथार्थ होता ज्ञान शीघ्र परत या तुम्ही॥८॥

इति प्रतिसमादिष्टो राक्षसौ शुकसारणौ।

हरिरूपधरौ वीरौ प्रविष्टौ वानरं बलम्॥९॥

आदेशानुसार ऐश्या वानररूप घेउनी ।

शुक सारण राक्षस घुसती कपिसैन्यामध्ये॥९॥

ततस्तद् वानरं सैन्यमचिन्त्यं लोमहर्षणम्।

संख्यातुं नाध्यगच्छेतां तदा तौ शुकसारणौ॥१०॥

अतिशय मोठे सैन्य मोजण्या अशक्य असे।

त्यामुळे शुकसारण गणती न शकती करू॥१०॥

तत् स्थितं पर्वताग्रेषु निझरेषु गुहासु च।

समुद्रस्य च तीरेषु वनेषूपवनेषु च।

तरमाणं च तीर्णं च ततुकामं च सर्वशः॥११॥

पर्वताग्रे गुहांमध्ये वनात उपवनांमध्ये।

समुद्रा करुनी पार काही असति तीरावरी।

काही असती तयारीत ओलांडण्या सागर॥११॥

टीप: सर्व सैन्य सागर पार करून् आल्याचा उल्लेख पूर्वी झालेला असताना अजून काही सागर पार करत आहेत् हा उल्लेख चुकीचा वाटतो.

निविष्टं निविशच्चैव भीमनादं महाबलम्।

तबलार्णवमक्षोभ्यं ददृशाते निशाचरौ॥१२॥

तळ केलेले कोठे काही तयारीत त्या ।

समुद्रासम विशाल वानरवाहिनि त्यां दिसे॥१२॥

तौ ददर्श महातेजा: प्रतिच्छन्नौ बिभीषण:।

आचचक्षे स रामाय गृहीत्त्वा शुकसारणौ॥१३॥

ओळखे गुप्तरूपी त्यां तेजस्वी बिभीषण।
पकडुनी रामाकडे त्यां नेउनी वदला असे॥१३॥

तस्यैतौ राक्षसेन्द्रस्य मन्त्रिणौ शुकसारणौ।
लङ्काया: समनुप्राप्तौ चारौ परपुरंजय॥१४॥

लंकेतुन आलेले हे शुकसारण मन्त्रिद्वय।
गुप्तचर रावणाचे श्रीरामा परपुरंजया॥१४॥

तौ दृष्ट्वा व्यथितौ रामं निराशो जीविते तथा।
कृताञ्जलिपुटौ भीतौ वचनं चेदमुचतु:॥१५॥

पाहुनि रामा व्यथित निराश होउनि जीवनी।
भयाने जोडुनि हात वचन् ऐसे बोलले॥१५॥

आवामिहागतौ सौम्य रावणप्रहितावुभौ।
परिज्ञातुं बलं सर्वं तदिदं रघुनन्दन्॥१६॥

रावणाने धाडलेले आम्ही दोघे इथे तव ।
जाणण्या तव सैन्याची बल रचना कशी असे॥१६॥

तयोस्तद् वचनं श्रुत्वा रामो दशरथात्मज:।
अब्रवीत् प्रहसन् वाक्यं सर्वभूतहिते रत:॥१७॥

वचन ऐकुनि त्यांचे श्रीराम दशरथात्मज।
सर्वप्राणिहितदक्ष हंसुनी त्यांस बोलला॥१७॥
यदि दृष्टं बलं सर्वं वयं वा सुसमाहिता:।
यथोक्तं वा कृतं कार्यं छन्दत: प्रतिगम्यताम्॥१८॥
असेल पाहिली सेना आणि जाणले योग्य जे।
असेल तुमचे कार्य जाहले परता सुखे॥१८॥
अथ किंचिददृष्टं वा भूयस्तद् द्रष्टुमर्हथ:।
बिभीषणो वा कात्स्न्र्येन पुन: संदर्शतिषति॥१९॥

काही राहिले असेल तर पुन्हा बघून घ्या।
बिभीषण पूर्णरूपे सर्व दाखवील तुम्हा॥१९॥
न चेदं ग्रहणं प्राप्य भेतव्यं जीवितं प्रति।
न्यस्तशस्त्रौ गृहीतौ च न दूतौ वधमर्हथ:॥२०॥
जरी पकडले तुम्हा भिण्याचे नसे कारण।
शस्त्रहीन दूतांचा करणे वध योग्य नसे ॥२०॥
प्रच्छन्नौ च विमुञ्चेनौ चारौ रात्रिंचरावुभौ।
शत्रुपक्षस्य सततं बिभीषण विकर्षिणौ॥२१॥

शत्रुपक्षाचे हे हेर येती फूट पाडावया।
कळे गुपित तयांचे तेव्हांसोडुनि द्या तयां॥२१॥
प्रविश्य महतीं लङ्कां भवद्भ्यां धनदानुज:।
वक्तव्यो रक्षसां राजा यथोक्तं वचनं मम॥२२॥
शुक सारण तुम्ही दोघे लंकेत पोचाल तदा।
कुबेर कनिष्ठ बन्धूस संदेश मम द्याल हा॥२२॥
यद् बलं त्वं समाश्रित्य सीतां मे हृतवानसि।
तद् दर्शय यथाकामं ससैन्यश्च सबान्धव:॥२३॥

बळावर ज्या केलेस सीतेचे अपहरण तू।
तेच् दाखव आता सैन्य बन्धुजनांसवे॥२३॥
श्व: काल्ये नगरी लङ्कां सप्राकारां सतोरणाम्।
रक्षसां च बलं पश्य शरैर्विध्वंसितं मया॥२४॥
उद्या प्रात:काली लंका प्राकार तोरणांसह ।
दिसेल उध्वस्त झालेली मम बाणे सेनेसह॥२४॥
क्रोधं भीममहं मोक्ष्ये ससैन्ये त्वयि रावण।
श्व: काल्ये वज्रवान वज्रं दानवेष्विव वासव:॥२५॥

प्रात:काली उद्या मी सैन्यासह क्रोध भयंकर।
सोडीन तुम्हावर जसा इन्द्र वज्र दानवावरी॥२५॥
इति प्रतिसमादिष्टौ राक्षसौ शुकसारणौ।
जयेति प्रतिनन्यैनं राघवं धर्मवत्सलम् ॥२६॥
आगम्य नगरीं लङ्कामब्रूतां राक्षसाधिपम्।
सन्देश हा घेऊनी शुकसारण राक्षस।
करीत जयजयकारा धर्मवत्सल रामाच्या ॥२६॥
लङ्कापुरी येउनी वदती राक्षसराजा असे।

बिभीषणगृहीतौ तु वधार्थं राक्षसेश्वर॥२७॥

दृष्ट्वा धर्मात्मना मुक्तौ रामेणामिततेजसा।

बिभीषणे धरले आम्हा वधण्या राक्षसेश्वर॥२७॥

धर्मात्मा श्रीराम परी पाहता सोडवी आम्हा।

एकस्थानगता यत्र चत्वार: पुरुषर्षभा:॥२८॥

लोकपालसमा: शूरा: कृतास्त्रा दृढविक्रमा:।

रामो दाशरथि: श्रीमान्ल्लक्ष्मणश्च बिभीषण:॥२९॥

सुग्रीवश्च महातेजा महेन्द्रसमविक्रम:।

एते शक्ता: पुरीं लंकां सप्राकारां सतोरणाम्॥३०॥

उत्पाट्य संक्रामयितुं सर्वे तिष्ठन्तु वानरा:।

श्रीराम दशरथपुत्र लक्ष्मण बिभीषण॥२८॥

महेन्द्रतुल्य सुग्रीव हे चार पुरुषर्षभ।

शौर्यशाली पराक्रमी लोकपालासम जिथे॥२९॥

येती एकत्र तिथे असे बिजय निश्चित।

सर्व वानर नसले तरी चारच वीर हे॥३०॥

प्राकारा तोरणासह उखडण्या शकती पुरी।
यादृशं तद्धि रामस्य रूपं प्रहरणानि च॥३१॥
वधिष्यति पुरीं लङ्कामेकस्तिष्ठन्तु ते त्रय:।
असे श्रीरामाचे रूप अस्त्रसिद्धता तशी॥३१॥
एकटाच तिघाविण वाटे वधेल लंकापुरी।
रामलक्ष्मणगुप्ता सा सुग्रीवेण च वाहिनी।
बभूव दुर्धर्षतरा सर्वैरपि सुरासुरै:॥३२॥
श्रीराम लक्ष्मण सुग्रीवे रक्षित कपिसैन्य ते।

सर्व देवतां असुरांना असे दुर्जय निश्चित॥३२॥

प्रहृष्टयोधा ध्वजिनी महात्मनां वनौकसां सम्प्रति योद्धुमिच्छताम्।
अलं विरोधेन शमो विधीयतां प्रदीयतां दाशरथाय मैथिली॥३३॥

युद्धास उत्सुक वानर सर्व त्यांचे प्रसन्न वीर त्यांस करता विरोध।
न लाभ होइल आपणाला द्यावे सीतेस परत करुनि संधि तयांसवे॥३३॥

इत्याचे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे पञ्चविंश: सर्ग:॥२५॥

युद्धकाण्ड् सर्ग २६

तद्वचं सत्यमक्लीबं सारणेनाभिभाषितम्।
निशम्य रावणो राजा प्रत्यभाषत सारणम्॥१॥

सत्य ठाशीव बोल सारणाचे ते ऐकुनी।
रावण विचारे आपल्या सारणा वदे असे॥१॥

यदि मामभियुञ्जीरन् देवगन्धर्वदानवा:।
नैव सीतामहं दद्यां सर्वलोकभयादपि॥२॥

देव दानव गन्धर्व मजसवे युद्धास्तव ।
येती तरी न देणार सीतेस मी लोकभये॥२॥
त्वं तु सौम्य परित्रस्तो हरिभि: पीडितो भृशम्।
प्रतिप्रदानमद्यैव सीताया: साधु मन्यसे॥३॥
को हि नाम सपत्नो मां समरे जेतुमर्हति।
दिसते तुम्हा कपींनी त्रस्त केले भयंकर।
म्हणुनी सीतेस परत करणे योग्य वाटते॥३॥
असा कोण असे मज रणाङ्गणि जिंकू शके।

इत्युक्त्वा परुषं वाक्यं रावणो राक्षसाधिप:॥४॥
आरुरोह तत: श्रीमान् प्रासादं हिमपाण्डुरम्।
बहुतालसमुत्सेथं रावणोऽथ दिदृक्षया॥५॥

बोलून् कठोर वाक्य राक्षसराज रावण॥४॥
निरीक्षण्या वानरसेना महाली उंच आपल्या।
हिमासम शुभ्र रंगाच्या चढुनी तो जातसे ॥५॥

ताभ्यां चराभ्यां सहितो रावण: क्रोधमूर्च्छित:।
पश्यमान: समुद्रं तं पर्वताश्च वनानि च॥६॥

ददर्श पृथिवीदेशं सुसम्पूर्ण प्लवङ्गमै:।
अतिसंतप्त होऊन दोघा गुप्तचरांसवे।
पाही समुद्र पर्वत वन तदा त्यास दिसे॥६॥
पृथिवीदेश सर्वत्र कपिंनी भरलेला दिसे।
तदपारमसह्यं च वानराणां महाबलम्॥७॥
आलोक्य रावणो राजा परिपप्रच्छ सारणम्।
अपार् आणि असह्य विशाल सेना पाहुनी॥७॥
राजा रावण विचारी सारणास विचारी असे।

एषां के वानरा मुख्या: के शूरा: के महाबला:॥८॥

कोण यातिल कपिमुख्य आणि शूर महाबली॥८॥

के पूर्वमभिवर्तन्ते महोत्साहा: समन्तत:।

केषां श्रुणोति सुग्रीव: के वा यूथपयूथपा:॥९॥

सारणाचक्ष्व मे सर्वं किंप्रभावा: प्लवङ्गमा:।

युद्धात महोत्साही पुढे राहति कोण ते।

कुणाचे सुग्रिव ऐके मुख्य कोण त्यातील॥९॥

तैसा सांग प्रभाव कोणत्या कपिचा असे।

सारणो राक्षसेन्द्रस्य वचनं परिपृच्छत:॥१०॥

आबभाषेऽथ मुख्यज्ञो मुख्यास्तत्र वनौकस:।

रावणाचे वचन हे ऐकून सारण सांगे॥१०॥

मुख्य मुख्य वानर जे देई त्यांचा परिचय ।

एष योऽभिमुखो लङ्कां नर्दतिष्ठति वानर:॥११॥

यूथपानां शहस्राणां शतेन परिवारित:।

यस्य घोषेण महता सप्राकारा सतोरणा॥१२॥

लङ्का प्रतिहता सर्वा सशैलवनकानना।

सर्वशाखामृगेन्द्रस्य सुग्रीवस्य महात्मनः॥१३॥
बलाग्रे तिष्ठते वीरो नीलो नामैष यूथपः।
लंकेकडे मुख करुनी उभा गर्जत जो असे॥११॥
दिसतो तो घेरलेला लक्ष वानरवीरांनी।
गर्जनेने ज्याच्या गम्भीर प्राकार तोरणांसह॥१२॥
पर्वत वनांसहित लंका दुमदुमत असे।
वानराधिप सुग्रीवापुढे उभा जो असे॥१३॥

नील नावाचा तो वीर वानरांचा सेनापती।

बाहू प्रगृह्य यः पद्भ्यां महीं गच्छति वीर्यवान्॥१४॥

लङ्कामभिमुखः कोपादभीक्ष्णं च विजृम्भते।

गिरिशृंगप्रतीकाशः पद्मकिंचजल्कसंनिभः॥१५॥

स्फोटयत्यतिसंरब्धो लाङ्गलं च पुनः पुनः।

यस्य लाङ्गलशब्देन स्वनन्ति प्रदिशो दश॥१६॥

एष वानरराजेन सुग्रीवेणाभिषेचितः।

युवराजोऽङ्गदो नाम त्वामाह्वयति संयुगे॥१७॥

दोन्ही पसरुनि बाहू जो असे चालत भूवरी॥१४॥
लंकेकडे मुख करुनी क्रोधाने जो पाहतसे।
असे शरीर ज्याचे भव्य गिरिशिखरापरी॥१५॥
सुवर्णकान्ति ज्याची कमलकेसरापरी।
क्रोधाने आपटे पुच्छ नादे त्या घुमती दिशा॥१६॥
असे युवराज अङ्गद तो सुग्रीवे अभिषेचित।
आपणासवे युद्धास्तव ललकारी तो पुन्हा पुन्हा॥१७॥

वालिनः सदृशः पुत्रः सुग्रीवस्य सदा प्रियः।
राघवार्थे पराक्रान्तः शक्रार्थे वरुणो यथा॥१८॥

वालीसम बलशाली पुत्र सुग्रीवास असे प्रिय।
पराक्रम रामास्तव करण्या उत्सुक तो असे।
जसा वरुण इन्द्रास्तव करण्या उद्यत असे॥१८॥

एतस्य सा मतिः सर्वां यद् दृष्ट्वा जनकात्मजा।
हनूमता वेगवता राघवस्य हितैषिणा॥१९॥

हनुमान राघवाचा हितैषी लंकेत येऊनि।
अंगदाच्याच सल्ल्याने सीतादर्शन करी॥१९॥
बहूनि वानरेन्द्राणामेष यूथानि वीर्यवान्।
परिगृह्याभियाति त्वां स्वेनानीकेन मर्दितुम्॥२०॥
अनेक वानरयूथ सेनेसह येत अङ्गद।
युद्धात आपणाशी करण्या झुंज येतसे॥२०॥
अनुवालिसुतस्यापि बलेन महता वृत:।
वीरस्तिष्ठति संग्रामे सेतुहेत्तुरयं नल:॥२१॥

अंगदाच्या उभा मागे विशाल सेनेसह नल।
रणभूमीवरी तोच सेतु निर्मिति प्रमुख जो॥२१॥
ये तु विष्टभ्य गात्राणि क्ष्वेडयन्ति नदन्ति च।
उत्थाय च विजृम्भन्ते क्रोधेन हरिपुङ्गवा:॥२२॥
एते दुष्प्रसह्य घोराश्चण्डाश्चण्डपराक्रमा:।
अष्टौ शतसहस्राणि दशकोटिशतानि च।
य एनमनुगच्छन्ति वीराश्चन्दनवासिन:॥२३॥
एषैवाशंसते लङ्कां स्वेनानीकेन मर्दितुम।

जे करती सिंहनाद स्थिर गात्रे करुनीया ।
किंवा आसनावरुनी उठुनी क्रोधे नाचती।
असती भयंकर क्रोधी प्रचंड पराक्रमी।
असति दश अरब संख्येने अष्ट लक्ष ते।
सर्व वानरांसह जे चन्दनवनी वानर ।
अनुसरती यूथ नला जो सेनेसह् आपुल्या।
उध्वस्त करण्या लंका असे अतीव उत्सुक॥२२.२३ १/२॥

श्वेतो रजतसंकाशश्चपलो भीमविक्रम:॥२४॥
बुद्धिमान् वानर: शूरस्त्रिषु लोकेषु विश्रुत:।
तूर्ण सुग्रीवमागम्य पुनर्गच्छति वानर:॥२५॥
विभजन वानरी सेनामनीकानि प्रहर्षयन्।

चान्दीपरी शुभ्र वर्ण चपल भीमपराक्रमी॥२४॥
बुद्धिवान वानर शूर विख्यात लोकी तिन्ही।
सुग्रीवाजवळी वेगे श्वेत नामे तो येतसे॥२५॥

विभागुनि कपि सेना उत्साहित् करी तयां।
यः पुरा गोमतीतीरे रम्यं पर्येति पर्वतम्॥२६॥
नाम्ना संरोचनो नाम नानानगयुतो गिरिः।
तत्र राज्यप्रशास्त्वेष कुमुदो नाम यूथपः॥२७॥
गोमती तिरी पूर्वी जो संरोचन नाम पर्वती।
रमणीय त्याभवती विहार करत असे।
अधिपति तेथील कपींचा कुमुद नामे जो असे॥२७॥
योऽसौ शतसहस्राणि सहर्ष परिकर्षति।

यस्य वाला बहुव्यामा दीर्घलाङ्गलमाश्रिता:॥२८॥
ताम्रा: पीता: सिता: श्वेता: प्रकीर्णा घोरदर्शना:।
अदीनो वानरश्चण्ड: संग्रामभिकाङ्क्षति।
एषोऽप्याशंसते लङ्कां स्वेनानीकेन मर्दितुम॥२८॥
लक्ष वानरांना सहर्ष नेई जो आपल्यासवे।
दीर्घ शेपटीत ज्याच्या लाल पिवळे पांढरे॥२८॥
भुरक्या रंगाचे केस दिसे ती अतिभयंकर।
चण्ड नामक वानर युद्धास उत्सुक सदा।

आपल्या सेनेसह जो लंका मर्दण्या उत्सुक॥२९॥

यस्त्वेष सिंहसंकाश: कपिलो दीर्घकेसर:।
निभृत: प्रेक्षते लङ्कां दिधक्षन्निव चक्षुषा॥३०॥
विन्ध्यं कृष्णगिरिं सह्यं पर्वतं च सुदर्शनम्।
राजन् सततमध्यास्ते स रम्भो नाम यूथप:।
शत् शतसहस्राणां त्रिंशच्च हरिपुङ्गवा:॥३१॥
यं यान्तं वानरा घोराश्चंडाश्चंडपराक्रमा:।
परिवार्यानुगच्छन्ति लङ्कां मर्दितुमोजसा॥३२॥

सिंहासम पराक्रमी कपिलवर्णी मानेवरी।
लांब केस ज्याच्या ध्यान लावुनि जो लंकेकडे।
पाही जणु भस्म करी रम्भ नाम यूथपति।
राही सदा विंध्य सह्य कृष्णगिरि सुदर्शन।
पर्वतांवरी त्यासंगे तीस कोटि पराक्रमी।
वानर चालति त्यास घेरुनि सर्व बाजुनी॥
सर्व तीव्र इच्छेने लंका कुचलण्यास्तव॥३०-३२॥

यस्तु कर्णौ विवृणुते जृम्भते च पुन: पुन:।
न तु संविजते मृत्योर्न च सेनां प्रभावति॥३३॥
प्रकम्पते च रोषेण तिर्यक् च पुनरीक्षते।
पश्य लाङ्गलविक्षेपं क्ष्वेडत्येष महाबल:॥३४॥

पसरी कर्णा देऊनी जांभया अनेकदा।
नसे भीत तो मृत्यूस रागाने कांपत असे॥
न विसंबी सेनेवर् टाकी तिर्यक् दृष्टि तो।
पुच्छ आपटि सिंहनाद करी शरभ तो असे॥३३-३४॥

महाजवो वीतभयो रम्यं साल्वेयपर्वतम्।
राजन् सततमध्यास्ते शरभो नाम् यूथप:॥३५॥
महावेग ज्याचा अति निर्भय जो असे।
साल्वेय पर्वतावरी शरभ तो रहातसे॥३५॥
एतस्य बलिन: सर्वे इहारा नाम् यूथपा:।
राजन् शतसहस्राणि चवारिंशत्तथैव च॥३६॥
त्याच्याजवळी असती विहार नाम यूथपति।
बलवान एकलक्ष चाळीस सहस्र मोजता॥३६॥

यस्तु मेघ इवाकाशं महानावृत्य तिष्ठति।
मध्ये वानरवीराणां सुराणामिव वासवः॥३७॥
भेरीणामिव संनादो यस्यैव श्रूयते महान्।
घोषः शाखामृगेन्द्राणां संग्रामभिकाङ्क्षताम्॥३८॥
एष पर्वतमध्यास्ते पारियात्रमनुत्तमम्।
युद्धे दुष्प्रसहो नित्यं पनसो नाम यूथपः॥३९॥
एनं शतसहस्राणां शतार्थ पर्युपासते।
यूथपा यूथपश्रेष्ठं येषां यूथानि भागशः॥४०॥

विशाल वानर उभा जो आकाशी घनासम।
वानरवीरांच्या मध्ये जणु इन्द्र देवांमध्ये॥३७॥
गम्भीर गर्जना ज्याची भेरी तुमुल नादासम।
युद्धोत्सुक वानरांत आणि युद्धात दु:सह जो॥३८॥
पारियात्र नामे उत्तम पर्वतावरि जो वसे।
यूथपति पनस जो असे युद्धात दु:सह॥३९॥
सेवेत पन्नास लाख यूथपति असती तया।

ज्यांचे वीर अनेक असती वेगवेगळे॥४०॥

यस्तु भीमां प्रवल्गंति चमू तिष्ठति शोभयन्।
स्थितां तीरे समुद्रस्य द्वितीय इव सागरः॥४१॥
एष दर्दुरसंकाशो विनतो नाम् यूथपः।
पिबंश्चरति यो वेणां नदीनामुत्तमां नदीम्॥४२॥
षष्टिः शतसहस्राणि बलमस्य प्लवङ्गमाः।

सागरतीरी भीषण सेना उसळत जी असे।
दुसऱ्या समुद्रापरी करीत तिज सुशोभित॥४१॥

दर्दुर पर्वतापरी उभा विनत नाम यूथपति।
पीतसे जो जल श्रेष्ठ नदीचे वेणा नाम् जी॥४२॥
असती सैनिक त्याचे साठ लक्ष वानर ।
त्वामाह्वयति युद्धाय क्रोधनो नाम् वानर:॥४३॥
विक्रान्ता बलवन्तश्च यथा यूथानां भागश:।
ललकारी युद्धास्तव क्रोधन नामे वानर॥४३॥
त्याचे यूथपति बलिष्ठ अनेक यूथांसह।
यस्तु गैरिकवर्णाभं वपु: पुष्यति वानर:॥४४॥

अवमत्य सदा सर्वान् वानरान् बलदर्पित:।
गवयो नाम तेजस्वी त्वां क्रोधादभिवर्तते॥४५॥
एनं शतसहस्राणि सप्तति: पर्युपासते।
एषैवाशंसते लङ्कां स्वेनानीकेन मर्दितुम्॥४६॥

गेरूसम रंग लाल त्वचा ज्याची तो वानर॥४४॥
इतरां तुच्छ लेखी घमेंडी स्वबलावर
गवय नामे तेजस्वी रोषे पढति जातसे॥४५॥
असती सेवेत त्याच्या सात सहस्र वानर।

लंकेस धूळ चारण्याची त्याचीही इच्छा असे॥४६॥

एते दुष्प्रसहा वीरा येषां संख्या न विद्यते।

यूथपा यूथपश्रेष्ठास्तेषां यूथानि भागश:॥४७॥

सर्व हे दु:सह वीर असती जे अगणित।

यूथपतींतिल श्रेष्ठ त्यांचेही वेगवेगळे॥४७॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे षड्विंश: सर्ग:॥२६॥

युद्धकाण्ड सर्ग २७

तांस्तु ते सम्प्रवक्ष्यामि प्रेक्षमाणस्य यूथपान् ।
राघवार्थे पराक्रान्ता ये न रक्षन्ति जीवितम्॥१॥
निरीक्षण ज्यांचे करता यूथपतींचा करुनी।
देतो परिचय तुम्हा लढती राघवासाठि जे
पराक्रम करता पर्वा जीवाची जे न करीति ते॥१॥
स्निग्धा यस्य बहुव्यामा दीर्घलाङ्गलमाश्रिता:।

ताम्रा: पीता: सिता: श्वेता: प्रकीर्णा: घोरकर्मण:॥२॥

प्रगृहीता: प्रकाशन्ते सूर्यस्येव मरीचय:।

पृथिव्यां चानुकृष्यन्ते हरो नामैष वानर:॥३॥

यं पृष्ठतोऽनुगच्छन्ति शतशोऽथ सहस्रश:

वृक्षानुद्यम सहसा लङ्कारोहणतत्परा:॥४॥

यूथपा हरिराजस्य किंकरा: समुपस्थिता:।

हर नामक वानर ज्याचे कर्म भयंकर ।

लाम्ब पुच्छावरी ज्याच्या केशही लांब पुष्कळ॥२॥

लाल पिवळे शुभ्र भुरे सर्वत्र पसरती।
चमकती सूर्यकिरणापरी भूमीही झाडती॥३॥
अनुसरती तयास यूथपति सहस्रावधि।
पाठीशी चालती त्यांच्या अनेक त्यांचे सेवक॥४॥
वृक्षासह लंकेवर करण्यास आक्रमण।
नीलानिव महामेघांस्तिष्ठतो यांस्तु पश्यसि॥५॥
असिताञ्जनसंकाशात् युद्धे सत्यपराक्रमान्।
अस्ख्येयाननिर्देशान् परं पारमिवोदधेः॥६॥

पर्वतेषु च ये केचिद् विषयेषु नदीषु च।
एते त्वामभिवर्तन्ते राजन्नृक्षा सुदारुणा:॥७॥
एषां मध्ये स्थितो राजन् भीमाक्षो भीमदर्शन:।
पर्जन्य इव जीमूतै: समन्तात् परिवारित:॥८॥
ऋक्षवन्तं गिरिश्रेष्ठमध्यास्ते नर्मदा पिबम्।
सर्वाणामधिपतिर्धूमो मानैष यूथप:॥९॥
कृष्णवर्ण महामेघ उभे जे पाहता तुम्ही ॥५॥
अञ्जनासम रुक्ष जे असती युद्धे पराक्रमी।

असंख्य त्यामुळे स्वतंत्र निर्देश न करीतसे॥६॥
असती पर्वतावरी भूमीवरी नदीतीरी।
रीछ भयंकर येती चालुनी आपल्यावरी॥७॥
त्यांच्या मध्ये उभा राजा भयानक जो दिसे।
इन्द्रासम कृष्ण मेघे कृष्ण अस्वले भोवती॥८॥
धूम्र नावाचा अस्वलराज ऋक्षावान् गिरीवरी।
राहतसे आणि जल नर्मदेचे पीत तो असे॥९॥

यवीयानस्य तु भ्राता पशैनं पर्वतोपमम्।
भ्राता समानो रूपेण विशिष्टस्तु पराक्रमे॥१०॥
स एष जाम्बवान् नाम महायूथपयूथप:।
प्रशान्तो गुरुवर्ती च सम्प्रहारेष्वमर्षण॥११॥

धूम्राचा कनिष्ठ बन्धु जाम्बवान् पर्वतासम।
भ्रात्यासम दिसणारा त्याच्याहून पराक्रमी ॥१०॥
स्वभावे शान्त तो राही गुरुजन आज्ञेमध्ये।
युद्धात् त्याचा रोष पराक्रम मात्र वाढवी॥११॥

एतेन साह्यं तु महत् कृतं शक्रस्य धीमता।
दैवासुरे जाम्बवता लब्धाश्च बहवो वराः॥१२॥
देवासुर संग्रामे तो इन्द्रास साह्य करी।
आणि त्यामुळे त्यास प्राप्त अनेक वर ॥१२॥
आरुह्य पर्वताग्रेभ्यो महाभ्रविपुलाः शिलाः।
मुञ्चन्ति विपुलाकारा न मृत्योरुद्विजन्ति च॥१३॥
राक्षसानां सदृशाः पिशाचानां च रोमशाः।
एतस्य सैन्या बहवो विचरन्त्यमितौजसाः॥१४॥

विचरती बहु सैनिक बलशाली पराक्रमी।
पिशाचा राक्षसापरी क्रूर पर्वतशिखरावरी॥१३॥
चढुनी विशाल शिला महान् मेघापरी।
सोडती शत्रूवर ना मृत्यूचे त्या असे भय॥१४॥
य एनमभिसंरब्धं प्लवमानमव्यवस्थितम्।
प्रेक्षन्ते वानरा: सर्वे स्थिता यूथपयूथपम्॥१५॥
एष राजन् सहस्राक्षं पर्युपास्ते हरीश्वर:।
बलेन बलसंयुक्तो दम्भो नामैष यूथप:॥१६॥

जो असे उड्या मारत कधी स्थिर असे उभा।
सर्व वानर आश्चर्ये ज्यास असती पाहत॥१५॥
यूथपति दम्भ नाम इन्द्राची सेवा करीतसे।
सैन्य पाठवुनि आपले उपासना त्याची करी॥१६॥
य: स्थितं योजने शैलं गच्छन् पार्श्वेन सेवते।
ऊर्ध्वं तथैव कायेन गत: प्राप्नोतो योजनम्॥१७॥
यस्मात् तु परमं रूपं चतुष्पात्सु न विद्यते।
श्रुत: संनादनो नाम् वानराणां पितामह:॥१८॥

येन् युद्धं तदा दत्तं रणे शक्रस्य धीमता।
पराजयश्च न प्राप्त: सोऽयं यूथपयूथप:॥१९॥

उभा राहुनि योजन दूर पर्वता जो करी ।
पार्श्वभागे स्पर्श तैसा उंचही एक योजन॥१७॥

एवढे विशाल् रूप चतुष्पादात कुणा नसे।
संनादन नामे जाणा वानरांचा पितामह॥१८॥

एकदा इन्द्रास रणी युद्धास आह्वायिता।

पराभूत न झाला हा सरदार यूथपतिंचा॥१९॥

टीप: अतिशयोक्तिपूर्ण वर्णन योजन म्हणजे१२ ते १३ किलोमिटर एवढा उंच आणि लठ्ठ प्राणी अकल्पनीय.

यस्य विक्रममाणस्य शक्रस्येव पराक्रम:।
एष गन्धर्वकन्यायामुत्पन्न: कृष्णवर्त्मना॥२०॥
तदा देवासुरयुद्धे साह्यार्थं त्रिदिवौकसाम्।
यत्र वैश्रवणो राजा जम्बूमुपनिषेवते॥२१॥
यो राजा पर्वतेन्द्राणां बहुकिन्नरसेविनाम्।
विहारसुखदो नित्यं भ्रातुस्ते राक्षसाधिप्॥२२॥

तत्रैश रमते श्रीमान् बलवान् वानरोत्तम:।
युद्धेष्वकत्थनो नित्यं क्रथनो नाम यूथप:॥२३॥
वृत: क्ष्विप्टसहस्रेण हरीणां समवस्थित:॥
एषैवाशंसते लङ्कां स्वेनानीकेन मर्दितुम॥२४॥

पराक्रम इन्द्रासम युद्धात त्याचा दिसतसे।
देवतासुर युद्धात् देवतांना सहाय्यार्थ ।
गन्धर्वकन्येपासून अग्निदेव निर्मी जया।
असे क्रथन नावाचा यूथपति तो पहा।

करती किन्नर् सेवा जो राजा महापर्वती।
बन्धु आपला कुबेर जिथे विहार करीतसे।
तसेच आराम करी ज्या जम्बुवृक्षाखाली ।
त्याचखाली क्रथन हा आराम करीतसे।
दहा अरब वानर असती त्याच्या सभोवती।
त्यांच्या सहाय्ये वांछी करण्या लंकामर्दन॥२०-२४॥
यो गंगामनुपर्येति त्रासयन् गजयूथपान्।

हस्तिनां वानराणां च पूर्ववैरमनुस्मरन्॥२५॥
एष यूथपतिर्नेता गर्जन गिरिगुहाशयः।
गजान् रोधयते वन्यानारुजंश्च महीरुहान्॥२६॥
हरीणां वाहिनीमुख्यो नदीं हैमवतीमनु।
उशीरबीजमाश्रित्य मन्दरं पर्वतोत्तमम्॥२७॥
रमते वानरश्रेष्ठो दिवि शक्र इव स्वयम्।
एनं शतसहस्राणां सहस्रमभिवर्तते ॥२८॥
वीर्यविक्रमदृप्तानां नर्दतां बाहुशालिनाम्।

स एष नेता चैतेषां वानराणां महात्मनाम्॥२९॥

स एष दुर्धरो राजन् प्रमाथी नाम् यूथप:।

वातेनेवोद्धतं मेघं यमेनमनुपश्यसि॥३०॥

अनीकमपि संरब्धं वानरानां तरस्विनाम्।

उद्धूतमरुणाभासं पवनेन समन्तत:॥३१॥

विवर्तमानं बहशो यत्रैतबहुलं रज:।

हस्ति वानर यांचे पूर्वीचे स्मरुनी वैर्।

गंगाकिनारी राहून त्रासवी गजयूथपां॥

उखडुनी वनातिल वृक्ष पुढे येण्या गजां।
अडवी यूथपतीनेता गर्जना करुनी महा॥
उशीरबीज पर्वत असे जो गंगातटी।
तसेच मंदराचलाच्या आश्रये राहत असे॥
वानरात त्याचे स्थान इन्द्रासम देवांमधे।
वीर दुर्जय प्रमाथी नाम् यूथपति असे॥
असती दश करोड वानर त्याच्यासवे।

त्याच्या बल पराक्रमाचा करती गर्व ते॥
तो असे वानरांचा त्या नेता जे महाबली।
वायुवेगे उडणाऱ्या ज्याला आपण पहाता॥
तसेच वानरसेना ज्याची पाहतसे रोषे।
सेनेमुळे उडे जी धूळ ज्याच्याजवळी पडे॥
तोच वीर असे हा प्रमाथी नाव ज्या असे॥२५-३१ १/२॥
एतेऽसितमुखा घोरा गोलाङ्गला महाबला:॥३२॥

शतं शतसहस्राणि दृष्ट्वा वै सेतुबन्धनम्।
गोलाङ्गुल महाराज दवाक्षं नाम् यूथपम्॥३३॥
परिचार्याभिनर्दन्ते लंकां मर्दितुमोजसा।
मुख कृष्ण असे ज्यांचे लंगूर ज्ञाति वानर।
महान बलशाली जे असती एक करोड।
गवाक्ष नामक नेता असे त्याच्याभोवती।
सेतुबन्धना साह्य ज्याचे झालेले असे॥३२-३३ १/२॥
भ्रमराचरिता यत्र सर्वकालफलद्रुमा:॥३४॥

यं सूर्यस्तुल्यवर्णाभमनुपर्येति पर्वतम्।
यस्यभासा सदा भान्ति तद्वर्णा मृगपक्षिण:॥३५॥
यस्य प्रस्थं महात्मानो न त्यजन्ति महर्षय:।
सर्वकामफला वृक्षा: सदा फलसमन्विता:॥
मधूनि च महार्हाणि यस्मिन् पर्वतसत्तमे।
तत्रैष रमते राजन् रये काञ्चनपरवते॥३७॥
मुख्यो वानरमुख्यानां केसरी नाम् यूथप:।
गिरीवरि ज्या दिसती वृक्ष फलदायी सदा।

वृक्ष भ्रमरसेवित करी सूर्य प्रदक्षिणा।
सुवर्णकान्ति जेथील मृग पक्षी ज्याच्यामुळे ।
कधी न त्यजिती महात्मा महर्षिगण।
कारण तेथिल वृक्ष सदैव जे फलयुक्त्।
उपलब्ध बहुमूल्य मधु श्रेष्ठ शैल्य जे।
काञ्चनपर्वती रम्य रमत असे जो सदा।
वानरमुख्यांचा मुख्य यूथपति केसरी॥३४-३७ १/२॥

शष्टिर्गिरिसहस्राणि रम्या: काञ्चनपरवता:॥३८॥

तेषां मध्ये गिरिवरस्त्वमिवानघ रक्षसाम्।

पर्वत साठ हजार सुवर्णमय त्यातिल।

सावर्णिमेरु असे नामे एक श्रेष्ठ त्यातिल॥३८॥

राक्षसांमधे आपण श्रेष्ठ जसे तो तसा ।

तत्रैके कपिला: श्वेतास्ताम्रास्या मधुपिङ्गला:॥३९॥

निवसन्त्यन्तिमगिरौ तीक्ष्णदंष्ट्रा नखायुधा:।

सिंहा इव चतुर्दंष्ट्रा व्याघ्रा इव दुरासदा:॥४०॥

सर्वे वैश्वानरसमा ज्वलदाशीविषोपमा:।
सुदीर्घाञ्चितलाङ्गला मत्तमातङ्गसंनिभा:॥४१॥
महापर्वतसंकाशा महाजीमूतनि:स्वना:॥४२॥
मर्दमन्तीव ते सर्वे तस्थुर्लंकां समीक्ष्य ते।
अन्तीम शिखरावरी भुरे लाल श्वेत पिङ्गल॥३९॥
मुखवर्णी तीक्ष्णदंष्ट्र नख वाले राहती कपि।
सिंहासम चतुर्दंष्ट्रा व्याघ्रासम दुर्जय॥४०॥
विषारी सर्पासम क्रोधी तेजस्वी अग्नीसम।

पुच्छ अतिदीर्घ मत्त गजासम पराक्रमी॥४१॥

पर्वतासम विशाल शरीर ज्यांचे सुदृढ।

पिङ्गलनेत्र ज्यांचे चालता ये महाध्वनी॥४२॥

असती उत्सुक सर्व करण्या लंकामर्दन।

एष चैषामधिपतिर्मध्ये तिष्ठति वीर्यवान्॥४३॥

जयार्थी नित्यमादित्यमुपतिष्ठति वीर्यवान्।

नाम्ना पृथिव्यां विख्यातो राजन् शतबलीति यः॥४४॥

सेनापति उभा मध्ये बलवान पराक्रमी॥४३॥

उपासना करी सूर्याची विजयप्राप्तिस्तव।
राजन् तो पृथ्वीवर विख्यात नामे शतबलि॥४४॥
एषैवाशंसते लङ्कां स्वेनानीकेन मर्दितुम्।
विक्रान्तो बलवान् शूर: पौरुषे स्वे व्यवस्थित:॥४५॥
रामप्रियार्थं प्राणानां दयां न कुरुते हरि:।
विक्रमी बलवान् शूर पौरुषे पूर्ण सुस्थित।
इच्छी जिंकण्या लंका सेनेसह आपल्या॥४५॥
रामास्तव युद्धी कोणा दया न जो दाखवी।

गजो गवाक्षो गवयो नलो नीलश्च वानर:॥४६॥

एकैकमेव योधानां कोटिभिर्दशभिर्वृत:।

गज गवाक्ष नल नील हे सर्व सेनापति॥४६॥

प्रत्येकापाशी असती दश करोड सैनिक।

तथान्ये वानरश्रेष्ठा विन्ध्यपर्वतवासिन:।

न शक्यन्ते बहुत्त्वात् तु संख्यातुं लघुविक्रमा:॥४७॥

विन्ध्यपर्वतवासी पराक्रमी कपि अनेक ।

संख्येने इतुके असती मोजणे अशक्य त्यामुळे॥४७॥

सर्वे महाराज महाप्रभावा: सर्वे महाशैलनिकाशकाया:।
सर्वे समर्था पृथिवीं क्षणेन कर्तुं प्रविध्वस्तविकीर्ण शैलाम्॥४८॥
प्रभावशाली असती सर्व वानर विशालही पर्वतासम।
समर्थ क्षणात पृथ्वी विध्वंसण्या करुनि पर्वत चूरचूर ॥४८॥

इत्याचे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे सप्तवींश: सर्ग:॥२७॥

युद्धकाण्ड सर्ग २८

सारणस्य वचः श्रुत्वा रावणं राक्षसाधिपम्।
बलमादिश्य तत् सर्वं शुको वाक्यमथाब्रवीत्॥१॥

ऐकून सारण बोल राक्षसराज रावणा।
कथन होता त्याचे शुक ऐसे बोलु लागला॥१॥

स्थितान् पश्यसि यानेतान् मत्तानिव महाद्विपान्।
न्यग्रोधानिव गाङ्गेयान् सालान् हेमवतानिव॥२॥

एते दुष्प्रसहा राजन् बलिन: कामरूपिण:।
दैत्यदानवसंकाशा युद्धे देवपराक्रमा:॥३॥

पाहसी राजन् मत्त गजासम पुढे उभे।
गंगातीरी वटवृक्ष सालवृक्ष हिमालयी ॥२॥
तसे प्रचंड देह ज्यांचे असती इच्छारूपी जे।
देवदैत्यापरि शूर देवतासम पराक्रमी॥३॥

एषां कोटिसहस्राणि नव पञ्च च सप्त च।
तथा शङ्कसहस्राणि तथा वृन्दशतानिच॥४॥

एते सुग्रीवसचिवा: किष्किन्धानिलया: सदा।
हरयो देवगन्धर्वैरुत्पन्ना: कामरूपिण:॥५॥

संख्या त्यांची एकवीस कोटी सहस्र सहस्र।
शंक शत वृन्द असे असती सर्व वानर ॥४॥
किष्किन्धावासी सुग्रिव मन्त्री त्याचे असति हे।
देवगन्धर्वे उत्पन्न इच्छारूपी असति ते॥५॥

यौ तौ पश्यसि तिष्ठन्तौ कुमारौ देवरूपिणौ।
मैन्दश्च द्विविदश्चैव ताभ्यां नास्ति समो युधि॥६॥

ब्रह्मणा समनुज्ञातावमृतप्राशिनावुभौ।
आशंसेते यथा लङ्कामेतौ मर्दितुमोजसा॥७॥

पाहता कुमार दोघे हे उभे देवरूपि जे।
मैन्द द्विविद त्यांच्या सम युद्धी कुणी नसे॥६॥

अमृत प्राशिले त्यांनी आज्ञेवरुन ब्रह्म्याच्या ।
पराक्रमे आपुल्या ते लंका निर्दाळण्या इच्छिती॥६॥

यंतु पश्यसि तिष्ठन्तं प्रभिन्नमिव कुञ्जरम्।
यो बालात् क्षोभयेत् क्रुद्धः समुद्रमपि वानरः॥८॥

एषोऽभिगन्ता लङ्कायां वैदेह्यास्तव च प्रभो।
एनं पश्य पुरा दृष्टं वानरं पुनरागतम्॥९॥
ज्येष्ठः केसरिणः पुत्रो वातात्मज इति श्रुतः।
हनूमानिति विख्यातो लङ्घितो येन सागरः॥१०॥

पाहसी जो हत्तीसम मत्त पाही उभा राहुनि।
कोपता जो विक्षुब्ध सागरासही करीतसे॥८॥
आला होता जो लंकेत वैदेहीस भेटावया।
वानरा पहा जो पूर्वी पाहिला येई पुन्हा॥९॥

केसरिचा पुत्र ज्येष्ठ वातात्मज ज्ञात जो।
हनूमान नामे विख्यात सागर् ज्याने लङ्घिला॥१०॥
कामरूपो हरिश्रेष्ठो बलरूपसमन्वित:।
अनिवार्यगतिश्चैव यथा सततग: प्रभु:॥११॥
बलरूपसंपन्न करी इच्छेने रूप धारण।
वायूसम गति याची कोठेही जाऊ शके॥११॥
उद्यन्तं भास्करं दृष्ट्वा बाल: किल बुभुक्षित:।
त्रियोजनसहस्रं तु अध्वानमवतीर्य हि॥१२॥

आदित्यामाहरिष्यामि न मे क्षुत् प्रतियास्यति।
इति निश्चित्य मनसा पुप्लुवे बलदर्पित:॥१३॥

असता बालक त्याला लागली भूक एकदा।
पाही उगवता सूर्य तीन हजार योजन।
उडे विचार करुनी आदित्यास हरीन मी।
कारण येथील फले शमे न भूक मम।
त्यास खाइन मी माझी भूक भागवण्यास्तव॥१२-१३॥

अनाधृश्यातमं देवमपि देवर्षिराक्षसै:।

अनासाद्यैव पतितो भास्करोदयने गिरौ॥१४॥

देव राक्षस न करती परास्त सूर्यास।

पकडता न येता पडे जो उदयगिरीवरी॥१४॥

पतितस्य कपेरस्य हनुरेका शिलातले।

किंचिद् भिन्ना दृढहनुर्हनूमानेष तेन वै॥१५॥

पडता शिळेवर हनु तुटे किंचित तशी।

दृढही होई त्यामुळे हनुमान नामे प्रसिद्ध ॥१५॥

सत्यमागमयोगेन ममैष विदितो हरैः।

नास्य शक्यं बलं रूपं प्रभावो वानुभाषितुम्॥१६॥

एष आशंसते लङ्कामेको मथितुमोजसा।

येन जाज्वल्यतेऽसौ वै धूमकेतुस्तवाद्य वै।

लङ्कायां निहितश्चापि कथं विस्मरसे कपिम्॥१७॥

जाणिला वृत्तान्त याचा व्यक्तीकडुनि विश्वासू।

बल रूप प्रभाव त्याचा वर्णिणे असम्भव॥१६॥

एकट्यानेच लंकेस नष्ट करण्या पाहि हा ।

रोकता लंकेत याने लंका स्वपुच्छे जाळिली।

ऐश्या वानरा आपण विसरू शकता कसे॥१७॥

यश्चैषोऽनन्तरः शूरः श्यामः पद्मनिभेक्षणः।

इक्ष्वाकूणामतिरथो लोके विश्रुतपौरुषः॥१८॥

त्याच्यापाशी सावळे शूर कमलनेत्र वीर जे।

अतिरथि इक्ष्वाकुवंशी प्रसिद्ध ज्याचे पौरुष॥१८॥

यस्मिन् न चलते धर्मो यो धर्म नातिवर्तते।

यो ब्राह्ममस्त्रं वेदांश्च वेद वेदविदां वरः॥१९॥

धर्म त्याच्यासवे चाले न उल्लंघी धर्म जो।

जाणे ब्रह्मास्त्र वेद श्रेष्ठ वेदवेत्त्यांमध्ये॥१९॥

यो भिन्द्याद् गगनं बाणैर्मेदिनीं वापि दारयेत्।

यस्य मृत्योरिवक्रोध: शक्रस्येव पराक्रम:॥२०॥

भेदी आकाश जो बाणे विदीर्ण पृथिवी करी।

मृत्यूसम क्रोध ज्याचा पराक्रम शक्रापरी॥२०॥

यस्य भार्या जनस्थानात् सीता चापि हृता त्वया।

स एष रामस्त्वां राजन् योद्धं समभिवर्तते॥२१॥

हरिली ज्याची भार्या जनस्थानातुनी तुम्ही।

युद्धास्तव तोच श्रीराम आपणापुढती उभा॥२१॥

यस्यैषदक्षिणे पार्वे शुद्धजाम्बूनदप्रभ:।

विशालवक्षास्ताम्राक्षो नीलकुञ्चितमूर्धज:॥२२॥

एषो हि लक्ष्मणो नाम् भ्रातु: प्रियहिते रत:।

नये युद्धे च कुशल:सर्वशस्त्रभृतां वर:॥२३॥

उजवीकडे ज्याच्या असे सुवर्णकान्तिमान्।

विशाल वक्षस्थल ज्याचे रक्तवर्णी नेत्रही॥२२॥

मस्तकी कुरळे केश बन्धूच्या प्रिय हितास्तव।

उद्यत सदा कुशल राजनीति युद्धात जो
शस्त्रधारींमध्ये श्रेष्ठ नामे लक्ष्मण तो असे॥२३॥

अमर्षी दुर्जयो जेता विक्रान्तश्च जयी बली।
रामस्य दक्षिणो बाहुर्नित्यं प्राणो बहिश्चर:॥२४॥

पराक्रमी दुर्जय जेता पराजित शत्रूंना करी।
दक्षिणेस रामाच्या नित्य त्याचा प्राण बहिश्चर॥२४॥

यस्तु सव्यमसौ पक्षं रामस्याश्रित्य तिष्ठति।
रक्षोगणपरिक्षिप्तो राजा ह्येष बिभीषण:॥२६॥

श्रीमता राजराजेन लङ्कायामभिषेचित:।
त्वामसौ प्रतिसंरब्धो युद्धायैषोऽभिवरतते॥२७॥

डावीकडे रामाच्या आश्रयाने जो उभा असे ।
घेरलेला राक्षसे तो राजा बिभीषण दिसे॥२६॥

श्रीरामा लंकेवरी त्यास अभिषेक करीतसे।
कोपुनी आपणावरि तो युद्धासत्व येई इथे॥२७॥

यं तु पश्यसि तिष्ठन्तं मध्ये गिरिमिवाचलम्।
सर्वशाखामृगेन्द्राणां भर्तारममितौजसम्॥२८॥

पर्वतासम अविचल उभा मध्ये दिसतसे।
सर्व वानरांचा स्वामी तेजस्वी सुग्रीव तो ॥२८॥
तेजसा यशसा बुद्ध्या बलेनाभिज्नेन च।
य: कपीनतिबभ्राज हिमवानिव पर्वत:॥२९॥
तेज यश बल बुद्धि कुल या सर्व गुणांत।
वानरांत तो श्रेष्ठ पर्वतांत हिमालय जसा ॥२९॥
किष्किन्धां य: समध्यास्ते गुहां सगहनद्रुमाम्।
दुर्गा पर्वतदुर्गम्यां प्रधानै: सह यूथपै:॥३०॥

किष्किन्धा नाम दुर्गम गुहेत वास तो करी।
मुख्य यूथपती सुद्धा राहती त्याच्यासवे॥३०॥
यस्यैषा काञ्चनी माला शोभते शतपुष्करा।
कान्ता देवमनुष्याणां यस्यां लक्ष्मी: प्रतिष्ठिता॥३१॥
शतकमलसुवर्ण माला कंठी शोभे जया।
जिच्यात वसे लक्ष्मी देवनर जिला चाहती॥३१॥
एतां मालां च तारां च कपिराज्यं च शाश्वतम्।
सुग्रीवो वालिनं हत्वा रामेण प्रतिपादित:॥३२॥

तारेसवे कपिराज्य माला सर्व वस्तु या।
सुग्रीवास श्रीराम वालीस वधुनी देतसे॥३२॥टीप:तारा सुग्रीव पत्नी

शतं शतसहस्राणां कोटिमाहुर्मनीषिण:।
शतं कोटिसहस्राणां शङ्करित्यभिधीयते॥३३॥

शतलक्ष संख्येस कोटी वदति सूज्ञ जन।
शत सहस्र कोटीस शङ्क ऐसे म्हणति ते॥३३॥

शतं शङ्कसहस्रानां महाशङ्करिति स्मृत:।
महाशङ्कसहस्रानां शतं वृन्दमिहोच्यते॥३४॥

शत शंकसहस्रांचे महाशंक म्हणति त्या।
एक लक्ष महाशंका वृन्द म्हणुनी जाणती॥३४॥
शतं वृन्दसहस्राणां महावृन्दमिति स्मृतम्।
महावृन्दसहस्राणां शतं पद्ममिहोच्यते॥३५॥
शतसहस्र वृन्दांस म्हणतात महावृन्द ।
लक्ष महावृन्दांचे त्या पद्म ऐसे बोलती॥३५॥
शतं पद्मसहस्राणां महापद्ममिति स्मृतम्।
महापद्मसहस्राणां शतं खर्वमिहोच्यते॥३६॥

लक्ष पद्मसहस्रांचे महापद्म जाणा असे।
लक्ष महापद्मांचे खर्व ऐसे जाणती॥३६॥
शतं खर्वसहस्राणां महाखर्वमिति स्मृतम्।
महाखर्वसहस्रानां समुद्रमभिधीयते।
शतं समुद्रसाहस्रमोघ इत्यभिधीयते॥३७॥
शतमोघसहस्रानां महौघा इति विश्रुत:
एक लक्ष खर्वांचे महाखर्व् असे म्हणा।
महाखर्व सहस्रांची समुद्र ही संख्या बने।

मिळुनी लाख समुद्र ओघ ही संख्या बने॥३७॥

शतमोघ सहस्रांची महौघ संख्या होतसे।

एवं कोटिसहस्रेण शङ्कनां च शतेन च।

महाशङ्कसहस्रेण तथा वृन्दशतेन च॥३८॥

महावृन्दसहस्रेण तथा पद्मशतेन च।

महापद्मसहस्रेण तथा खर्वशतेन च॥३९॥

समुद्रेण च तेनैव महौघेन तथैव च।

एष कोटिमहौघेन समुद्रसदृशेन च॥४०॥

बिभीषणेन वीरेण सचिवै: परिचारित:।
सुग्रीवो वानरेन्द्रस्त्वां युद्धार्थमनुवर्तते।
महाबलवृतो नित्यं महाबलपराक्रम:॥४१॥

शत शंक शत वृन्द सहस्र महाशंकही
सहस्र महावृन्द शत पद्म शत खर्व
सहस्र महापद्म शत समुद्र शत महौघ ।
ऐसे सहस्र कोटी इतुक्या संख्येने वीर।
तैसे बिभीषण सचिव यांच्या बरोबर।

सुग्रीव वानरराज ललकारत आपणा।
आपल्यासमोर येई सेना त्याच्यासवे।
पराक्रमी महावीर सर्व बलसंपन्नही॥३८ते४१॥

इमां महाराज समीक्ष्य वाहिनीमुपस्थितां प्रज्वलितग्रहोपमाम्।
तत: प्रयत्न: परमो विधीयतां यथा जय: स्यान्न परै: पराभव:॥४२॥

प्रकाशमान ग्रहासम सेना असे पाहुनी तिज उपाया ऐशा करा।
ज्यामुळे विजयी आपण होऊनी खाली न पहाया लागेल शत्रूपुढे॥४२॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे अष्टाविंश:सर्ग:॥२८॥

युद्धकाण्ड सर्ग २९

शुकेन तु समादिष्टान् दृष्ट्वा स हरियूथपान्।
लक्ष्मणं च महावीर्यं भुजं रामस्य दक्षिणम्॥१॥
समीपस्थं च रामस्य भ्रातरं च बिभीषणम्।
सरववानरराजं च सुग्रीव भीमपराक्रमम॥२॥
अङ्गदं चापि बलिनं वज्रहस्तात्मजात्मजम्।
हनूमन्तं च विक्रान्तं जाम्बवन्तं च दुर्जयम्॥३॥

सुषेणं कुमुदं नीलं नलं च प्लवगर्षभम्।
गजं गवाक्षं शरभं मैन्दं च द्विविदं तथा॥४॥

पाही यूथपति सर्व शुकाने दाखविलेले।
उजवीकडे श्रीरामाच्या लक्ष्मण महापराक्रमी॥१॥
स्वबन्धु बिभीषणास रामापाशि बसलेल्या ।
सर्व वानरांचा राजा सुग्रीव महापराक्रमी॥२॥
इन्द्रपुत्र वालीचा बलवान् पुत्र अङ्गद ।

हनूमान विक्रमशाली जाम्बुवन्त दुर्जय॥३॥
सुषेण कुमुद नील नल वानरश्रेष्ठ जो।
गज् गवाक्ष शरभ मैन्द द्विविद यांसवे॥४॥
किंचिदाविग्नहृदयो जातक्रोधस्य रावण:।
भर्त्सयामास तौ वीरौ कथान्ते शुकसारणौ॥५॥
पाहुनि सर्वां उद्विग्न क्रोधित रावण।
फटकारी त्या उभयां त्यांचे कथन सम्पता॥५॥
अधोमुखौ तौ प्रणतावब्रवीच्छुकसारणौ।

रोषगद्गदया वाचा संरब्धं परुषं तथा॥६॥

अधोमुख उभे दोघे विनीत शुक सारण।

वदे रावण संतप्त कठोर वाणीने तयां ॥६॥

न तावत् सदृशं नाम सचिवैरुपजीविभि:।

विप्रियं नृपतेर्वक्तुं निग्रहे प्रग्रहे प्रभो:॥७॥

निग्रह अनुग्रह जो समर्थ करण्या नृप।

त्यावरी उपजीवित मन्त्र्यांनी वार्ता अशी।

करणे योग्य नसे जी त्यास अप्रिय असे॥७॥

रिपूणां प्रतिकूलानां युद्धार्थमभिवर्तताम्।
उभाभ्यां सदृशं नाम् वक्तुमप्रस्तवे स्तवम्॥८॥
आपले विरोधी शत्रु युद्धास्तव पुढे उभे।
यासमयी स्तुति त्यांची करणे अयोग्य तुम्हां॥८॥
आचार्या गुरवो वृद्धा वृथा वां पर्युपासिता:।
सारं यद् राजशास्त्रानामनुजीव्यं न गृह्यते॥९॥
आचार्य गुरु वृद्धांची व्यर्थ सेवा केली तुम्ही।
ज्यामुळे न समजे तुम्हा राजनीति शास्त्र जे॥९॥

गृहीतो वा न विज्ञातो भारोऽज्ञानस्य वाह्यते।
ईदृशैः सचिवैर्युक्तो मूर्खैर्दिष्ट्या धराम्यहम्॥१०॥

ग्रहण केले तरी व्यर्थ भार त्याचा वाहता तुम्ही।
सौभाग्य तुम्हा मूर्खांसवे शकलो राज्य राखू मी॥१०॥

किं नु मृत्योर्भयं नास्ति मां वक्तुं परुषं वचः।
यस्य मे शासतो जिह्वा प्रयच्छति शुभाशुभम्॥११॥

मज कठोर बोलाया वाटे का न मृत्यू भय ।
तुझे शुभाशुभ करणारी मम जिह्वा असे॥११॥

अप्येव दहनं स्पृष्ट्वा वने तिष्ठन्ति पादपा:।
राजदण्डपरामृष्टास्तिष्ठन्ते नापराधिन:॥१२॥
वनी पेटता वणवा वृक्ष न स्थाना सोडती।
राजदण्ड अधिकारी अपराधी होता परी।
न टिकू शकती होती सर्वथा नष्ट ते ॥१२॥
हन्यामहं त्विमौ पापौ शत्रुपक्षप्रशंसिनौ।
यदि पूर्वोपकारैर्मे क्रोधो न मृदुतां व्रजेत्॥१३॥
पूर्वोपकारा स्मरुनी क्रोध मम मृदु ना होता।

तेव्हांच वधिले असते शत्रुपक्षप्रशंसक तुम्हा॥१३॥

अपध्वंसत नश्यध्वं संनिकर्षादितो मम।

नहि त्वां हन्तुमिच्छामि स्मराम्युपकृतानि वाम्।

हतावेव कृतघ्नौ द्वौ मयि स्नेहपराङ्मुखौ॥१४॥

सभांमध्ये मम दोन्ही प्रवेशा वञ्चित व्हा तुम्ही।

इच्छितो ना वधण्या तुम्हा स्मरुनी पूर्वोपकारा।

कृतघ्न स्नेहविन्मुख मेल्यातच तुम्ही जमा॥१४॥

एवमुक्तो तु सव्रीडौ तौ दृष्ट्वा शुकसारणौ।

रावणं जयशब्देन प्रतिनन्द्याभिनि:सृतौ॥१५॥

ऐकुनी शुक सारण अति लज्जित होउनी।

नृपा अभीष्ट चिन्तुनि निघुनी जाति तेथुनी॥१५॥

अब्रवीच्च दशग्रीव: समीपस्थं महोदरम्।

उपस्थापय मे शीघ्रं चारानिति निशाचर:।

महोदरस्तथोक्तस्तु शीघ्रमाज्ञापयच्चरान्॥१६॥

आज्ञापिता दशग्रीवे जवळील महोदरा ।

उपस्थित करा शीघ्र गुप्तचरां मजपुढे।

महोदर गुप्तचरां आज्ञापी करण्या तसे॥१६॥

ततश्चारा: संत्वरिता: प्राप्ता: पार्थिवशासनात्।

उपस्थिता: प्राञ्जलयो वर्धयित्वा जयाशिष:॥१७॥

गुप्तचर सत्वर तेव्हां विजयसूचक देउनी ।

आशीर्वच जोडुनीया हात होती उपस्थित॥१७॥

तानब्रवीत् ततो वाक्यं रावणो राक्षसाधिप:।

चारान् प्रत्यायिकान् शूरान् धीरान् विगतसाध्वसान्॥१८॥

विश्वासपात्र निर्भय गुप्तचर शूरवीर ते।

राक्षसराज रावण त्यांना सांगतसे असे॥१८॥

इतो गच्छत रामस्य व्यवसायं परीक्षितुम्।

मन्त्रेष्वभ्यन्तरा येऽस्य प्रीत्या तेन समागता:॥१९॥

येथुनी जा रामाचा विचार काय हे जाणण्या।

मन्त्री आणि त्याचे मित्र प्रेमाने बनले आता ।

विचार या सर्वांचा काय असे हे जाणण्या ॥१९॥

कथं स्वपिति जागर्ति किमद्य च करिष्यति।

विज्ञाय निपुणं सर्वमागन्तव्यमशेषत:॥२०॥

झोपति जागति कैसे काय करणार आज ते।
जाणुनी सर्व गोष्टी या परत या सांगण्या इथे॥२०॥
चारेण् विदित: शत्रु:पण्डितैर्वसुधाधिपै:
युद्धे स्वल्पेन यत्नेन समासाद्य निरस्यते॥२१॥
गुप्तचरांकडुनी ज्ञात होता शत्रुमनोदय।
सूज्ञ राजा स्वल्प यत्ने हरवू शकतो तया॥२१॥
चारास्तु ते तथेत्युक्त्वा प्रहृष्टा राक्षसेश्वरम्।
शार्दूलमग्रत: कृत्वा ततश्चक्रु: प्रदक्षिणम्॥२२॥

मानुनी गुप्तचर ते शार्दुला ठेउनी पुढे।
हर्षे राक्षसराजास घालती ते प्रदक्षिणा॥२२॥

ततस्तं तु महात्मानं चारा राक्षसत्तमम्।
कृत्वा प्रदक्षिणं जग्मुर्यत्र राम: सलक्ष्मण:॥२३॥

प्रदक्षिणा रावणाची ऐसी करुनी गुप्तचर् ।
जाती स्थानी असे जेथे श्रीराम लक्ष्मणासवे॥२३॥

ते सुवेलस्य शैलस्य समीपे रामलक्ष्मणौ।
प्रछन्ना ददृशुर्गत्वा ससुग्रीवबिभीषणौ॥२४॥

सुवेल पर्वताजवळी लपुनी ते गुप्तचर्।
पाहती श्रीराम लक्ष्मणा सुग्रीव बिभीषणासही॥२४॥
प्रेक्षमाणाश्चमूं तां च बभूवर्भयविह्वला:।
ते तु धर्मातना दृष्टा राक्षसेन्द्रेण राक्षसा:॥२५॥
पाहुनी राक्षससेना होती ते भयव्याकुळ।
तितुक्यात त्यांस पाही धर्मात्मा बिभीषण॥२५॥
बिभीषणेन तत्रस्था निगृहीता यदृच्छया।
शार्दूलो ग्राहितस्त्वेक: पापोऽयमिति राक्षस:॥२६॥

बिभीषण फटकारी अकस्मात येति त्या।
समजून अतिपापी पकडी एक शार्दूला॥२६॥
मोचित: सोऽपि रामेण वध्यमान: प्लवङ्गमै:।
आनृशंस्येण रामेण मोचिता राक्षसा: परै:॥२७॥
त्यास मारता वानर श्रीराम दयाळूपणे।
त्यासही सोडुन देई अन्य राक्षसांच्या सवे॥२७॥
वानरैरर्दितास्ते तु विक्रान्तैर्लघुविक्रमै:।
पुनर्लंकामनुप्राप्ता: श्वसन्तो नष्टचेतस:॥२८॥

पीडित चेतनाहीन विक्रमी वानराकडुनी।
लंकेत परत जाती धापा टाकित सर्व ते॥२८॥
ततो दशग्रीवमुपस्थितास्ते चारा बहिर्निर्त्यचरा निशाचरा:।
गिरे: सुवेलस्य समीपवासिनं न्यवेदयन रामबलं महाबला:॥२९॥
तेव्हा उपस्थित सेवेत रावणाच्या गुप्तचर महाबली निशाचर ।
सांगती येऊन रावणा श्रीरामचन्द्र सेना सुवेल पर्वताजवळी वसे॥२९॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे एकोनत्रिंश: सर्ग:॥२९॥

युद्धकाण्ड सर्ग ३०

ततस्तमक्षोभ्यबलं लङ्काधिपतये चराः।
सुवेले राघवं शैले निविष्टं प्रत्यवेदयन् ॥१॥

गुप्तचर रावणाचे सांगती श्रीरामसेना।
सुवेल पर्वतापाशी अजेय आणि सर्वथा॥१॥

चाराणां रावणः श्रुत्वा प्राप्तं रामं महाबलम्।
जातोद्वेगोऽभवत् किंचिच्छार्दूलं वाक्यमब्रवीत्॥२॥

ऐकून गुप्तचरांचे रामाकडे महाबळ।
रावण उद्विग्न होत शार्दूलास वदे असे॥२॥
अयथावच्च ते वर्णो दीनश्चासि निशाचर ।
नासि कच्चिदमित्राणां कृद्धानां वशमागत:॥३॥
दिससी दीन असा का तू कान्ति निष्प्रभ तव।
क्रुद्ध शत्रूंना वश तू तर झाला नाहीस ना?
इति तेनानुशिष्टस्तु वाचं मन्दमुदीरयन्।
तदा राक्षसशार्दूलं शार्दूलो भयविक्लव:॥४॥

ऐसे विचारले जाता शार्दूले भयभीत जो।
रावणा राक्षसाधीपा मन्द स्वरे सांगीतले॥४॥
न ते चारयितुं शक्या राजन् वानरपुङ्गवा:।
विक्रान्ता बलवन्तश्च राघवेण च रक्षिता:॥५॥
गतिविधी वानरांची गुप्तचरांस जाणणे ।
नसे शक्य पराक्रमि ते श्रीरामे सुरक्षित॥५॥
नापि सम्भाषितुं शक्या: संप्रश्नोऽत्र न लभ्यते।
सर्वतो रक्ष्यते पन्था वानरै: पर्वतोपमै:॥६॥

पर्वतासम विशाल वानर मार्ग रक्षति ।
त्यामुळे अशक्य होई प्रवेश करणे आत।
त्यांच्यासवे संभाषण त्यामुळे न होऊ शके॥६॥
प्रविष्टमात्रे ज्ञातोऽहं बले तस्मिन् विचारिते।
बलाद् गृहीतो रक्षोभिर्बहुधास्मि विचारित:॥७॥
प्रवेश करिता सेनेविषयी विचार करु लागता।
ओळखुनी आम्हाला बिभीषणमित्र राक्षस।

बले पकडूनि सर्वत्र अनेकदा फिरवती॥७॥

जानुभिर्मुष्टिभिर्दन्तैस्तलैश्चाभिहतो भृशम्।

परिणीतोऽस्मि हरिभिर्बलमध्ये अमर्षणै:॥८॥

वानरांनी क्रुद्ध मज सेनेतिल मारिले बहु।

लाथा बुक्क्या थपडा चावा घेउनिया तसे।

अपराध केला म्हुनी सैन्यामधे फिरविले॥८॥

परिणीय च सर्वत्र नीतोऽहं रामसंसदि।

रुधिरस्राविदीनाङ्गो विह्वलश्चलितेन्द्रिय:॥९॥

फिरवुनी मज सर्वत्र नेती रामसंसदी ।
शरीर रक्तलाञ्छित विह्वल इन्द्रियांसह॥९॥
हरिभिर्वध्यमानश्च याचमान: कृताञ्जलि:।
राघवेण परित्रातो मा मेति च यदृच्छया॥१०॥
वानरे मारिता माझ्या हात जोडुनि रक्षणा।
याचिता श्रीराम त्यांना थांबवी मज रक्षिण्या॥१०॥
एष शैलशिलाभिस्तु पूरयित्वा महार्णवम्।
द्वारमाश्रित्य लङ्काया रामस्तिष्ठति सायुध:॥११॥

पर्वतांच्या शिलाखण्डे करुनी पार सागर।
द्वारि येतसे लंकेच्या श्रीराम धनुष्यासह॥११॥
गरुडव्यूहमास्थाय सर्वतो हरिभिर्वृत:।
मां विसृज्य महातेजा लङ्कामेवातिवर्तते॥१२॥
रचुनी गरुडव्यूह वानरात विराजित।
येतसे मज सोडून लंकेवर चालुनी॥१२॥
पुरा प्राकारमायाति क्षिप्रमेकतरं कुरु।
सीतां वापि प्रयच्छाशु युद्धं वापि प्रदीयताम्॥१३॥

लंकातटी येण्यापूर्वी शीघ्र एक काम करा।
करा परत सीतेस वा युद्धास तयार व्हा।
मनसा तत् तदा प्रेक्ष्य तच्छ्रुत्वा राक्षसाधिप:।
शार्दूलं सुमहाद्वाक्यमथोवाच स रावण:॥१४॥
ऐकोनि वच हे त्याचे विचार करुनी मनी ।
शार्दुला महत्वपूर्ण राक्षसराज बोले असे ॥१४॥
यदि मां प्रतियुध्यन्ते देवगन्धर्वदानवा:।
नैवं सीतां प्रदास्यामि सर्वलोकभयादपि॥१५॥

युद्धास्तव जरी येती देवगन्धर्व दानव।
सर्वलोकभये सुद्धा सीतेस न देईन मी ॥१५॥
एवमुक्त्वा महातेजा रावण: पुनरब्रवीत्।
चरिता भवता सेना केऽत्र शूरा: प्लवङ्गमा:॥१६॥
बोलुनी महातेजस्वी रावण विचारी पुन्हा।
वाटे पाहुनिया सैन्या कोण शूर तुज वानर॥१६॥
किंप्रभा: कीदृशा: सौम्य वानरा ये दुरासदा:।
कस्य पुत्राश्च पौत्राश्च तत्त्वमाख्याहि राक्षस॥१७॥

किती दुर्जय वानर प्रभाव त्यांचा कसा असे।
कोण कुणाचे पुत्र पौत्र वा सर्व सांग हे मला॥१७॥
तथात्र प्रतिपत्स्यामि ज्ञात्वा तेषां बलाबलम्।
अवश्यं खलु संख्यानं कर्तव्यं युद्धमिच्छता॥१८॥
जाणुनी बलाबल त्यांचे काय करावे ठरवीन।
गणना शत्रुसैन्याची युद्धापूर्वी आवश्यक॥१८॥
अथैवमुक्त:शार्दूलो रावणेनोत्तमश्चर:।
इदं वचनमारेभे वक्तुं रावणसंन्निधौ॥१९॥

रावणे विचारता ऐसे श्रेष्ठ गुप्तचर् शार्दुल।
सांगण्यास करी ऐसा आरम्भ त्याच्याबरोबर॥१९॥
अथर्क्षरजस: पुत्रो युधि राजन् सुदुर्जय:।
गद्रदस्याथ पुत्रोऽत्र जाम्बवानिति विश्रुत:॥२०॥
जाम्बवान् प्रसिद्ध वीर असे युद्धात् दुर्जय।
असे तो पुत्र गद्रद आणि ऋक्षरजा यांचा ॥२०॥
गद्रदस्याथ पुत्रोऽन्यो गुरुपुत्र:शतक्रतो:
कदनं यस्य पुत्रेण कृतमेकेन रक्षसाम्॥२१॥

गद्दा दुसरा पुत्र (ज्याचे धूम्र असे नाव्।)
इन्द्रगुरु (बृहस्पति चा पुत्र नामे केसरी।।
केसरीपुत्र हनूमान् (एकटा लंकेत येउनी।
यापूर्वी मारिले त्याने राक्षसां अनेक तदा।)॥२१॥

(कंसातील मजकूर अध्याहृत

सुषेणश्चात्र धर्मात्मा पुत्रो धर्मस्य वीर्यवान्।
सौम्यः सोमात्मजश्चात्र राजन् दधिमुखः कपिः॥२२॥

धर्माचा पुत्र सुषेण धर्मात्मा नि पराक्रमी।

दधिमुख सौम्य कपि चन्द्राचा आत्मज असे॥२२॥

सुमुखोदुर्मुखश्चात्र वेगदर्शी च वानर:।

मृत्युर्वानररूपेण नूनं सृष्ट: स्वयंभुवा॥२३॥

वेगदर्शी मृत्युपुत्र सुमुख दुर्मुख आणखी।

मृत्यु वानररूपात जणु ब्रह्माने निर्मिले ॥२३॥

पुत्रो हुतवहस्यात्र नील: सेनापति: स्वयम्।

अनिलस्य तु पुत्रोऽत्र हनूमानिति विश्रुत:॥२४॥

अग्नीचा असे जो पुत्र नील सेनापति स्वत:।

सुविख्यात वीर असे वायूचा पुत्र हनुमान्॥२४॥

नप्ता शक्रस्य दुर्धर्षो बलवानङ्गदो युवा।

मैन्दश्च द्विविदश्चोभौ बलिनावश्विसम्भवौअ॥२५॥

अङ्गद बलवान् वीर इन्द्रनाती नौजवान्।

मैन्द द्विविद दोघे अश्विनीकुमार पुत्र ॥२५॥

पुत्रा वैवस्वतस्याथ पञ्च कालान्तकोपमा:।

गजो गवाक्षो गवय: शरभो गन्धमादन:॥२६॥

शरभ गज् गवाक्ष गवय गन्धमादन ।

यमराजपुत्र पांच हे शूर कालान्तासम॥२६॥

दश वानरकोट्यश्च शूराणां युद्धकाङ्क्षिणाम्।

श्रीमतां देवपुत्रानां शेषं नाख्यातुमुत्सहे॥२७॥

दशकोटी देवपुत्र असे युद्धास्तव उत्सुक।

न सांगे इतरांविषयी मोजणे ज्यां असम्भव॥२७॥

पुत्रो दशरथस्यैष सिंहसंहननो युवा।

दूषणो निहतो येन खरश्च त्रिशिरास्तथा॥२८॥

दशरथपुत्र श्रीराम सिंहासम शूर वीर जो।

खर दूषण त्रिशिरा संहारी एकटाच तो॥२८॥

नास्ति रामस्य सदृशे विक्रमे भुवि कश्चन।

विराधो निहतो येन कबन्धाश्चन्तकोपम:॥२९॥

पराक्रमी रामासम पृथ्वीवर कोणी नसे।

वधीतसे विकराल कबन्धा विराधासही॥२९॥

वक्तुं न शक्तो रामस्य गुणान् कश्चिन्नर: क्षितौ।

जनस्थानगता येन तावनो राक्षसा हता:॥३०॥

न शके श्रीरामगुणां वर्णाया नर भूवर।

जनस्थाने राक्षसांचा संहार एकटा करी॥३०॥

लक्ष्मणश्चात्र धर्मात्मा मातंगानामिवर्षभ:।

यस्य बानपथं प्राप्य न जीवेदपि वासव:॥३१॥

असे धर्मात्मा लक्ष्मण गजासम पराक्रमी।

त्याच्या बाणापुढे राही न जीवित देवराजही॥३१॥

श्वेतो ज्योतिर्मुखश्चात्र भास्करस्यात्मसम्भवौ।

वरुणस्याथ पुत्रोऽथ हेमकूट: प्लवङ्गम:॥३१॥

श्वेत आणि ज्योतिर्मुख सूर्याचे पुत्र हे कपि।

हेमकूट असे पुत्र वरुणाचा बोलती असे॥३१॥

विश्वकर्मसुतो वीरो नल: नाम प्लवगसत्तम:।

विक्रान्तो वेगवानत्र वसुपुत्र: स दुर्धर:॥३३॥

वीर नल प्लवगसत्तम विश्वकर्मा पुत्र जो।

पुत्र वसु देवाचा तो वेगशाली पराक्रमी॥३३॥

राक्षसानां वरिष्ठश्च तव भ्राता बिभीषण:।

प्रतिगृह्य पुरिं लङ्कां राघवस्य हिते रत:॥३४॥

राक्षासातिल वरिष्ठ तव भ्राता बिभीषण।

लंकेचे घेउनि राज्य राघवाच्या हिते रत॥३४॥

इति सर्व समाख्यातं तथा वै वानरं बलम्।

सुवेलेऽधिष्ठितं शैले शेषकार्ये भवान् गति:॥३५॥

वर्णन वानरसेनेचे सुवेल पर्वतावरील।

पूर्ण मी केले आता शेष हाती आपल्या॥३५॥

टीप: बालकाण्डातील १७ व्या सर्गात् राक्षसांचे केलेले वर्णन वेगळे म्हणजे

सुषेण वरुणाचा,शरभ पर्जन्याचा तर गन्धमादन कुबेराचा पुत्र असे आहे.हे कदाचित नाम साधर्म्य असु शकेल्,

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे त्रिंश: सर्ग:॥३०॥

युद्धकाण्ड सर्ग ३१

ततस्तमक्षोभ्यबलं लङ्कायां नृपतेश्चराः।
सुवेले राघवं शैले निविष्ट प्रत्यवेदयन्॥१॥
चाराणां रावणःश्रुत्वा प्राप्तं रामं महाबलम्।
जातोरेगोऽभवत् किंचित् सचिवानिदमब्रवीत्॥२॥

गुप्तचर रावणाचे लंकेस परतुनि सांगती।
सुवेल पर्वती सेना श्रीरामाची राहि येउनी॥१॥

असम्भव जिंकण्या ती रावण उद्विग्न ऐकुनी।
विचार करुनी ऐसे सांगे सचिवां आपल्या॥२॥
मन्त्रिण: शीघ्रमायान्तु सर्वे वै सुसमाहिता:।
अयं नो मन्त्रकालो हि सम्प्रात इति राक्षसा:॥३॥
जमावे शीघ्र मन्त्र्यांनी एकाग्रचित्त होउनी।
मन्त्रणा गुप्त करण्याचा काळ हा आला असे॥३॥
तस्य तच्छासनं श्रुत्वा मन्त्रिणोऽभ्यागमन् द्रुतम्।
तत: स मन्त्रयामास राक्षसै: सचिवै: सह॥४॥

शीघ्र येता सर्व मन्त्री त्याचा आदेश ऐकुनी।
रावण त्यांच्यासमवेत विचार विनिमय करी ॥४॥

मन्त्रयित्वा तु दुर्धर्षः क्षमं यत् तदनन्तरम्।
विसर्जयित्वा सचिवान् प्रविवेश स्वमालयम्॥५॥

करुनी मन्त्रणा त्यांच्या सवे दुर्धर्ष रावण।
निरोप देउनी त्याना परते भवनी आपुल्या॥५॥

ततो राक्षसमादाय विद्युज्जिह्वं महाबलम्।
मायाविनं महामायं प्राविशद् यत्र मैथिली॥६॥

नंतर करी प्रवेश जिथे होती मैथिली।
घेउनि संगे मायावी विद्युज्जिह्व राक्षसा॥६॥
विद्युज्जिह्वं च मायाज्ञमब्रवीद राक्षसाधिप:।
मोहयिष्यावहे सीतां मायया जनकात्मजाम्॥७॥
विद्युज्जिव्हास मायाज्ञ् बोले राक्षसाधिप असे।
मायेने करू मोहित सीतेस दोघे आपण॥७॥
शिरो मायामयं गृह्य राघवस्य निशाचर।
मां त्वं समुपतिष्ठस्व महच्च सशरं धनु:॥८॥

मायानिर्मित मस्तक राघवाचे तू घेउनि ।
धनुष्यबाणासह ये माझ्याजवळी राक्षसा॥८॥
एवमुक्तस्तथेत्याह विद्युज्जिह्वो निशाचरः।
दर्शयामास तां मायां सुप्रयुक्तां स रावणे॥९॥
वदे ऐकुनि ते ठीक रावणास विदुज्जिह्व।
दाखवी रावणा माया स्वकौशल्ये प्रकट जी॥९॥
तस्य तुष्टोऽभवद् राजा प्रददौ च विभूषणम्।
अशोकवनिकायां च सीतादर्शनलालसः॥१०॥

नैऋतानामधिपति: संविवेश महाबल:।
आभूषण त्यास देई तेव्हां प्रसन्न रावण।
अशोकवाटिकेमध्ये सीतेच्या दर्शनास्तव॥१०॥
राक्षसांचा अधिपति प्रवेशत महाबलि।
ततो दीनामदैन्यार्हा ददर्श धनदानुज:॥११॥
अधोमुखीं शोकपरामुपविष्टां महीतले।
भर्तारं समनुध्यान्तीमशोकवनिकां गताम्॥१२॥
दीनतायोग्य नसे त्या दीन सीतेस रावण॥११॥

पाही अशोकवनात शोकमग्न अधोवदन्।
चिंतताना पतिदेवा बसुनी जमिनीवरी॥१२॥
उपास्यमाना घोराभी राक्षसीभिदूरत:।
उपसृत्य तत: सीतां प्रहर्ष नाम कीर्तयन्॥१३॥
इदं च वचनं धृष्टमुवाच जनकात्मजाम्।
तिच्याजवळी असती राक्षशीणी भयंकर।
सीतेजवळ जाऊन हर्षे नाव आपले ॥१३॥
सांगुनि रागीट स्वरे सीतेस बोलला असे।

सान्त्व्यमाना मया भद्रे यमाश्रित्य विमन्यसे॥२४॥

खरहन्ता स ते भर्ता राघव: समरे हत:।

प्रार्थण्या सान्त्वना माझ्या न मानसी ज्याच्या बळे॥१४॥

खरहन्ता तुझा भर्ता समरी मृत्यु पावला।

छिन्न ते सर्वथा मूलं दर्पश्च निहतो मया॥१५॥

व्यसनेनात्मन: सीते मम भार्या भविष्यसि।

विसृजैतां मतिं मूढे किं मृतेन् करिष्यसि॥१६॥

छिन्न मुळापासुन तू केला दर्प तव नष्ट मी।

संकटामुळे होशील या तू भार्या मम स्वत:।
सोड चिन्तन रामाचे कशास जो आता मृत ॥१६॥
भवस्व भद्रे भार्याणां सर्वासामीश्वरी मम।
अल्पपुण्ये निवृत्तर्थे मूढे पण्डितमानिनि।।
श्रुणु भर्तुर्वधं सीते घोरं वृत्रवधं यथा॥१७॥
स्वामिनी सर्व राण्यांची माझ्या भद्रे होइ तू।
अल्पपुण्य तव मूढे शहाणी मानसी स्वता।
ऐक् पतिवध घोर जसा वृत्रासुर वध॥१७॥

टीप: येथे वृत्रासुर वधाचा सबंध आणण्याचे काय कारण आहे समजत नाही,वृत्रासुराचा वध इन्द्राने केला होता व त्याचा रामाशी काहीच संबंध नाही.

समायात: समुद्रान्तं हन्तुं मां किल राघव:।

वानरेन्द्रप्रणीतेन् बलेन महता वृत:॥१८॥

समुद्रकिनारी राम येई मज मारण्यास्तव।

सेना त्याच्यासमवेत सुग्रीवाची विशाल ती॥१८॥

संनिविष्ट: समुद्रस्य पीड्य तीरमथोत्तरम्।

बलेन महता रामो व्रजत्यस्तं दिवाकरे॥१९॥

समुद्राच्या उत्तर तीरी सैन्यासह तो थांबता।
अस्ताचली सूर्यदेव चालला तेव्हां असे॥१९॥
अथाध्वनि परिश्रान्तमर्धरात्रे स्थितं बलम्।
सुखसुप्तं समासाद्य चरितं प्रथमं चरै:॥२०॥
थकलेली सर्व सेना निद्रिस्त सुखपूर्वक।
करती गुप्तचर माझे त्यांचे पूर्ण निरीक्षण॥२०॥
तत्प्रहस्तप्रणीतेन् बलेन महता मम।
बलमस्य हतं रात्रौ यत्र राम: सलक्ष्मण:॥२१॥

प्रहस्त मम सेनानी जाउनी मोठ्या सैन्यासह।
वानरसेना करी नष्ट रामलक्ष्मण जिथे ॥२१॥
पट्टिशान् परिघांश्चक्रानृष्टीन् दण्डान् महायुधान।
बाणजालानि शूलानि भास्वरान् कूटमुद्गरान्॥२२॥
यष्टीश्च तोमरान् प्रासांश्चक्राणि मुसलानि च।
उद्यम्योद्यम्य रक्षोभिर्वानरेषु निपातिता:॥२३॥
पट्टिश परिघ चक्र मोठमोठ्या आयुधांसह।
बाणांचे समूह शूल चमकते कूट मुद्गल्।

काठ्या तोमर प्रास मोठाल्या मुसळांसह।
या सर्वांचे प्रहार करुनी वानरांवरी॥२३॥
अथ सुप्तस्य रामस्य प्रहस्तेन प्रमाथिना।
असक्तं कृतहस्तेन शिरश्च्छन्नं महासिना॥२४॥
प्रमाथी प्रहस्ताने मोठी तलवार घेउनी।
झोपलेल्या श्रीरामाचे शिर् कापुनि घेतले॥२४॥
बिभीषण: समुर्पत्य निगृहीतो यदृच्छया।
दिश: प्रव्राजित: सैन्यैर्लक्ष्मण: प्लवगै: सह॥२५॥

उसळुनी अकस्मात पकडे बिभीषणास तो।
पळविले लक्ष्मणास वानर सैनिकासहित ॥२५॥
सुग्रीवो ग्रीवया सीते भग्नया प्लवगाधिप:।
निरस्तहनुक: सीते हनूमान् राक्षसैर्हत:॥२६॥
ग्रीवा वानरराजाची सीते त्यांनी कापली।
हनू हनुमानाची तोडुनी त्यास राक्षसे।
मारूनिया राक्षसांनी उभयतांना टाकले ॥२६॥
जाम्बवानथ जानुभ्यामुत्पतन् निहतो युधि।

पट्टिशर्बहुभिश्छिन्नो निकृत्त: पादपो यथा॥२७॥

जाम्बुवान् लढण्या येता पट्टिशाप्रहारे तया।

गुडघे फोडुनि दोन्ही केले धराशायी तया ॥२७॥

मैन्दश्च द्विविदश्चोभौ तौ वानरवर्षभौ।

नि:श्वसन्तौ रुदन्तौ च रुधिरेण परिप्लुतौ॥२८॥

असिना व्यायतौ छिन्नौ मध्ये ह्यरिनिषूदनौ।

मैन्द द्विविद् दोघे श्रेष्ठ वानराधिपति।

रक्तबम्बाळ होऊन रडती दीर्घ श्वासासवे॥२८॥

तेव्हांच तलवारीने मध्ये उभया छाटले ।

अनुश्वसति मेदिन्यां पनस: पनसो यथा॥२९॥

नाराचैर्बहुभिश्च्छन्न: शेते दर्या दरीमुख:।

कुमुदस्तु महातेजा निष्कृजन् सायकैर्हत:॥३०॥

पनस नाम् कपि पक्व पनसापरी भंगुनी॥२९॥

दरीमुख छिन्नभिन्न दरीत शयन करी।

कुमुद महातेजस्वी तीरे घायाळ होउनी॥३०॥

अङ्गदो बहुभिश्छिन्न: शरैरासाय राक्षसै:।

परितो रुधिरोद्गारी क्षितौ निपतितोऽङ्गद:॥३१॥

बाणांनी राक्षसे केले छिन्नभिन्न अङ्गदा।

रक्तबंबाळ होउनी भूमीवर तो पडतसे॥३१॥

हरयो मथिता नागै: रथजालैस्तथापरे।

शयाना मृदितास्तत्र वायुवेगैरिवाम्बुदा:॥३२॥

वायुवेगे जसे मेघ फुटावे तसे वानर ।

गजपदा रथाखाली सुप्तावस्थेमधे मृत॥३२॥

प्रसृताश्च परे त्रस्ता हन्यमाना जघन्यत:।

अनुद्रुतास्तु रक्षोभि: सिंहैरिव महाद्विपा:॥३३॥

सिंहापुढे जसे हत्ती कपि राक्षसांपुढे तसे।

मार खात पाठीवर बाणांचा पळती पुढे॥३३॥

सागरे पतिता: केचित् केचिद् गगनमाश्रिता:।

ऋक्षा वृक्षानुपारूढा वानरौ वृत्तिमाश्रिता:॥३४॥

काही सागरी पडती उडती काही नभी।

काही वानरवृत्तीने तरुवरी चढूनिया ॥३४॥

सागरस्य च तीरेषु शैलेषु च वनेषु च।

पिङ्गलास्ते विरूपाक्ष राक्षसैर्बहवो हता:॥३५॥

विक्राळनेत्र राक्षस सागर् पर्वत वनी।

घेरुनिया वानरांना चेचूनिया मारती ॥३५॥

टीप: युद्धाचे असे वर्णन ऐकून त्याच्यावर सीतेचा विश्वास बसेल असे रावणास वाटले हे मोठे आश्चर्य.यात हल्ला झाल्यावर वानरसैन्याकडून् काहीच प्रतिकार झाला नाही असे दाखवले आहे.

एवं तव हतो भर्ता ससैन्यो मम सेनया।

क्षतजादै रजोध्वस्तमिदं चास्याहृतं शिर:॥३६॥

मारिले तुझ्या भर्त्यास राक्षसांनी सैन्यासह।

रक्तलांछित मस्तक त्याचे येथे आणिले असे॥३६॥

ततः परमदुर्धर्षो रावणो राक्षसेश्वरः।

सीतायामुपश्रुण्वन्तां राक्षसीमिदमब्रवीत्॥३७॥

ऐसे बोलुनि दुर्धर्ष राक्षसराज रावण।

एका राक्षसिला सांगे असता सीता ऐकत॥३७॥

राक्षसं क्रूरकर्माणं विद्युज्जिवं समानय।

येन तद्राघवशिरः संग्रामात् स्वयमाहृतम्॥३८॥

विद्युजिह्व क्रूरकर्मा आण बोलवुनी तया।

श्रीरामशिर जो आणी रणभूमीवरुनी इथे॥३८॥

विद्युजिह्वस्तदा गृह्य शिरस्तत्सशरासनम्।

प्रणां शिरसा कृत्वा रावणास्याग्रत: स्थित:॥३९॥

तममब्रवीत् ततो राजा रावणो राक्षसं स्थितम्।

विद्युज्जिवं महाजिवं समीपपरिवर्तिनम्॥४०॥

तेव्हां मस्तक घेउनी विद्युज्जिह्व धनूसवे।

रावणापुढे येउनि प्रणाम करुनी उभा॥३९॥

तेव्हां त्यास वदे राजा आपुल्या जवळी उभ्या।

विद्युज्जिह्वास ज्याची विशाल जिह्वा असे॥४०॥

अग्रत: कुरु सीताया: शीघ्रं दाशरथे: शिर:।

अवस्थां पश्चिमां भर्तु: कृपणा साधु पश्यतु॥४१॥

शीघ्र तू ठेव रामाचे शिर सीतेपुढे तिला।

अन्तीम दर्शन होण्या पतिचे बिचाऱ्या तिला॥४१॥

एवमुक्तं तु तद् रक्ष: शिरस्तत् प्रियदर्शनम्।

उपनिक्षिप्य सीताया: क्षिप्रमन्तरधीयत्॥४२॥

रावणे वदता ऐसे शिर सुन्दर ठेवुनी।

सीतेपुढे राक्षस तो तत्काल जाइ तेथुनी॥४२॥

रावणश्चापि विक्षेप भास्वरं कार्मुकं महत्।

त्रिषु लोकेषु विख्यातं रामस्यैतदिति ब्रुवन्॥४३॥

प्रेक्षणीय विशाल धनु ठेवुनिया सीतेपुढे।

रावण तिजला सांगे तिन्ही लोकात विख्यात।

श्रीरामाचे धनुष्यही आणिलेले तेही पहा॥४३॥

इदं तत् तव रामस्य कार्मुकं ज्यासमावृतम्।

इह प्रहस्तेननीतं तं हत्वा निशि मानुषम्॥४४॥

हे पहा तव रामाचे धनुष्य प्रत्यंचेसह।

प्रहस्त घेउनि येई त्यास रात्री मारुनी॥४४॥

स विद्युज्जिह्वेन सहैव तच्छिरो धनुश्च भूमौ विनिकीर्यमाण:।

विदेहराजस्य सुतां यशस्विनी ततोऽब्रवीत् तां भव मे वशानुगा॥४५॥

ठेवी तिथे मस्तक विद्युज्जिह्व तयासवे धनु भूमीवरी ठेवि रावण।

म्हणे जानकीस विदेहकुमारीस"आता स्वाधीन मजला होसि तू "॥४५॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे एकत्रिंश: सर्ग:॥३१॥

युद्धकाण्ड सर्ग ३२

सा सीता तच्छिरो दृष्ट्वा तच्च कार्मुकमुत्तमम्।
सुग्रीवप्रतिसंसर्गमाख्यातं च हनूमता॥१॥
नयने मुखवर्णं च भर्तुस्तत्सदृशं मुखम्।
केशान् केशान्तदेशं च तं च चूडामणिं शुभम्॥२॥
एतैः सर्वैरभिज्ञानैरभिज्ञाय सुदुः खिता।
विजगहेऽत्र कैकेयीं क्रोशन्ती कुररी यथा॥३॥

पाहुनी मस्तक सीता धनुष्य उत्तम त्यासवे।
तसेच सांगितलेले हनूमाने तिज आठवे।
सुग्रीवाशी मैत्री सबंध श्रीरामाचा जाहला।
आणि पाहता मुखाचा वर्ण केश ललाटही।
सुन्दर चूडामणी नेत्र सर्व पतीची लक्षणे।
ओळखून दु:खी होई रडता कुररीसम।
कैकेयीची करी निन्दा वनवासी केल्यामुळे॥०१-०३॥

सकामा भव कैकेयि हतोऽयं कुलनन्दनः।
कुलमुत्सादितं सर्वं त्वया कलहशीलया॥४॥
तुझे उद्दिष्ट कैकेयी पूर्ण मरता कुलनन्दन।
केलेस कुल तू नष्ट कलहशीलतेने तुझ्या॥४॥
आर्येण किं नु कैकेय्याः कृतं रामेण विप्रियम्।
यन्मया चीरवसनं दत्त्वा प्रव्राजितो वनम्॥५॥
रामाने कोणता केला कैकेयीचा अपराध ।
ज्यामुळे वनी पाठवी चीरवस्त्रासह आम्हा॥५॥

एवमुक्त्वा तु वैदेही वेपमाना तपस्विनी।
जगाम जगतीं बाला छिन्ना तु कदली यथा॥६॥

असे बोलुनि वैदेही दु:खाने तपस्विनी।
कदलीसम कांपत ती पडे धरणीवरी॥६॥

सा मुहूर्तात् समाश्वस्य परिलभ्याथ चेतनाम्।
तच्छिर: समुपास्थाय विललापायतेक्षणा॥७॥

सावध काही वेळात होता धीर धरूनिया।
ठेवुनी मस्तक जवळी विलाप करु लागली॥७॥

हा हतास्मि महाबाहो वीरव्रतमनुव्रत।
इमां ते पश्चिमावस्थां गतास्मि विधवा कृता॥८॥
हता मी हे महाबाहो वीरव्रतधारणा ।
अन्तिम अवस्था पहावी लागली मज।
सोडुनी मज गेलात विधवा करूनिया॥८॥
पथमं मरणं नार्या भर्तुर्वैगुण्यमुच्यते।
सुवृत्तः साधुवृत्ताया: संवृत्तस्त्वं ममाग्रतः॥९॥
स्त्रीच्या पूर्वी पती मरणे वैगुण्य तिचे मानती।

सतीसाध्वी असता मी निधन पतीचे मम।

तुम्हासम सदाचारी दु:खदायक जे मज॥९॥

महद् दु:खं प्रपन्नाया मग्नाया: शोकसागरे।

यो हि मामुद्यतस्त्रातुं सोऽपि त्वं विनिपातित:॥१०॥

शोकसमुद्री बुडले महान संकटात मी।

उद्धारक मम तुम्हा शत्रूने मारले असे॥१०॥

सा श्वश्रूर्मम कौसल्या त्वया पुत्रेण राघव।

वत्सेनेव यथा धेनुर्विवत्सा वत्सला कृता॥११॥

सासू मम कौसल्या अंतरे तुम्हासम पुत्रा।
गायीपासून वासरू तुटावे तशी अवस्था तिची॥११॥
उद्दिष्टं दीर्घमायुस्ते दैवज्ञैरपि राघव।
अनृतं वचनं तेषामल्पायुरसि राघव॥१२॥
दीर्घायु आपण ऐसे ज्योतिष्यांनी सांगितले।
असत्य ते होऊन अल्पायु तुम्ही राघव॥१२॥
अथवा नश्यति प्रज्ञा प्राज्ञस्यापि सतस्तव।
पचत्येन तथा कालो भूतानां प्रभवो ह्ययम्॥१३॥

बुद्धिमान् असुनी बुद्धि आपली नष्ट झाल्यामुळे।
किंवा प्रभाव काळाचा भूतावरील हा असे॥१३॥

अदृष्टं मृत्युमापन्न:कस्मात् त्वं नयशास्त्रवित्।
व्यसनानामुपायज्ञ: कुशलो ह्यसि वर्जसे॥१४॥

नीतिज्ञ असता ज्ञान तुम्हा संकटमोचक।
तरी ऐसा मृत्यु वीर पुरुषा न जो पाहिला॥१४॥

तथा त्वं सम्परिष्वज्य रौद्रयातिनृशंसया।
कालरात्र्या ममाच्छिद्य हृत: कमललोचन॥१५॥

काळरात्र भीषण क्रूर आपणा हृदयी लावुनी।
नेतसे कमलनयना आपणा मजपासुनी ॥१५॥
इह शेषे महाबाहो मां विहाय तपस्विनीम्।
प्रियामिव यथा नारी पृथिवीं पुरुषर्षभ॥१६॥
महाबाहो त्यागूनिया मजला तपस्विनीस।
प्रियतमेसम धरेस आलिंगुनी निद्रित॥१६॥
अर्चितं सततं यत्नाद् गन्धमाल्यैर्मया तव।
इदं ते मत्प्रियं वीर् धनुः काञ्चनभूषितम्॥१७॥

पूजिले गन्ध पुष्पमालांनी सदैव जे यत्नपूर्वक्।
स्वर्णभूषित आपले ते धनुष्य मज हे प्रिय॥१७॥

पित्रादशरथेन त्वं श्वशुरेण ममानघ।
सर्वैश्च पितृभि: सार्धं नूनं स्वर्गे समागत:॥१८॥

स्वर्गात जाउनि माझे श्वशुर तुमचे पिता।
भेटला अन्य पितरांसह असाल दशरथनृपा॥१८॥

दिवि नक्षत्रभूतं च महत्कर्मकृतं तथा।
पुण्यं राजर्षिवंशं त्वमात्मन: समुपेक्षसे॥१९॥

होत नक्षत्र आकाशी पुण्यकर्म करूनिया।
सोडिले राजर्षिवंशा पुण्यवान उपेक्षिले॥१९॥

येथे त्रिशंकु राजाच्या नक्षत्र होण्याशी संबंध आहे.

किं मां न प्रेक्षसे राजन् किं वा न् प्रतिभाषसे।
बालां बालेन सम्प्राप्तां भार्यां मां सहचारिणीम्॥२०॥
पत्नी बाळपणी झाले सर्वत्र सहचारिणी सदा।
का न पाहता मजकडे उत्तरता नच मला॥२०॥
संश्रुतं गृह्णता पाणिं चरिष्यामीति यत् त्वया।

स्मर् तन्नम् काकुत्स्थ नय मामपि दु:खिताम्॥२१॥

पाणिग्रहणावेळी धर्माचरण मजसवे।

सदैव करीन ऐसी प्रतिज्ञा केली तुम्ही।

स्मरुनी वचना आज चला घेउनि मज।

दु:खितेला या काकुत्स्थ आपल्या बरोबर॥२१॥

कस्मान्मामपहाय त्वं गतो गतिमतां वर।

अस्माल्लोकादमुं लोके त्यक्त्वा मामपि दु:खिताम्॥२२॥

आणुनि वनी मजला सवे श्रेष्ठ रघुनन्दन।

सोडुनी मज दु:खितेस परलोकी गेलात का?॥२२॥

कल्याणे रुचिरं गात्रं परिष्वक्तं मयैव तु ।

क्रव्यादैअस्तच्छरीरं ते नूनं विपरिकृष्यते॥२३॥

आलिंगले शरीरा ज्या उपचारे मङ्गल।

त्यावरी मांसभक्षी जन्तू असतील फिरत॥२३॥

अग्निष्टोमादिभिज्ञैरिष्टवानाप्तदक्षिणै:।

अग्निहोत्रेण संस्कार केना त्वं न तु लप्स्यसे॥२४॥

आराधना असे केली अग्निष्टोम यज्ञे तुम्ही।

अग्निसंस्काराचा तुम्हा का न सुयोग मिळतसे॥२४॥

प्रव्रज्यामुपपन्नानां त्रयाणामेकमागतम्।

परिप्रेक्ष्यति कौसल्या लक्ष्मणं शोकलालसा॥२५॥

तिघे वनी आम्ही आलो परि केवळ लक्ष्मणा।

परत येता पाहील माता कौसल्या शोकाकुल ॥२५॥

स तस्या: परिपृच्छन्त्या वधं मित्रबलस्य ते।

तव चाख्यास्यते नूनं निशायां राक्षसैर्वधम्॥२६॥

विचारता तिने त्यास आपले मित्र आपणा।

वधिले राक्षसे ऐसे वृत्त सांगावे लागेल त्या॥२६॥

सा त्वां सुप्तं हतं ज्ञात्वा मां च रक्षोगृहं गताम्।

हृदयेनावदीर्णेन न भविष्यति राघव्॥२७॥

समजता हत तुम्ही मजला राक्षसगृही।

नेले कळता विदीर्ण हृदये प्राण त्यागेल् ती॥२७॥

मम हेतोरनार्याया अनघः पार्थिवात्मजः।

रामः सागरमुत्तीर्य वीर्यवान् गोष्पदे हतः॥२८॥

अनार्या मजसाठी जो सागरोल्लंघन करी।

गायीच्या खुराएवढ्या पाण्यात मृत जाहला।

पराक्रमी तो श्रीराम मृत होई युद्धाविना॥२८॥

यात श्रीराम युद्धाविना मरण पावला हे सूचित करण्यासाठी गायीच्या खुराएवढ्या पाण्यात बुडून मेला असे उल्लेखिले आहे.

अहं दाशरथेनोढा मोहात् स्वकुलपांसनी।

आर्यपुत्रस्य रामस्य भार्या मृत्युरजायत॥२९॥

वरिले श्रीरामे मोहे कुलनाशिनीस मज ।

भार्या मीच श्रीरामाच्या मृत्यूस होत कारण॥२९॥

नूनमन्यां मया जातिं वारितं दानमुत्तमम्।

याहमदैव शोचामि भार्या सर्वातिथेरिह॥३०॥

अतिथीप्रिय रामाची पत्नी मी शोकाकुल।

पूर्वजन्मी दानधर्म नसेल केला योग्य मी ॥३०॥

साधु घातय मां क्षिप्रं रामस्योपरि रावण।

समानय पति पत्न्या कुरु कल्याणमुत्तमम्॥३१॥

श्रीराम शवावरी मज ठेवुनिया रावणा।

वधुनी पतिपत्नीचे मीलन घडवी असे।

कल्याणकारी हे कार्य घडवा अवश्य ते॥३१॥

शिरसा मे शिरश्चास्य कायं कायेन योजय्।
रावणनुगमिष्यामि गतिं भर्तुर्महात्मन:॥३२॥

शिरासह शरीर मम त्यांच्या शरीरा जोडुनी।
गती महात्मा पतीची त्यामुळे अनुसरेन मी॥३२॥

इतीव दु:खसंतप्ता विललापायतेक्षणा।
भर्तु: शिरो धनुश्चैव ददर्श् जनकात्मजा॥३३॥

दु:खसंतप्त सीता पाहुनी पतिमस्तक।
तसेच धनुष्य त्याचे पाहुनि रडु लागली॥३३॥

एवं लालप्यमानायां सीतायां तत्र राक्षसः।
अभिचक्राम भर्तारमनीकस्थः कृताञ्जलिः॥३४॥

करत असता सीता विलाप तेथे राक्षस।
येतसे जोडुनि हात स्वामी रावणाकडे॥३४॥

विजयस्वार्यपुत्रेति सोऽभिवाद्य प्रसाद्य च।
न्यवेदयदनुप्राप्तं प्रहस्तं वाहिनीपतिम॥३५॥

जय हो आर्यपुत्रांचा म्हुनी करुनी तया।
प्रसन्न सांगे असती प्रहस्त येत सेनापति॥३५॥

अमात्यै: सहित: सर्वै: प्रहस्तस्त्वानुपस्थित:।
तेन् दर्शनकामेन अहं प्रस्थापित: प्रभो॥३६॥
प्रभो सर्व मन्त्र्यांसह प्रहस्त येथ उपस्थित।
इच्छिती दर्शन घेण्या तेव्हां पाठविले मज॥३६॥
नूनमस्ति महाराज राजभावात् क्षमान्वित।
किंचिदात्यधिकं कार्यं तेषां त्वं दर्शनं कुरु॥३७॥
निश्चित महत्त्वाचे राजकार्य उपस्थित।
त्यामुळे आपण त्याना भेटण्याची कृपा करा॥३७॥

एतच्छ्रुत्वा दशग्रीवो राक्षसप्रतिवेदितम्।
अशोकवनिकां त्यक्त्वा मन्त्रिणां दर्शनं ययौ॥३८॥

राक्षसाचे वच ऐकूनी सोडूनी अशोकवन।
भेटण्यास मन्त्र्यांना रावण तेथुनि जातसे॥३८॥

स तु समश्रैव मन्त्रिभि: कृत्यमात्मन:।
सभां प्रविश्य विदधे विदित्वा रामविक्रमम्॥३९॥

करी आपल्या कृत्याचे समर्थन मंत्र्यापुढे।
सभेत येउनि करी विदित रामविक्रम॥३९॥

अन्तर्धानं तु तच्छीर्ष तथ्य कार्मुकमुत्तमम्।
जगाम रावणस्यैव निर्याणसमनन्तरम्॥४०॥

तेथुनि रावण जाता शिर तसेच त्यासवे। ।
उत्तम धनुष्य दोन्ही होती अदृश्य तेथुनी॥४०॥

राक्षसेन्द्रस्तु तैः सार्धं मन्त्रिभिर्भीमविक्रमैः।
समर्थयामास तदा रामकार्यविनिश्चयम्॥४१॥

भीमविक्रम बैसोनी मन्त्र्यांसह आपुल्या ।
करी विचार विनिमय रामकार्य करयास्तव॥४१॥

अविदूरस्थितान् सर्वान् बलाध्यक्षान् हितैषिण:।
अब्रवीत् कालसदृशं रावणो राक्षसाधिप:॥४२॥

जवळ उभ्या हितैषी सेनापतींसवे रावण।
बोलला अशा प्रकारे कालानुरूप विचार॥४२॥

शीघ्रं भेरीनिनादेन स्फुटं कोणाहतेन मे।
समानयध्वं सैन्यानि वक्तव्यं च न कारणम्॥४३॥

शीघ्र सर्व सैनिकांना भेरीनिनाद करुनी।
एकत्र करा परि कारण कळु देऊ नका॥४३॥

ततस्तथेति प्रतिगृह्य तद्वचस्तदैव दूता: सहसा महद् बलम्।
समानयंश्चैव समागतं च न्यवेदयन् भर्तरि युद्धकाङ्क्षिणि॥४४॥

तेव्हां दूत तथास्तु म्हणुनी आज्ञा स्वीकारती करती विशाल सेना।
एकत्र आणि युद्धाभिलाषी स्वामीस सांगती सर्व सेना आली असे॥४४॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे द्वात्रिंश: सर्ग:॥३२॥

श्री. श्याम कुलकर्णी यांची ई साहित्यवरची इतर नऊ पुस्तकं.
यांवर टॅप किंवा क्लिक करा. थोडं थांबा. ते उघडेल. वाचा.

श्याम कुलकर्णी
तुझी माझी मोटी

हास्यरंगी रंगले
श्याम कुलकर्णी


श्याम कुलकर्णी
हमरी बारी
INSURANCE
STAMPING
IMMIGRATION
VISA


महाकविकालिदासविरचित
मेघदूत
श्याम
कुलकर्णी


श्याम
कुलकर्णी

तिची सतार


मराठी श्लोकानुवाद- श्री श्याम कुलकर्णी
॥ श्रीमद्भगवद्गीता ॥

लवकरच येत आहे.

श्री श्याम कुलकर्णी अनुवादित

मूळ वाल्मिकी रामायण मराठी श्लोकमय भाग चौविसावा

www.esahity.com

9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव व गाव Whatsapp करा)